एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
१०४ शतकोत्तर वाटचाल
• मुंबई, रविवार ५ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-३०, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 30 Marathi - Daily - Mumbai, 5 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
खरात प्रकरणात मोठ्या नेत्यांचे नाव ?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# नाशिकमध्ये दुसरा खरात! १२५ हून अधिक महिलांचे व्हिडिओ
## लैंगिक शोषणाचा संशय! तक्रारदार एरंडेच निघाला खरा आरोपी

■ नाशिक

**नाशिकमध्ये भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण गाजत असतानाच आता महिलांवरील अत्याचार आणि अश्लील व्हिडिओंशी संबंधित आणखी एक धक्कादायक प्रकरण उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात स्वत:ला पीडित भासवून पुढे आलेला तक्रारदार रवींद्र एरंडे हाच या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार असल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले. एनजीओ संचालक व तथाकथित पत्रकार म्हणवणाऱ्या एरंडेकडे सव्वाशेहून अधिक महिलांचे खासगी व्हिडिओ सापडल्याने या प्रकरणात महिलांचे लैंगिक शोषण झाल्याचा संशय आहे. याप्रकरणी पोलिसांनी एरंडेविरोधात लैंगिक शोषण, माहिती तंत्रज्ञान कायदा आणि अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या नवीन खरातमुळे नाशिकमध्ये पुन्हा खळबळ उडाली आहे.**



**नाशिकमधील** सातपूर पोलीस ठाण्यात २ एप्रिल रोजी ६३ वर्षीय रवींद्र गणपत एरंडे याने त्यांच्या कार्यालयातील टॅब चोरीला गेल्याची तक्रार नोंदवली होती. त्या टॅबमध्ये वैयक्तिक स्वरूपाचे फोटो आणि व्हिडिओ असल्याचे त्याने सांगितले. अज्ञात व्यक्तींनी हे व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत १२ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा आरोपही त्याने केला होता. या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिसांनी सापळा रचला आणि १० हजार रुपये स्वीकारताना चार संशयितांना रंगेहाथ पकडले. यात आकाश पुंडलिक बकरे, प्रकाश रामदास पानपाटील, सूरज सुनील गवई आणि श्रीपत भीमराव शिंदे यांचा समावेश होता. त्यांच्या ताब्यातून टॅब, मोबाईल फोन, पेन ड्राईव्ह आणि मेमरी कार्ड जप्त करण्यात आली. अटक आरोपींकडून जप्त केलेल्या या सर्व डिजिटल उपकरणांची तपासणी केली असता पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. एक टॅब, ४ मोबाईल, २ पेन ड्राईव्ह, १ मेमरी कार्ड या साधनांमध्ये १०० हून अधिक महिलांचे खासगी आणि अश्लील व्हिडिओ आढळले. केवळ टॅबमध्येच ८७ व्हिडिओ सापडल्याने खळबळ उडाली. या व्हिडिओंत तक्रारदार एरंडे स्वतः विविध महिलांसोबत दिसत होता. एरंडेचे कारनामे उघड झाल्यानंतर या प्रकरणात एका पीडित महिलेने सातपूर पोलिसांशी संपर्क साधून त्याच्याविरोधात तक्रार दाखल केली. सरकारी नोकरीचे आमिष दाखवून, तसेच तिच्या जातीचा गैरफायदा घेत नाशिक व इगतपुरी परिसरातील विविध हॉटेलमध्ये नेऊन वारंवार लैंगिक शोषण केल्याचा आरोप महिलेने केला. पान २ वर

### ऑफिसबॉयमुळेच सुगावा

अशोक खरात याच्या ऑफिसमधील ऑफिसबॉयने त्याचे महिलांसोबतचे व्हिडिओ सार्वजनिक करून या प्रकरणाचा पर्दाफाश केला होता. एरंडे याच्या बाबतीतही त्याच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या आकाश बकरे या ऑफिसबॉयनेच त्याला अडचणीत आणले. त्याने १ एप्रिल रोजी संधी साधून केबिनमधून एरंडेचा टॅब आणि हार्ड डिस्क चोरली. त्यानंतर त्यातील अश्लील व्हिडिओ उघड करण्याची भीती दाखवून आकाशने आपल्या तीन मित्रांच्या मदतीने एरंडेला धमकावण्यास सुरुवात केली. व्हिडिओ व्हायरल न करण्यासाठी १२ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी त्याने एरंडेकडे केली. भीतीपोटी एरंडेने सुरुवातीला त्याला १० हजार रुपये दिले. मात्र, सततची पैशांची मागणी आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून एरंडेने २ एप्रिल रोजी सातपूर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्याने स्वत:चे कृत्य लपवून फक्त टॅब व हार्ड डिस्क चोरी आणि खंडणीची फिर्याद नोंदवली. पोलिसांनी जप्त केलेली हार्ड डिस्क आणि पेन ड्राइव्ह आता विश्लेषणासाठी पाठवले आहेत. या अहवालानंतर एरंडेवर लैंगिक अत्याचाराचे गंभीर गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे.

# बारामती-राहुरीत काँग्रेस आज उमेदवार देणार
## सुनेत्रा पवार बिनविरोध नाही

**राज्यातील बारामती व राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उद्या दुपारी उमेदवार जाहीर करणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले. यामुळे दोन्ही ठिकाणी बिनविरोध निवडणूक होणार नाही हे स्पष्ट झाले आहे.**

■ मुंबई



**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांनी आज उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना फोन करून पाठिंबा मागितल्याची चर्चा आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी असे आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शरद पवार यांनीही खाजगी गप्पात उध्दव ठाकरे यांच्या निर्णयाला पाठिंबा देऊ असे म्हणाले . मात्र काँग्रेसने सुरुवातीपासूनच सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देण्याची ठाम भूमिका मांडली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की,२०२४ विधानसभा निवडणुकीत बारामती - राहुरी या दोन्ही जागा मविआने तुतारी चिन्हावर लढल्या होत्या.मात्र यावेळी ते लढत नसतील तर काँग्रेस त्या ठिकाणी लढण्यासाठी तयार आहे अशी सविनय भूमिका काँग्रेस पक्षाची होती. उद्यापर्यंत उमेदवाराचे नाव काँग्रेस पक्षाच्यावतीने आम्ही अंतिम करणार आहोत. पक्ष या दोन्ही जागांवर उमेदवार देण्याच्या निर्णयावर ठाम आहे.यासंदर्भात आमची राज्यस्तरावरील सर्व नेत्यांशी चर्चा झाली आहे. राष्ट्रीय स्तरावर देखील आमचा संवाद आहे. उद्या दुपारपर्यंत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. काँग्रेसला वंचित पक्षाने पाठिंबा दिला आहे.

संजय राऊत म्हणाले की,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. त्यांनी बारामती पोटनिवडणुकीविषयी चर्चा केली. पक्षप्रमुखांशी सुनेत्रा वहिनींनी त्यासंदर्भात काय चर्चा झाली किंवा ते काय निर्णय देणार? तो लवकरच स्वतः पक्षप्रमुख पत्रकार परिषद घेऊन स्पष्ट करतील. काँग्रेस निवडणूक लढण्यावर ठाम आहे. त्यांनी चार ते पाच उमेदवारांच्या मुलाखतीही घेतल्या आहेत. पान २ वर

# मराठी न येणाऱ्या रिक्षा चालकांचे परवाने रद्द? पडताळणीचे आदेश

■ मुंबई

**राज्यात** रिक्षा चालकांच्या परवान्यांबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा चालकांच्या परवान्यांची फेरतपासणी करण्याचे आदेश प्रादेशिक परिवहन कार्यालयांना दिले आहेत. या पडताळणीनंतर मराठी न बोलता येणाऱ्या रिक्षाचालकांचे परवाने रद्द केले जाऊ शकतात. राज्यातील विविध शहरांमध्ये रिक्षा परवाने देण्यात आले असले, तरी काही प्रकरणांमध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे परवाने मिळवल्याचे उघड झाले आहे. विशेषतः मिरा-भाईंदर, वसई-विरार, ठाणे आणि मुंबई या शहरांमध्ये अशी प्रकरणे आढळली. या पार्श्वभूमीवर सर्व पान २ वर




# दिंडोरीत कार विहिरीत कोसळली
## एकाच कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू




■ नाशिक

**दिंडोरी** तालुक्यात काल रात्री झालेल्या मोटार अपघातात सहा विद्यार्थ्यांसह ९ जणांचा मृत्यू झाला. हे सगळे एकाच कुटुंबातील होते. ते खासगी क्लासच्या स्नेहसंमेलनावरून घरी परतत असताना त्यांची कार रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळली. या अपघातात या अपघातात सुनील दरगोडे (३२), रेशमा दरगोडे (२७),आशा दरगोडे (३२), गुणवती दरगोडे (११), श्रेयश दरगोडे (११), श्रावणी दरगोडे (११), सृष्टी दरगोडे (१४),समृद्धी दरगोडे (७),श्रद्धा दरगोडे (१३) यांचा समावेश आहे. विहीर मालक राजेंद्र राजे यांच्यावर निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर खासगी क्लास संचालक सचिन वडजे यांचीही चौकशी होणार आहे.

दिंडोरी येथील शिवाजीनगर भागात राजे बॅंक्वेट हॉल व मंगल कार्यालयात सायंकाळी एका खासगी क्लासतर्फे स्नेहसंमेलन व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले होते. या कार्यक्रमासाठी दिंडोरी शहरासह आसपासच्या गावांतील विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री दहा वाजता स्नेहसंमेलन संपल्यानंतर इंदोरे येथील दरगोडे कुटुंबातील सदस्य मोटारीने घरी परतत होते. त्यावेळी मंगल कार्यालय परिसरातील रस्त्यालगतच्या शेतातील एका विहिरीत त्यांची मोटार कोसळली. रात्रीच्या अंधारात संरक्षण कठडा नसल्याने चालकाचा अंदाज चुकल्याने अपघात झाल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती समजल्यानंतर दिंडोरी नगरपंचायतीचे अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन पथक व पोलीस घटनास्थळी पोहचले. विहीर पाण्याने भरलेली असल्याने मदतकार्यात अडचणी येत होत्या. या घटनेची माहिती सर्वत्र पसरल्याने परिसरात मोठी गर्दी झाली होती. तीन क्रेनच्या साहाय्याने मोटार विहिरीतून बाहेर काढण्यात आली. आज दुपारी शवविच्छेदन पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिले. या घटनेमुळे इंदोरे गावात पान २ वर

# होर्मुजनंतर 'मंडेब' सामुद्रधुनी बंद करण्याची इराणची धमकी




■ नवी दिल्ली

**इस्त्रायल** आणि अमेरिकेने इराणविरूध्द छेडलेले युद्ध आता अत्यंत धोकादायक वळणावर आले आहे. होर्मुज सामुद्रधुनीची नाकेबंदी केल्यानंतर इराण आता बाब अल मंडेब ही तांबड्या समुद्रातील सामुद्रधुनी रोखण्याची अप्रत्यक्ष धमकी आज दिली. तसेच हल्ले तीव्र करण्याच्या अमेरिकेच्या धमकीला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही प्रतिकार अधिक कडवा करत अमेरिकेची दोन लढाऊ विमाने आज पाडली.

तांबडा समुद्र आणि एडनचे आखात यांना जोडणारा चिंचोळा मार्ग म्हणजे बाब अल मंडेब सामुद्रधुनी.अरबी भाषेत बाब अल मंडेब याचा अर्थ अश्रुंचे द्वार असा होतो.बाब अल मंडेबची लांबी शंभर किलोमीटर, तर रुंदी ३० किलोमीटर आहे. सौदी अरेबियाच्या यांबू बंदरातून मंडेबमार्गे पान २ वर

### ४८ तासांत नाकेबंदी उठवा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज एक पोस्ट करून होर्मुज सामुद्रधुनीवरून इराणला पुन्हा इशारा दिला. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की, तुम्हाला आठवत असेल तर करार करा किंवा होर्मुज सामुद्रधुनी खुली करा, असे मी इराणला सांगितले होते. यासाठी त्यांना दहा दिवसांची मुदत दिली होती. ती आता संपत आली (६ एप्रिल) आहे. पुढच्या ४८ तासांत त्यांच्यावर आता नरकासमान आपत्ती कोसळेल. देवाचा विजय असो!

# शरद पवार यांचा उद्या शपथविधी

■ मुंबई



**जेष्ठ** नेते शरद पवार हे सोमवारी ६ एप्रिल रोजी राज्यसभेच्या खासदारकीची शपथ घेणार आहेत. त्यासाठी ते उद्या दिल्लीला रवाना होणार आहेत. या दौऱ्यात काही महत्त्वाच्या राजकीय भेटीगाठी होण्याची शक्यता आहे. शरदचंद्र पवार गटातील काही प्रमुख नेतेही यावेळी त्यांच्या सोबत उपस्थित राहू शकतात. दरम्यान, शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी आज शरद पवार यांची त्यांच्या 'सिल्वर ओक' या निवासस्थानी भेट घेतली. या वेळी सुप्रिया सुळे देखील उपस्थित होत्या. आगामी पोटनिवडणुका आणि पक्षातील घडामोडींवर चर्चा झाल्याची माहिती आहे.

# पोलीस वसाहतीवर पॉड टॅक्सी
## कुटुंबियांचा आंदोलनाचा इशारा

■ मुंबई

**कुर्ला** पोलीस वसाहत जमीनदोस्त करून त्या ठिकाणी एमएमआरडीएकडून पॉड टॅक्सी टर्मिनल उभारण्याच्या प्रस्तावाला स्थानिक पोलीस कुटुंबीयांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. तीन ते चार पिढ्यांपासून येथे वास्तव्यास असलेल्या कुटुंबांनी मालकी हक्काची घरे देण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

कुर्ला पोलीस वसाहतीत तीन इमारती असून सुमारे १०० पोलीस कुटुंबे येथे राहतात. याच परिसरात गुन्हे शाखेचे कार्यालय, पोलीस विभागाची इतर तीन कार्यालये तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालयही आहे. या सुमारे ६५०० चौरस मीटर जागेवर पॉड टॅक्सी टर्मिनल उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

स्थानिकांनी या प्रकल्पाला विरोध असून सर्वेक्षणासाठी आलेल्या एमएमआरडीए अधिकाऱ्यांना परत पाठवले. बेकायदेशीर झोपड्यांना मोफत घरे दिली जातात पण कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलिसांच्या कुटुंबियांना दुजाभाव का?

## थोडक्यात...

### बुलेट ट्रेनसाठी सुरतमध्ये उभारणार मेन्टेनन्स हब

सुरत - भारतातील पहिला-वहिला मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहे.या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात गुजरातचे सुरत शहर मोठी भूमिका निभावत आहे. सुरतमध्ये बुलेट ट्रेनच्या देखभाल-दुरुस्तीसाठी मोठा मेन्टेनन्स उभारला जात आहे. राष्ट्रीय द्रुतगती रेल्वे महामंडळाच्या वतीने बुलेट



ट्रेनच्या मार्गावर साबरमती, सुरत आणि महाराष्ट्रातील ठाणे येथे तीन मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प राबवले जात आहेत.सुरतमध्ये उभारण्यात येत असलेला मेन्टेनन्स हब हा त्यापैकी एक प्रकल्प आहे. २७ हेक्टर भूभागावरील या प्रकल्पाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. बुलेट ट्रेनचे परिचालन अत्यंत सुरक्षितपणे आणि एकूणच बुलेट ट्रेन प्रकल्प व्यवहार्य आणि प्रवाशांसाठी विश्वासार्ह ठरावा यासाठी सुरतमधील हा मेन्टेनन्स हब महत्वपूर्ण कामगिरी बजावणार आहे.

# जैन मुनींना फटके खायचे आहेत का? जरांगेंचा इशारा

■ जालना



**जैन मुनी** निलेशचंद्र जैन मुनी यांनी राज्याचे मत्स्य व बंदरे मंत्री नितेश राणे यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. राणे यांची उंची शिवरायांइतकी असल्याचे सांगत ते आम्हाला मुख्यमंत्री म्हणून हवेत, असेही त्यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यावर मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगेपाटील जैन मुनींचा मुनीर भाई असा उल्लेख करत जैन समाजाने त्यांना समज द्यावी, अन्यथा मराठा तरुण त्यांना फटके देतील, असा इशारा दिला आहे.

जरांगे म्हणाले की, यांची डोकी सडलेली आहेत का? जैन बांधवांना माझी विनंती आहे की, तुम्ही या मुनींना एकदा समजावून सांगा. आपले चांगले मैत्रीचे संबंध आहेत. मात्र हे मुनी सडलेल्या डोक्याच्या अवलादी आहेत. एखाद्या वेळेस मराठ्यांची पोरं यांना फटके देतील. हे मुनी नाहीत, तर 'मुनीर भाई' झाले आहेत.

# 'एमआयटी'ची फी वाढ रद्द करा!
## पुण्यात मनविसेचे निषेध आंदोलन

■ पुणे

**पुणे** येथील एमआयटी महाविद्यालयाविरोधात फी वाढीच्या मुद्द्यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेना विद्यार्थी सेनेने जोरदार आंदोलन केले. महाविद्यालय प्रशासन विद्यार्थ्यांची आर्थिक लूट करत असल्याचा आरोप मनसे कार्यकर्ते आणि पालकांनी केला. एमआयटी कॉलेजच्या बाहेर झालेल्या या आंदोलनावेळी कार्यकर्त्यांनी नकली नोटा उधळून महाविद्यालय प्रशासनाचा निषेध नोंदवला. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

महाविद्यालयाचे गेट बंद ठेवून आंदोलकांना आत जाण्यापासून रोखण्यात आले. मात्र, प्रशासनाने बाहेर येऊन चर्चा करावी, अशी मागणी आंदोलकांनी लावून धरली. आंदोलक म्हणाले की, आमची फी कमी झाली पाहिजे. गेल्या दोन-तीन वर्षांत महाविद्यालयाने २५ ते ३५ टक्क्यांपेक्षा अधिक फीवाढ केली असून, मागील वर्षी सुमारे ५० हजार असलेली फी आता ७० ते ७५ हजारांपर्यंत नेण्यात आली आहे. तसेच, एक्स्ट्रा करिक्युलर ॲक्टिव्हिटी, पुस्तके आणि इतर कारणांच्या नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जात आहे. शिक्षण हा व्यवसाय नसून सेवा आहे. विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर आर्थिक दरोडा टाकू नये. गरीब कुटुंबांचे शोषण थांबवावे. अन्यथा आणखी तीव्र आंदोलन करू. पालकांनीही फीवाढीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, दरवर्षी फी सतत वाढत असून ती परवडणारी राहिलेली नाही.

# लक्ष्मी ऑरगॅनिक प्रकल्पाविरोधी आंदोलनाला राज ठाकरेंचा पाठिंबा

■ मुंबई



**रत्नागिरीतील** खेड तालुक्यातील लोटे परशुराम औद्योगिक वसाहतीतील लक्ष्मी ऑरगॅनिक प्रकल्पा-विरोधातील आंदोलकांनी मुंबईत जाऊन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली असून त्यांनी या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे.

या भेटीत आंदोलकांनी राज ठाकरेंना प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य पर्यावरणीय परिणामांबाबत सविस्तर माहिती देत निवेदनही दिले. यानंतर राज ठाकरे यांनी आंदोलनाची भूमिका ऐकून घेत पाठिंबा दर्शवला. कोकण नागरी संघर्ष समितीचे अध्यक्ष उदय घाग यांनी या संदर्भात माहिती दिली. या प्रकल्पाला काँग्रेस पक्षाचाही विरोध आहे. या प्रकल्पासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान परदेशात बंद पडलेल्या केमिकल प्रकल्पाशी संबंधित असल्याने पर्यावरणाला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भूमिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मांडली आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in  www.navakal.in  /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

महानगर गॅस कंपनीच्या एजंसीला मीटर रिडींगच्या कामासाठी फिल्ड एक्झिक्युटीव्ह (बायकर) त्वरीत पाहिजेत. पगार- 22,000/- + 3,000/- ट्रॅव्हलिंग अलाऊंस. **9820385767 / 7208993036** {NC254699}

ड्रायव्हर्स पाहिजेत. अनुभवी, टी आर लाइसेंस आवश्यक. पगार 18000 ते 21000. संपर्क: **9920925129** {NC260003}

कर्जत स्टेशनपासून अर्धा कि.मी. अंतरावर डॉक्टर दाम्पत्यास 24 तास सोबत राहणारी घरकामासाठी बाई पाहिजे. (वय ५० पर्यंत) पगार - 10,000/- ते 12,000/- भोजन+ निवास मोफत, आधारकार्ड आवश्यक डॉ. अरुण चौधरी संपर्क- **02148- 299259/ 9322176080** व्हॉट्सॲप- **9769252629** {NC254733}

**ओव्हन ऑपरेटर पाहिजेत**
किरकोळ सुकामेवा दुकानासाठी
ओव्हन ऑपरेटर पाहिजेत
वेळ :- सकाळी १० ते रात्री ८:३०
अनुभव:- २-३ वर्षे
पगार: अनुभव आणि ज्ञानानुसार रु. १८,००० किंवा अधिक
पत्ता: वाडीलाल चंपकलाल ॲंड कंपनी ८/सी, मिर्चीगली, शेख मेमन स्ट्रीट, जामा मशिदजवळ, झवेरी बाजार, मुंबई-२
**संपर्क: 9820635330**

विलेपार्ले पूर्व येथे झाडूपोता कपडे व इतर कामासाठी 9 ते 5, 40 ते 50 वयाची बाई पाहिजे पगार 16000+ 500 प्रवासभत्ता संपर्क **9820149975** {NC254730}

फास्ट फुडसाठी हेल्पर पाहिजेत सकाळी ८ ते ४.३० दुपारी ३ ते ११ **8691962096** {NC260017}

'फायनान्शियल सल्लागार-निवृत्त, व्यावसायिक, गृहिणींसाठी दीर्घकालीन करिअर संधी' संपर्क:- **7400369767** {NC254697}

तात्काळ भरती- दादर, मुंबई नामांकित कंपनीसाठी सिक्युरिटी गार्ड, वेटर, कॅप्टन, किचन हेल्पर, मोरीबॉय, हाऊसकीपिंग स्टाफ हवे आहेत. चांगला पगार, सुविधा, राहण्याची व जेवणाची सोय उपलब्ध. संपर्क: **9967322402/ 8468860714/ 9820945797** {NC254731}

## पाहिजेत

बोरिवलीमध्ये हाऊसकिपिंगच्या कामासाठी अनुभवी मुले पाहिजेत.(PF + ESIC FACILITY) **9892192141** {NC254696}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे- वांद्रे, वरळी रेस्टॉरंटसाठी. पगार-१८,०००+ PF, ESIC, जेवण, दोन सुट्टी. संपर्क:- **8291856090 / 8291107497** {NC260043}

देशपांडे फाउंडेशन या संस्थेचे प्रचारक म्हणून काम करून चांगले उत्पन्न मिळवा. तुमच्या राहत्या भागात काम. वयाचे बंधन नाही. **9172647505** या व्हॉटसअप नंबरवर आपला bio data पाठवा. {NC260015}

पाहिजेत टर्नर, फिटर, हॉबिंग, गिअर ग्राइंडिंग ऑपरेटर. मीरा रोड. **7304883376** {NC260039}

कोलाबा येथे रेस्टॉरंटसाठी हेल्पर, वेटर, ऑर्डर टेकर, मोरी बॉय, किचन हेल्पर आणि ज्यूस मेकर पाहिजेत. संपर्क- **9004480008** {NC260033}

वसई ईस्ट सातिवली येथे पंचिंग मशीन (पेपर) ऑपरेटर पाहिजे, अनुभव कमीत कमी ३ वर्ष, **9820858346** {NC260026}

इमिटेशन कंपनीत पॅकींग कामासाठी मुली/ मुले पाहिजेत. मालाड पूर्वः **7710076282** {NC260021}

दहिसर ईस्ट इमिटेशन कामासाठी मुली पगार 400-450 **9920062894/ 9833006198** {NC260010}

राखी पॅकींग कामासाठी मुले/मुलगी पाहिजे. वय 18/35 भुलेश्वर **9819368530** {NC254664}

बिस्लेरी बॉटलच्या डिलिव्हरीसाठी मुले पाहिजेत. दादर, प्रभादेवी. संपर्क:- **9892307267 / 7666255660** {NC260044}

विलेपार्ले वेस्ट लोकेशनसाठी पुरुष हाऊसकिपर हवा आहे. वेतनः ₹ 25,000/- प्रति महिना वय मर्यादाः 40 वर्षांपर्यंत संपर्क:- **9687684018** {NC260041}

## Situation Vacant

HIRING, WELL EDUCATED, GOOD EXPERIENCED IN CARGO, COURIER AND LOGISTICS, INDUSTRY ALLOVER MUMBAI, BHIVANDI, VASAI. CALL FOR INTERVIEW/ WHATSAPP RESUME **9833343566**. BLUEAIR CARGO AND PVT. LTD. (BLUEAIR LOGISTIC) {NC260014}

## Situation Vacant

Required pest control operator technician location chembur **9869004045 / 9082382692** {NC260029}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260031}

## शेअर मार्केट

शेअर मार्केट शिका / रेफर करा / कमवा प्रत्यक्षात भेटा ठाणे- **9594060848** {NC254706}

## वधु पाहिजे

कोकणस्थ मराठा ३९/५-९", वार्षिक पगार ९ लाख, विक्रोळी **8104445443** {NC260048}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर, सर्व जाती थेट भेट कल्याण. **9869868620** {NC260009}

## विवाह विषयक

बौद्ध वधु पाहिजे, बौद्ध वर विशाल अशोक मोरे, मुंबई जन्म 29/03/86 वय (39) उंची 5-5, वजन 60, गोरा, शिक्षण बी.कॉम. पर्यंत इंग्लीश मिडियम, नोकरी + व्यवसाय + घरभाडे 50,000/- दरमहा. अपेक्षा वधु १०/१२/१५ वी पास, गहुवर्ण. मुंबईत राहणारी. संपर्क:- वडिल व्हॉटसॲप क्र. **90041 78467** वधुच्या पालकांनी फोटो बायोडेटा वरील नंबरवर पाठवणे {NC254629}

**-: वाचकांना सूचना:-**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतः:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# परिवहन मंत्र्यांच्या विभागातच परवाने घोटाळा आमदार नरेंद्र मेहता यांचा आरोप

■ भाईंदर

**बोगस** रिक्षा परमिट घोटाळ्यावरून भाईंदर मध्ये आमदार नरेंद्र मेहता आणि मंत्री प्रताप सरनाईक यांच्यात वाद निर्माण झाला आहे. परिवहन खात्यात बनावट कागदपत्रांच्या आधारे रिक्षा परमिट मिळवले जात असल्याचा आरोप करत मेहता यांनी सरनाईकांना लक्ष्य केले आहे.

मिरा-भाईंदर शहरात रिक्षांचा सुळसुळाट झाला असून बनावट रेशन कार्ड, आधार कार्ड, जन्म दाखला, रहिवासी दाखल्यासह अन्य



कागदपत्रांच्या आधारे परमिट, बॅच मिळवले जात असल्याचा आरोप आमदार नरेंद्र मेहता यांनी केला आहे. हा घोटाळा उघडकीस आणताना त्यांनी या प्रकरणी त्यांनी आपले राजकीय प्रतिस्पर्धी प्रताप सरनाईक यांच्या खात्यावरच आरोप केले आहेत. मिरा-भाईंदर शहरात प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू झाल्यानंतर असे प्रकार वाढले असून सरनाईक यांनी आमच्यावर आरोप करण्यापेक्षा आपल्या विभागात लक्ष घालावे, असा टोला लागवला आहे.

# नाशिकमध्ये बांधकामाधिन इमारतीत बालिकेवर अत्याचार

■ नाशिक

**नाशिकमध्ये** खोडेनगर परिसरात बांधकाम साईटवर काम करणाऱ्या कुटुंबातील अवघ्या ५ वर्षीय मुलीवर २४ वर्षीय कामगाराने लैंगिक अत्याचार केला. मुंबईनाका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खोडेनगरमधील एका बांधकाम साईटवर मध्य प्रदेशातून आलेले कुटुंब मजुरीचे काम करत आहे. याच ठिकाणी संशयित आरोपीही काम करत होता. पीडित मुलीचा भाऊ सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल असल्याने मुलीचे वडील तिच्यासह सिव्हीलच्या परिसरात राहत होते. घटनेच्या दिवशी सकाळी वडील मुलीला कामाच्या ठिकाणी घेऊन गेले. दुपारच्या सुमारास ते इमारतीच्या वरच्या मजल्यावर कामासाठी गेले असताना मुलगी खाली खेळत होती. याच संधीचा फायदा घेत आरोपीने चॉकलेटचे आमिष दाखवत तिला इमारतीतील एका खोलीत नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. नंतर मुलीच्या शरीराबाहेर रक्तस्राव होत असल्याचे आईच्या लक्षात आले. तातडीने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तिच्यावर अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले. रुग्णालयाकडून पोलिसांना माहिती देण्यात आल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत रात्रीच आरोपीला अटक केली.

# अधीर रंजन आणि शशी थरूर यांच्यावर हल्ल्याच्या प्रयत्नांमुळे खळबळ

■ नवी दिल्ली

**पश्चिम** बंगाल आणि केरळमधील निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर देशातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असताना काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अधीर रंजन चौधरी आणि खासदार शशी थरूर यांच्यावर वेगवेगळ्या ठिकाणी हल्ल्याच्या घटना घडल्याने खळबळ उडाली.

मुर्शिदाबादमध्ये चौधरी यांनी तृणमूल समर्थकांवर पूर्वनियोजित हल्ल्याचा आरोप केला तर केरळमध्ये थरूर यांच्या ताफ्यावर हल्ला होऊन त्यांच्या अंगरक्षकाला दुखापत झाली. मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बहारामपूर विधानसभा मतदारसंघात प्रचारादरम्यान तृणमूल समर्थकांनी हल्ला केल्याचा आरोप अधीर रंजन यांनी केला. ते म्हणाले की, हा हल्ला पूर्वनियोजित कट होता. विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे. आमचा प्रचार रोखण्यासाठी आणि भीती निर्माण करण्यासाठी हा हल्ला केला.

# वाफोलीमध्ये २१ एप्रिलपासून देवी माऊली 'पुन:प्रतिष्ठापना सोहळा'

■ सावंतवाडी

**तालुक्यातील** बांदाजवळच्या वाफोलीचे ग्रामदैवत श्री देवी माऊली पंचायतन मंदिराचा भव्य 'पंचकुंडी पुन:प्रतिष्ठापना सोहळा' यंदा २१ ते २४ एप्रिल या कालावधीत अत्यंत भक्तीमय वातावरणात संपन्न होणार आहे. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी यजमानांची शरीरशुद्धी व प्रायश्चित्त विधी, गाऱ्हाणे, प्रधानसंकल्प, गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, संभारदान, वर्धिनीपुजन, प्राकारशुद्धी, 'गणेशयाग', पंचकुंडी मंडप प्रतिष्ठा आणि श्री देवी माऊली पंचायतन परिवारातील देवांचा जलाधिवास, कौतुकबंधन, आरती व तीर्थप्रसाद असे कार्यक्रम होतील. त्यानंतर २२ एप्रिलला मंगलाचरण, प्राकारशुद्धी, सर्वमूर्तींना स्थान विधी, ब्रह्मादि मंडल देवता पूजन, मूर्तिचा शय्याधिवास, योगिनी, वास्तु, भैरव, क्षेत्रपाल मंडल देवता पूजन, अरणी मंथापूजन, अग्नी उत्पत्ती, अग्नी स्थापना, ग्रह मंडल देवता पुजन, अन्वाधान, वास्तू, ग्रहयजन, लघुपूर्णाहुती आणि तीर्थप्रसाद असे विधी पार पडतील. तर आहेत. २३ एप्रिलला मंगलाचरण, प्राकारशुद्धी, आवाहित देवता पूजन, अग्नीपुजन, पर्यायहोम, मुख्य देवतासाठी हवन आणि लघुपूर्णाहुती तीर्थप्रसाद होईल. सोहळ्याची सांगता २४ एप्रिलला होणार आहे.

# मराठी न येणाऱ्या रिक्षा चालकांचे परवाने रद्द? पडताळणीचे आदेश

» पान १ वरून

रिक्षा परवान्यांची फेरपडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले असून, १ मेपर्यंत याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. तपासणीदरम्यान संबंधित चालकाला मराठी बोलता येते का, याचीही खातरजमा केली जाणार आहे. प्रवाशांशी मराठीत संवाद साधण्यात अडचणी येणे किंवा वाद होण्याच्या तक्रारी वाढत असल्याने अशा चालकांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. महाराष्ट्रात रिक्षा चालकांना परवाना देताना मराठी भाषा येणे ही अनिवार्य अट असून, प्रवाशांशी सुलभ संवाद साधण्यासाठी मूलभूत मराठीचे ज्ञान आवश्यक मानले जाते. त्यामुळे या फेरपडताळणीनंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेचा ११६ कोटींचा अर्थसंकल्प

■ मुरबाड

**ठाणे** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांनी आर्थिक वर्ष २०२६-२७ चा ११६.९३ कोटीचा अर्थसंकल्प नुकताच सादर केला. या मध्ये ग्रामीण भागातील विकासाला प्राधान्य देणार असून मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात विकास कामांसाठी निधी उपलब्ध होणार आहे.

या अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शिक्षण, महिला व बालकल्याण, ग्रामीण रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे, पाणीपुरवठा सुधारणा, आधुनिक कृषी तसेच ईगव्हर्नन्स आणि डिजिटल उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे. एकूण जमा अंदाजपत्रकात ११६.९९ कोटी असून प्रस्तावित खर्च ११६.९३ कोटी इतका आहे त्यामध्ये बांधकाम विभागासाठी १९.८७ कोटी, शिक्षणासाठी ११.३६ कोटी आणि महिला व बाल कल्याणासाठी ४.८९ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. या अर्थ संकल्पाबाबत संमिश्र प्रतिक्रिया ही उमटत आहेत. जिल्हापरिषद दर वर्षी कोट्यवधी रुपये विकास कामासाठी उपलब्ध करून देते. मात्र मुरबाड तालुक्यातील काही ग्रामपंचायतीमध्ये गेल्या काही वर्षांचा १४ व १५ व्या वित्त आयोगातील निधीचा अपहार लेखापरीक्षणातून मोठ्या प्रमाणात उघड झाला आहे.

**नावात बदल**
मी आतापर्यंत **सोनार अमित कुमार सुरेश** या नावाने ओळखला जात होतो. मी ए५/६०३ पुण्योदया पार्क, डॉन बॉस्को स्कूल डी. बी. चौक, कल्याण (वेस्ट) - ४२१३०१ येथे राहतो. मी माझे नाव बदलून घेतले असून, यापुढे मी **अमित सुरेश सोनार** या नावाने ओळखला जाईन. याबाबतच्या सर्व कायदेशीर बाबी मी पूर्ण केल्या असून तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्च २६ ते १ एप्रिल, २०२६च्या राजपत्रात (एम-२५५३८८३९) प्रसिद्ध झाले आहे.
**सोनार अमित कुमार सुरेश**
(जुन्या नावाने सही)

# बारामती- राहुरीत काँग्रेस आज उमेदवार देणार

» पान १ वरून

मविआमध्ये जरी असलो तरी हा काँग्रेस पक्षाचा निर्णय आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्धव ठाकरे यांचे तत्कालीन मुख्यमंत्री कालावधीतील विश्वसनीय सहकारी होते. त्यामुळे याबाबत ते स्वत:च स्पष्ट भूमिका मांडतील. काँग्रेस या निवडणुकीत वेगळी भूमिका घेणार असेल तर याकडे मविआ म्हणून लक्ष घालण्याची आवश्यकता नाही. परंतु उद्धव ठाकरे आणि अजित पवार यांचे भावनिक नाते होते. त्यामुळे पक्षप्रमुख याबाबत त्यांची भूमिका सांगतील. यापूर्वी भाजपा आणि अजित पवार यांनीही विधानसभा सदस्याच्या निधनानंतर अनेकदा उमेदवार दिल्याचा इतिहास आहे. पिंपरी - चिंचवडमध्ये लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर अजित पवार यांनी अश्विनी जगताप यांच्या विरोधात नाना काटे यांना उमेदवारी दिली होती.भावना फक्त शिवसेनेलाच असतात.ही निवडणूक महायुती विरुद्ध मविआ अशीच होणार आहे. सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरेंशी चर्चा केल्याची माहिती आहे. परंतु इतर पक्षांशी चर्चा केली का ? यासंदर्भात माहिती नाही. याबाबत जय पवार म्हणाले की, माझ्यासह सर्व बारामतीकरांना निवडणूक बिनविरोध व्हावी असे वाटते. बारामतीकर कोणासोबत आहे हे सर्वांना माहीत आहे. मात्र विरोधकांना लढायचे असेन तर त्यांनी लढावे. तर शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख म्हणाले की, या निवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवार देणार आहे. मात्र माझे मत आहे की ही निवडणूक बिनविरोध व्हावी. राहुरी विधानसभा पोटनिवडणूकही बिनविरोध होणार नाही , भाजपाने कर्डिले यांच्या पुत्राला उमेदवारी दिली आहे. त्याचवेळी वंचितने अनिल जाधव यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यामुळे दोन्ही ठिकाणी मतदान होऊन ४ मे रोजी निकाल जाहीर होईल असेच चित्र आहे.

# नाशिकमध्ये दुसरा खरात! १२५ हून अधिक महिलांचे व्हिडिओ

» पान १ वरून

एरंडे सातपूर भागातील कामगारनगर व श्रमिकनगरमध्ये कधी पत्रकार, कधी हस्तरेषातज्ज्ञ तर कधी लघुउद्योग कन्सल्टंट म्हणून वावरायचा. लघुउद्योग सुरू करून देण्याच्या बहाण्याने त्याने २००३ पासून २०२४ दरम्यान अनेक गोरगरीब महिलांना आपल्या जाळ्यात ओढले. त्यांच्या हतबलतेचा फायदा घेत त्यांचे लैंगिक शोषण केले आणि आपल्या सातपूर कॉलनी परिसरातील नीळकंठेश्वरनगर येथील कार्यालयाच्या केबिनमध्ये 'कॅमेरा द्वारे छुपे चित्रीकरण केले. हे अश्लील व्हिडिओ त्याने टॅब आणि हार्डडिस्कमध्ये थेट पीडित महिलांच्या नावे 'फोल्डर' करून सेव्ह केले.

रवींद्र एरंडेवर अश्लील व्हिडिओ 'ब्लू फिल्म' स्वरूपात व्हिडिओ विक्रीचा ही संशय आहे. ब्लॅकमेलिंगद्वारे पैशांची मागणी झाली का, याबाबतही पोलिसांचा तपास सुरू आहे. पीडितांमध्ये अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, कंपनी कामगार, घरकाम करणाऱ्या महिलांचा समावेश आहे. एरंडेवर बलात्कार आणि ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यासंदर्भात नाशिक झोन-२ पोलीस उपायुक्त किशोर काळे यांनी पीडित महिलांनी न घाबरता पुढे येण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, हार्ड डिस्कमधून पन्नासहून अधिक व्हिडिओ हस्तगत केले आहेत.

ज्या महिला संशयिताच्या शोषणाला बळी पडल्या आहेत त्यांनी न घाबरता तक्रार देण्यासाठी पुढे यावे. पीडित महिलांची ओळख पोलीस पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. याप्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आरोपीवर कडक कारवाई केली जाईल.

# होर्मुजनंतर 'मंडेब' सामुद्रधुनी बंद करण्याची इराणची धमकी

» पान १ वरून

मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची वाहतूक होते. इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहंमद बागेर गालिबाफ यांनी मंडेब सामुद्रधुनीबद्दल एक्स पोस्ट केली. जगातील तेल, नैसर्गिक वायू, गहू, तांदूळ आणि खतांच्या वाहतुकीपैकी किती वाहतूक बाब अल मंडेबमधून होते, कोणते देश व कंपन्यांना मंडेबमधून सर्वाधिक मालाचा पुरवठा होतो आणि किती देश या जलमार्गावर अवलंबून आहेत, असे प्रश्न विचारत होर्मुजनंतर आता मंडेबकडे इराणचे लक्ष वळले आहे, असे संकेत या पोस्टमधून गालिबाफ यांनी दिले.

या युद्धात इराणने अमेरिकेची दोन विमाने पाडल्यामुळे खळबळ उडाली आहे. इराणची सरकारी वृत्तसंस्था आयआरआयबीने दिलेल्या वृत्तानुसार अमेरिकेच्या ए-१० थंडरबोल्ट विमानाला इराणच्या हवाई सुरक्षा प्रणालीने (एअर डिफेन्स सिस्टीम) हवेतच टिपले. त्यानंतर हे विमान फारस खाडीमध्ये कोसळले.त्याआधी इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्पने अमेरिकेचे एफ-१५ ई लढाऊ विमान पाडल्याचा दावा केला होता.

अमेरिकेची दोन विमाने इराणने पाडल्याच्या वृत्ताला अमेरिकन माध्यमांनी दुजोरा दिला. तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड यांनी युद्धात असे नुकसान होतेच, असे म्हणत दोन विमाने पाडली याला आपण फारसे महत्त्व देत नाही, असे दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी असेही म्हटले की, यामुळे अमेरिका आणि इराण दरम्यान सुरू असलेल्या युद्धविरामाच्या चर्चेत खंड पडणार नाही. तर इराणने आपल्या आधीच्या भूमिकेचा पुनरुच्चार करत ट्रम्प यांचे म्हणणे पुन्हा एकदा खोडून काढले. अमेरिकेसोबत युध्दविरामाची कसलीही चर्चा आम्ही करत नाही आणि करणारही नाही, असे इराणने सांगितले. तिकडे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी असा दावा केला की, इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यांमध्ये इराणची पोलाद निर्मिती करण्याची सुमारे ७० टक्के क्षमता नष्ट झाली आहे.त्यामुळे इराणच्या शस्त्रास्त्र निर्मितीला फार मोठा फटका बसला आहे.

# दिंडोरीत कार विहिरीत कोसळली

» पान १ वरून

शोककळा पसरली. आज सकाळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शिक्षण मंत्री दादा भुसे, खासदार भास्कर भगरे, माजी आमदार रामदास चारोस्कर, धनराज महाले, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, प्रांत अधिकारी आप्पासाहेब शिंदे, तहसीलदार मुकेश कांबळे आदींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच ग्रामीण रुग्णालयात जाऊन मृतांच्या नातेवाईकांची भेट घेत सांत्वन केले. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी विहीर मालक आणि संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तर राज्य सरकारकडून मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संवेदना व्यक्त केली. मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, शिवाजीनगर परिसरातील रस्त्यालगत असलेल्या या धोकादायक विहिरीसंदर्भात पर्यायी उपाययोजना का केल्या नाहीत? याची चौकशी करण्यात येणारआहे. विहीर मालक राजेंद्र राजे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचबरोबर संबंधित विहीर तातडीने बुजविण्यात येणार असून जिल्ह्यात अशा धोकादायक विहिरींचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहे. तर नरहरी झिरवाळ म्हणाले की, आजचा दिवस दिंडोरीसाठी 'काळा दिवस' आहे. एकाच कुटुंबातील नऊ माणसे जाणे ही अत्यंत गंभीर घटना आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलली जाणार आहे.

# लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी (सोडत सायं. 5:00 वाजता)

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 04/04/2026

| बक्षिस | क्रमांक |
| --- | --- |
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-01 : 1427 |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | क्रमांक |
| --- | --- |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 4251 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 7361 (रॉयल एजन्सी - आंकली) |

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0852 | 0859 | 1056 | 2440 | 5150 | 6211 | 7137 | 7274 | 7473 | 9399 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0036 | 0969 | 2978 | 5452 | 5789 | 6808 | 8130 | 8306 | 8538 | 9979 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0533 | 1551 | 2241 | 2866 | 3266 | 4600 | 7104 | 8060 | 8247 | 9547 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | 1457 | 2252 | 3555 | 4452 | 5345 | 6162 | 7070 | 7872 | 8876 |
| | | 1466 | 2256 | 3585 | 4523 | 5352 | 6167 | 7122 | 7885 | 8918 |
| | | 1487 | 2282 | 3610 | 4544 | 5371 | 6356 | 7155 | 7927 | 8964 |
| 0002 | 0872 | 1521 | 2315 | 3613 | 4589 | 5420 | 6382 | 7160 | 7970 | 9093 |
| 0008 | 0895 | 1568 | 2328 | 3710 | 4614 | 5452 | 6421 | 7290 | 8054 | 9215 |
| 0054 | 0897 | 1596 | 2367 | 3825 | 4656 | 5515 | 6467 | 7298 | 8122 | 9244 |
| 0071 | 0907 | 1760 | 2511 | 3833 | 4754 | 5520 | 6509 | 7310 | 8189 | 9272 |
| 0152 | 0934 | 1783 | 2615 | 3893 | 4865 | 5524 | 6516 | 7438 | 8199 | 9459 |
| 0168 | 0953 | 1798 | 2627 | 3926 | 4867 | 5537 | 6604 | 7450 | 8296 | 9471 |
| 0208 | 0994 | 1810 | 2682 | 3927 | 4949 | 5542 | 6657 | 7472 | 8488 | 9507 |
| 0228 | 0998 | 1831 | 2791 | 3932 | 4951 | 5596 | 6658 | 7524 | 8535 | 9519 |
| 0463 | 1048 | 1847 | 2818 | 3959 | 5058 | 5646 | 6661 | 7564 | 8538 | 9598 |
| 0487 | 1072 | 1853 | 2825 | 4014 | 5067 | 5683 | 6678 | 7570 | 8554 | 9609 |
| 0529 | 1126 | 1871 | 2881 | 4043 | 5205 | 5714 | 6727 | 7594 | 8564 | 9803 |
| 0552 | 1168 | 1913 | 2922 | 4098 | 5206 | 5857 | 6728 | 7613 | 8598 | 9829 |
| 0626 | 1235 | 2028 | 2942 | 4158 | 5249 | 5892 | 6817 | 7733 | 8652 | 9870 |
| 0647 | 1261 | 2071 | 3017 | 4204 | 5256 | 5964 | 6865 | 7771 | 8779 | 9879 |
| 0681 | 1371 | 2103 | 3174 | 4220 | 5259 | 6000 | 6895 | 7777 | 8780 | 9900 |
| 0721 | 1390 | 2165 | 3312 | 4330 | 5286 | 6026 | 6896 | 7778 | 8818 | 9912 |
| 0845 | 1392 | 2171 | 3364 | 4441 | 5287 | 6066 | 6995 | 7799 | 8853 | 9914 |
| 0846 | 1397 | 2172 | 3383 | 4450 | 5335 | 6126 | 7068 | 7808 | 8869 | 9946 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शनिवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 14 • सोडत दिनांक 04/04/2026

| बक्षिस | क्रमांक | विक्रेते |
| --- | --- | --- |
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | ML-05 : 4325 | चिराग एन्टरप्रायझेस - नाशिक, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 4325 | महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2512 | महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी; प्रिन्स लॉटरी सेंटर ॲंड जनरल स्टोअर्स - कल्याण; श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1250 | 2293 | 4737 | 5624 | 6297 | 6381 | 6980 | 7722 | 8317 | 8882 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1328 | 3180 | 3421 | 3630 | 4515 | 5716 | 6158 | 6344 | 7031 | 7665 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0153 | 0793 | 1168 | 1904 | 2910 | 3527 | 3860 | 6749 | 8081 | 8598 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1456 | 2680 | 2890 | 5080 | 6039 | 6362 | 7775 | 8406 | 8767 | 8797 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | 1010 | 1643 | 2299 | 3135 | 3787 | 4551 | 5503 | 6265 | 7111 | 7782 | 8585 | 9358 |
| | | 1038 | 1651 | 2344 | 3136 | 3794 | 4560 | 5506 | 6297 | 7131 | 7802 | 8589 | 9387 |
| | | 1041 | 1686 | 2356 | 3170 | 3796 | 4574 | 5515 | 6346 | 7157 | 7803 | 8605 | 9391 |
| | | 1051 | 1713 | 2382 | 3206 | 3820 | 4592 | 5535 | 6356 | 7177 | 7817 | 8650 | 9435 |
| | | 1071 | 1759 | 2390 | 3213 | 4004 | 4628 | 5551 | 6360 | 7195 | 7828 | 8682 | 9449 |
| 0004 | 0390 | 1073 | 1771 | 2412 | 3228 | 4012 | 4637 | 5557 | 6367 | 7217 | 7873 | 8688 | 9459 |
| 0005 | 0404 | 1074 | 1777 | 2421 | 3232 | 4034 | 4732 | 5579 | 6375 | 7218 | 7885 | 8692 | 9479 |
| 0006 | 0406 | 1085 | 1781 | 2433 | 3235 | 4082 | 4800 | 5592 | 6443 | 7232 | 7897 | 8714 | 9579 |
| 0009 | 0422 | 1091 | 1810 | 2467 | 3252 | 4094 | 4815 | 5621 | 6463 | 7253 | 7976 | 8723 | 9592 |
| 0013 | 0437 | 1101 | 1824 | 2492 | 3273 | 4099 | 4817 | 5687 | 6522 | 7277 | 7979 | 8751 | 9593 |
| 0028 | 0455 | 1105 | 1864 | 2525 | 3300 | 4101 | 4844 | 5696 | 6586 | 7307 | 7985 | 8804 | 9598 |
| 0030 | 0476 | 1121 | 1871 | 2530 | 3301 | 4105 | 4849 | 5706 | 6594 | 7321 | 8048 | 8814 | 9637 |
| 0031 | 0493 | 1122 | 1910 | 2549 | 3303 | 4154 | 4864 | 5733 | 6602 | 7354 | 8057 | 8831 | 9646 |
| 0037 | 0498 | 1125 | 1911 | 2579 | 3315 | 4174 | 4939 | 5756 | 6625 | 7365 | 8067 | 8835 | 9650 |
| 0050 | 0507 | 1131 | 1971 | 2598 | 3318 | 4242 | 4960 | 5808 | 6626 | 7373 | 8078 | 8840 | 9686 |
| 0073 | 0551 | 1136 | 2022 | 2620 | 3323 | 4249 | 4982 | 5852 | 6632 | 7412 | 8086 | 8844 | 9701 |
| 0078 | 0599 | 1150 | 2027 | 2624 | 3336 | 4282 | 4985 | 5868 | 6639 | 7422 | 8118 | 8850 | 9707 |
| 0079 | 0604 | 1159 | 2072 | 2649 | 3340 | 4299 | 4994 | 5885 | 6653 | 7450 | 8138 | 8859 | 9732 |
| 0089 | 0609 | 1176 | 2074 | 2662 | 3342 | 4314 | 4998 | 5893 | 6659 | 7471 | 8155 | 8864 | 9739 |
| 0097 | 0633 | 1187 | 2093 | 2676 | 3343 | 4321 | 5029 | 5948 | 6664 | 7487 | 8170 | 8888 | 9740 |
| 0104 | 0636 | 1195 | 2112 | 2692 | 3358 | 4373 | 5054 | 5965 | 6665 | 7493 | 8180 | 8889 | 9750 |
| 0144 | 0682 | 1212 | 2121 | 2711 | 3377 | 4398 | 5065 | 5995 | 6689 | 7497 | 8269 | 8938 | 9799 |
| 0187 | 0690 | 1255 | 2122 | 2717 | 3433 | 4402 | 5076 | 6018 | 6692 | 7501 | 8284 | 8948 | 9804 |
| 0205 | 0700 | 1291 | 2127 | 2726 | 3464 | 4406 | 5106 | 6036 | 6710 | 7503 | 8289 | 8952 | 9819 |
| 0206 | 0720 | 1311 | 2142 | 2762 | 3487 | 4410 | 5179 | 6058 | 6716 | 7532 | 8294 | 9011 | 9862 |
| 0207 | 0739 | 1313 | 2150 | 2797 | 3499 | 4413 | 5211 | 6061 | 6726 | 7577 | 8298 | 9019 | 9875 |
| 0220 | 0753 | 1315 | 2193 | 2823 | 3513 | 4414 | 5233 | 6062 | 6748 | 7631 | 8310 | 9021 | 9891 |
| 0230 | 0760 | 1317 | 2211 | 2869 | 3523 | 4438 | 5249 | 6083 | 6763 | 7676 | 8331 | 9060 | 9894 |
| 0234 | 0775 | 1329 | 2219 | 2891 | 3575 | 4447 | 5251 | 6089 | 6764 | 7681 | 8358 | 9097 | 9915 |
| 0240 | 0779 | 1341 | 2226 | 2892 | 3587 | 4448 | 5259 | 6091 | 6782 | 7697 | 8372 | 9139 | 9925 |
| 0275 | 0819 | 1373 | 2229 | 2912 | 3623 | 4450 | 5297 | 6108 | 6786 | 7703 | 8397 | 9166 | 9936 |
| 0294 | 0850 | 1376 | 2236 | 2923 | 3654 | 4460 | 5350 | 6125 | 6806 | 7705 | 8433 | 9206 | 9966 |
| 0301 | 0860 | 1438 | 2238 | 2982 | 3657 | 4472 | 5352 | 6147 | 6860 | 7711 | 8452 | 9237 | 9969 |
| 0304 | 0875 | 1451 | 2240 | 3021 | 3693 | 4484 | 5353 | 6151 | 6862 | 7726 | 8462 | 9245 | 9975 |
| 0318 | 0908 | 1481 | 2245 | 3023 | 3724 | 4487 | 5384 | 6173 | 6864 | 7732 | 8468 | 9298 | 9976 |
| 0330 | 0920 | 1531 | 2247 | 3028 | 3729 | 4499 | 5400 | 6203 | 6921 | 7750 | 8501 | 9299 | 9978 |
| 0334 | 0932 | 1571 | 2252 | 3076 | 3734 | 4522 | 5445 | 6228 | 6963 | 7764 | 8519 | 9337 | 9980 |
| 0358 | 0952 | 1584 | 2256 | 3083 | 3743 | 4532 | 5455 | 6243 | 7020 | 7765 | 8552 | 9345 | 9986 |
| 0366 | 0992 | 1614 | 2276 | 3084 | 3750 | 4544 | 5467 | 6248 | 7072 | 7770 | 8558 | 9349 | 9991 |
| 0382 | 0995 | 1636 | 2288 | 3122 | 3783 | 4547 | 5489 | 6257 | 7102 | 7779 | 8559 | 9356 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र सह्याद्री • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • (सोडत सायं. 4:30 वाजता)

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 04/04/2026

| बक्षिस | क्रमांक |
| --- | --- |
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-07 : 7570 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0634 | 1395 | 3307 | 3938 | 4329 | 4877 | 6002 | 8590 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 8718 (प्रिन्स लॉटरी सेंटर ॲंड जनरल स्टोअर्स, कल्याण) | 9201 (त्रिमूर्ती लॉटरी एजन्सी - मुंबई) |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0230 | 0399 | 1141 | 1811 | 1818 | 3735 | 5262 | 7275 | 7554 | 7567 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0017 | 1044 | 1339 | 1806 | 2085 | 3080 | 4538 | 7900 | 9299 | 9605 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | 0600 | 2261 | 3373 | 4252 | 5529 | 6482 | 7781 | 9135 |
| | 0675 | 2307 | 3424 | 4329 | 5530 | 7022 | 7837 | 9151 |
| 0009 | 0778 | 2336 | 3463 | 4384 | 5555 | 7070 | 7946 | 9196 |
| 0014 | 1128 | 2483 | 3486 | 4525 | 5675 | 7114 | 8137 | 9242 |
| 0045 | 1226 | 2525 | 3503 | 4874 | 5734 | 7179 | 8159 | 9390 |
| 0047 | 1312 | 2852 | 3715 | 5035 | 5743 | 7192 | 8618 | 9501 |
| 0066 | 1359 | 2929 | 3813 | 5112 | 5925 | 7221 | 8662 | 9573 |
| 0077 | 1379 | 3062 | 3836 | 5254 | 5928 | 7489 | 8731 | 9584 |
| 0114 | 1497 | 3293 | 3883 | 5273 | 6029 | 7587 | 8812 | 9592 |
| 0263 | 1661 | 3303 | 3911 | 5385 | 6182 | 7662 | 8876 | 9784 |
| 0401 | 1722 | 3304 | 3980 | 5457 | 6203 | 7670 | 8980 | 9837 |
| 0470 | 1926 | 3317 | 4006 | 5460 | 6263 | 7705 | 8984 | 9891 |
| 0550 | 2098 | 3324 | 4046 | 5525 | 6266 | 7769 | 9088 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी (सोडत संध्या. 4:45 वाजता)

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 14 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 04/04/2026

| बक्षिस | क्रमांक |
| --- | --- |
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-04 : 8726 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0464 | 1450 | 1547 | 2773 | 5807 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 7101 | 7600 | 8784 | 8804 | 9620 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1327 | 1988 | 2548 | 2718 | 3388 | 3798 | 4051 | 8831 | 8866 | 8901 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0520 | 1356 | 1685 | 2065 | 4060 | 4385 | 4630 | 6366 | 7233 | 9499 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 2069 | 2645 | 3008 | 3141 | 4079 | 4520 | 4570 | 6624 | 6736 | 9875 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | 1404 | 2295 | 3276 | 4116 | 4890 | 5543 | 6627 | 7564 | 8380 | 9144 |
| | | 1497 | 2319 | 3280 | 4150 | 4915 | 5544 | 6630 | 7588 | 8433 | 9370 |
| 0003 | 0896 | 1610 | 2325 | 3316 | 4157 | 4983 | 5577 | 6646 | 7592 | 8487 | 9387 |
| 0008 | 0899 | 1618 | 2423 | 3317 | 4199 | 4990 | 5722 | 6663 | 7649 | 8579 | 9394 |
| 0030 | 0906 | 1663 | 2463 | 3321 | 4294 | 5040 | 5755 | 6675 | 7767 | 8582 | 9534 |
| 0044 | 0950 | 1692 | 2510 | 3375 | 4299 | 5045 | 5777 | 6717 | 7771 | 8611 | 9569 |
| 0050 | 1018 | 1748 | 2540 | 3396 | 4340 | 5048 | 5780 | 6890 | 7827 | 8645 | 9579 |
| 0056 | 1028 | 1751 | 2614 | 3453 | 4398 | 5056 | 5885 | 7077 | 7905 | 8648 | 9614 |
| 0057 | 1044 | 1772 | 2622 | 3473 | 4401 | 5075 | 5902 | 7082 | 7939 | 8676 | 9699 |
| 0090 | 1070 | 1785 | 2652 | 3481 | 4415 | 5123 | 6006 | 7157 | 7963 | 8817 | 9721 |
| 0147 | 1081 | 1794 | 2672 | 3693 | 4422 | 5158 | 6031 | 7178 | 8021 | 8836 | 9729 |
| 0193 | 1117 | 1855 | 2742 | 3730 | 4464 | 5198 | 6036 | 7228 | 8041 | 8847 | 9779 |
| 0310 | 1121 | 1904 | 2796 | 3753 | 4472 | 5265 | 6046 | 7262 | 8068 | 8856 | 9794 |
| 0320 | 1136 | 1962 | 2798 | 3836 | 4473 | 5290 | 6052 | 7272 | 8098 | 8888 | 9849 |
| 0362 | 1165 | 1989 | 2922 | 3880 | 4476 | 5311 | 6060 | 7277 | 8117 | 8890 | 9919 |
| 0400 | 1171 | 1991 | 2931 | 3884 | 4499 | 5312 | 6082 | 7311 | 8152 | 9011 | 9924 |
| 0550 | 1191 | 2005 | 2972 | 3930 | 4579 | 5382 | 6100 | 7312 | 8186 | 9076 | 9949 |
| 0625 | 1231 | 2049 | 3038 | 3938 | 4693 | 5405 | 6111 | 7335 | 8238 | 9099 | 9955 |
| 0645 | 1250 | 2152 | 3056 | 3960 | 4739 | 5428 | 6192 | 7382 | 8272 | 9100 | 9963 |
| 0652 | 1315 | 2192 | 3150 | 3963 | 4843 | 5505 | 6408 | 7400 | 8284 | 9114 | 9987 |
| 0712 | 1337 | 2208 | 3173 | 3997 | 4881 | 5515 | 6463 | 7481 | 8346 | 9125 | 9990 |
| 0780 | 1381 | 2255 | 3230 | 4093 | 4884 | 5542 | 6465 | 7497 | 8368 | 9142 | 9996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी


Email- contact@navakal.in
navakalofficial ▸www.navakal.in
मुंबई ■ रविवार ५ एप्रिल, २०२६
नवाकाळ
विजय





# एकाधिकारशाहीविरोधात जनक्षोभ

**अमेरिकन आणि जागतिक राजकारणात २८ मार्च २०२६ हा दिवस एका मोठ्या जनक्षोभाचा साक्षीदार ठरला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांविरुद्ध, विशेषतः त्यांनी इराणविरुद्ध पुकारलेल्या युद्धाच्या विरोधात ८० लाखांहून अधिक नागरिक या दिवशी रस्त्यावर उतरले आणि वॉशिंग्टन डी.सी. मधील लिंकन मेमोरियलपासून ते लंडनच्या ट्रॅफलगर स्क्वेअरपर्यंत पसरलेल्या या मानवी महासागराने ट्रम्प प्रशासनाच्या पायाला हादरे दिले आहेत. 'नो किंग्स' म्हणजेच राजशाही नको हा या महाजनआंदोलनामध्ये देण्यात आलेला नारा अर्थपूर्ण आहे. अमेरिकन जनतेला असे वाटू लागले आहे की, ट्रम्प हे लोकशाही मार्गाने निवडून आलेले राष्ट्राध्यक्ष असूनही एखाद्या हुकूमशहा किंवा राजाप्रमाणे वागत आहेत. त्यांच्या या मनमानी कारभारामुळे अमेरिकन लोकशाही धोक्यात आली आहे. या आंदोलनाचा केंद्रबिंदू हा अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेले युद्ध हा आहे.**



♦ प्रा. सतीश कुमार,
आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक



वास्तविक, लोकशाही राष्ट्रांमध्ये किंवा छोट्या देशांमध्ये हस्तक्षेप करून तेथील राजवटी अस्थिर करुन तेथे आपल्या तालावर नाचणारे शासन प्रस्थापित करणे, ही अमेरिकेची रणनीती अनेक वर्षांपासून चालत आली आहे. तथापि, अफगाणिस्तानात प्रचंड लष्करी आणि आर्थिक शक्ती पणाला लावूनही तालिबान्यांचा बिमोड करण्यात अपयश आल्यानंतर अमेरिकेने जागतिक राजकारणातून काहीशी फारकत घेण्यास सुरुवात केली होती. बराक ओबामा यांनी तर इराणसोबत ऐतिहासिक करार करून मध्यपूर्वेतील सत्तासंतुलनाला कलाटणी दिली होती. पण 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' असा नारा देत सत्तेवर आलेल्या ट्रम्प यांना आर्थिक पातळीवर अपयश येऊ लागल्यामुळे आणि एपिस्टन फाईल्सच्या प्रकरणात घेरले जाण्याच्या शक्यता दिसू लागल्यामुळे त्यांनी इराणला टार्गेट करुन स्वतःची सुटका करुन घेण्याचा सोपा मार्ग निवडला. इराण अण्वस्त्रांची निर्मिती करत असून त्याचा जगाला धोका आहे, हे मागील काळात खोटे ठरलेले कारण त्यांनी पुन्हा पुढे केले. त्याआधी इराणमधील राजवट बदलण्यासाठी सीआयए आणि मोसादकडून पद्धतशीर खेळ्या खेळल्या जातच होत्या. या प्रयत्नांना यशही आले असते; पण अयातुल्ला खामेनींना ठार मारल्यामुळे विखुरलेले इराणी नागरीक राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकवटले आणि त्यांनी अमेरिका-इस्त्रायलच्या अजस्त्र आव्हानाचा निकराने सामना केला. एक महिना पूर्ण झालेल्या या युद्धानंतर ट्रम्प 'आम्ही विजयी झालो आहोत' असा दावा करत असले तरी सत्य काय आहे, हे जगाला कळून चुकले आहे. 'नो किंग्ज' आंदोलनाने त्या सत्यावरच एक प्रकारे शिक्कामोर्तब केले आहे, असे म्हणावे लागेल.

अमेरिकेतील आंदोलनामुळे इराणमध्ये सत्ताबदल करण्याची भीष्मप्रतिज्ञा करणाऱ्या ट्रम्प यांचीच सत्ता डळमळीत होताना दिसत आहे. 'जो शीशे के घरों में रहते हैं, वे दूसरों पर पत्थर नहीं फेंका करते' हा १९६५ मध्ये आलेल्या 'वक्त' या चित्रपटातील बहुलोकप्रिय संवादाची आठवण यानिमित्ताने ट्रम्प यांना झाली असल्यास नवल नाही. पण तरीही ट्रम्प 'गिरे तो भी टांग उपर' या उक्तीप्रमाणे विजयाचे दावे करत असून ते हास्यास्पद आहेत. या युद्धामुळे जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. हार्मुजची सामुद्रधुनी मार्ग बंद झाल्याने जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून अमेरिकेत महागाईने उच्चांक गाठला आहे. सर्वसामान्यांच्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढल्याने लोकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. अमेरिकेतील ताज्या आंदोलनाची व्याप्ती पाहिल्यास सर्व ५० राज्यांमध्ये मिळून सुमारे ३२०० ठिकाणी निदर्शने झाल्याचे दिसून आले. आंदोलकांच्या हातात डोनाल्ड ट्रम्प, जे.डी. वन्स आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पोस्टर्स होते आणि त्यांना पदावरून हटवण्याची, अटक करण्याची मागणी यामधून करण्यात आली होती. रिपब्लिकन पक्षाचा बालेकिल्ला असलेल्या राज्यांमध्येही या उद्रेकाचे लोण पहायला मिळाले. अटलांटिक महासागर ओलांडून युरोपमध्येही ते पोहोचले. लंडन, पॅरिस आणि रोम यांसारख्या शहरांमध्ये लाखो लोक ट्रम्प यांच्या धोरणांचा निषेध करताना दिसले.

'नो किंग्ज' आंदोलनातील जनसमुदायाचा मुख्य आक्षेप ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांवर आहे. सत्तेत आल्यापासून ट्रम्प यांनी अनेक देशांवर प्रचंड टॅरिफ लादले आहेत. यामुळे अमेरिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याचा दावा अनेक अर्थतज्ज्ञ करत आहेत. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानेही ट्रम्प यांच्या काही टॅरिफ धोरणांना केराची टोपली दाखवली आहे. याशिवाय निर्वासितांबाबतचे त्यांचे कडक धोरण आणि अल्पसंख्याकांना लक्ष्य करण्याची त्यांची पद्धत यामुळे सामाजिक सलोखा बिघडत चालला आहे. तरीही ट्रम्प कुणालाच जुमानण्यास तयार नाहीयेत. ही एकाधिकारशाही अमेरिकेतील लोकशाहीप्रेमींना असह्य झाली आहे. इतिहासाची पाने धुंडाळल्यास, अमेरिकन जनतेने यापूर्वीही युद्धाच्या विरोधात सरकारला झुकवले आहे. सध्याच्या 'नो किंग्स' आंदोलनाची तुलना निक्सन काळातील 'अँटी-वॉयर' आंदोलनांशी करत आहेत. १९६९ मध्ये अशाच प्रकारे लाखो लोक रिचर्ड निक्सन यांच्या धोरणांविरोधात रस्त्यावर उतरले होते. या जनक्षोभामुळे शेवटी अमेरिकेला व्हिएतनाममधून माघार घ्यावी लागली होती. अफगाणिस्तानातून माघार घेण्यामागेही जनतेची नाराजी हे एक प्रमुख कारण होते. डोनाल्ड ट्रम्प यांचे 'अँप्रूव्हल रेटिंग' केवळ ३६ टक्क्यांवर म्हणजेच त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील निचांकी स्तरावर आले आहे. याचाच अर्थ इराणविरोधातील युद्धाला पूर्णविराम दिला गेला नाही तर ट्रम्प यांच्या राजकीय भविष्यावर मोठा परिणाम करू शकतात. हे जनआंदोलन असेच सुरू राहिले, तर रिपब्लिकन पक्षाला नोव्हेंबरमधील मध्यावधी निवडणुकांमध्ये मोठी किंमत मोजावी लागणार हे आता स्पष्ट झाले आहे. असे असूनही ट्रम्प यांनी आपल्या नेहमीच्या शैलीत या आंदोलनाची खिल्ली उडवली आहे आणि इराणविरुद्धचे युद्ध आणखी काही काळ सुरू ठेवण्याची गर्जना केली आहे. या एकाधिकारशाहीची मोठी किंमत ट्रम्प यांना मोजावी लागणार हे निश्चित आहे. पण तोवर जगाचे काय?

●●●

# नक्षलवादमुक्तीची नवी पहाट

**जवळपास १७ वर्षांपूर्वी, म्हणजे २००९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नक्षलवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील सर्वात मोठे आणि गंभीर आव्हान आहे, असे म्हटले होते. त्या पार्श्वभूमीवर आज भारत अशा टप्प्यावर उभा आहे की हा धोका आता निर्णायकरीत्या कमी झाला असून नक्षलवादाचे आता आव्हान राहिलेला नाही असे म्हणता येऊ शकेल. नक्षलवादमुक्त भारताचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत असल्याचे चित्र दिसते. जर या चळवळीत पूर्वीसारखी ताकद उरली असती, तर प्रचारपत्रके किंवा इतर साहित्याद्वारे त्यांनी स्वतःची उपस्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला असता. गेल्या एक-दोन वर्षांत तसे काही विशेष दिसत नाही. विचारधारा पूर्णपणे नष्ट होत नाही, हे मान्य करावे लागते; परंतु दोन-तीन जिल्ह्यांत उरलेल्या काही मोजक्या नक्षलवाद्यांचे अस्तित्व आजच्या भारतासाठी मोठे आव्हान राहिलेले नाही.**





♦ दिलीप त्रिवेदी
निवृत्त महासंचालक, केंद्रीय राखीव पोलीस दल

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ३० मार्च रोजी संसदेतील संबोधनाच्या माध्यमातून बस्तरमधील नक्षलवाद आता जवळजवळ संपुष्टात आला आहे, ही सुवार्ता देशवासियांना दिली. त्यांनी ३१ मार्च २०२६ ही देशातून नक्षलवाद हद्दपार करण्यासाठीची अंतिम मुदत निश्चित केली होती. जवळपास १७ वर्षांपूर्वी, म्हणजे २००९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नक्षलवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील सर्वात मोठे आणि गंभीर आव्हान आहे, असे म्हटले होते. त्या पार्श्वभूमीवर आज भारत अशा टप्प्यावर उभा आहे की हा धोका आता निर्णायकरीत्या कमी झाला असून नक्षलवादाचे आता आव्हान राहिलेला नाही असे म्हणता येऊ शकेल.

एखाद्या सशस्त्र चळवळीचा अंत झाल्याचे मानण्यासाठी सामान्यतः दोन निकष महत्त्वाचे असतात. पहिला म्हणजे त्या संघटनेचा एकही कार्यकर्ता शिल्लक नसणे आणि दुसरा म्हणजे त्या चळवळीचे प्रभावक्षेत्र पूर्णपणे आक्रसणे. नक्षलवादाच्या बाबतीत पहिला निकष पूर्णपणे लागू करणे वास्तववादी ठरणार नाही. कारण एकही नक्षली उरलेला नाही, असा दावा आपण करु शकत नाही; मात्र हेही तितकेच खरे आहे की जेव्हा नक्षलवाद आपल्या सर्वोच्च टप्प्यावर होता, तेव्हा त्यांचे चार ते पाच हजार प्रशिक्षित कॅडर होते. आज ही संख्या अवघी शंभर ते दीडशे इतकी उरली असावी. या उर्वरितांची संघटनात्मक शक्तीही फारशी प्रभावी असण्याची शक्यता नाही. यातील दुसरा निकष मात्र अधिक महत्त्वाचा आहे, तो म्हणजे प्रभावक्षेत्र आक्रसणे. बस्तर हा नक्षलवादाचा बालेकिल्ला राहिला आहे. जर आपण त्याला केंद्र मानून एक वर्तुळाकार नकाशा काढला, तर ओडिशा, तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार आणि झारखंड यांसारख्या अनेक राज्यांमधील प्रदेश त्याच्या प्रभावाखाली येतील. नेपाळमध्येही डावी चळवळ सक्रिय होती. त्यामुळे 'पशुपती ते तिरुपती लाल कॉरिडॉर तयार करा' ही घोषणा पुढे आली. आता या कॉरिडॉरकडे लक्ष देणारे कोणीही नाही. नेपाळमध्ये नक्षलवाद्यांनी स्वतचा राजकीय पक्षही स्थापन केला खरा; पण नेपाळच्या जनतेने त्यांना या निवडणुकीत पूर्णपणे नाकारले आहे. दुसरीकडे, आपल्या सुरक्षा दलांनी दंडकारण्यात मोठ्या प्रमाणावर प्रवेश मिळवला आणि नक्षलवादाचा पाया कोसळू लागला.

नक्षलवादाविरोधात राबविण्यात आलेल्या रणनीतीत काही महत्त्वाचे टप्पे होते. सर्वप्रथम जंगलाच्या अंतर्गत भागांमध्ये सुरक्षा दलांची छावणी उभारण्यात आली. आज केंद्रीय राखीव पोलीस दल, सीमा सुरक्षा दल किंवा स्थानिक डीआरजीसारख्या दलांच्या छावण्या दाट जंगलांतही दिसतात. ही रणनीती मुख्यतः २०१० मध्ये झालेल्या दांतेवाडामधील नक्षली हल्ल्यानंतर आकाराला आली. त्या भीषण हल्ल्यामध्ये नक्षलवाद्यांनी सीआरपीएफच्या ७० पेक्षा अधिक जवानांचा बळी घेतला होता. या घटनेनंतर सरकार आणि सुरक्षा यंत्रणांनी नक्षलवादाविरुद्ध अधिक ठोस आणि सातत्यपूर्ण कारवाई करण्याचा निर्धार केला. परिणामी जंगलात सर्वत्र सुरक्षा छावण्या उभारल्या गेल्या आणि त्यामुळे नक्षलवादी संघटनांना नवीन भरती करणे कठीण जाऊ लागले.

या कालावधीत संघटनेच्या प्रमुख नेतृत्वावरही निर्णायक कारवाई झाली. काही प्रमुख नेते चकमकीत मारले गेले, तर काहींनी आत्मसमर्पण केले. अलीकडेच शस्त्रे खाली ठेवून समर्पण केलेला पापाराव हा कदाचित शेवटचा मोठा नेता ठरू शकतो. त्यामुळे नक्षलवादी चळवळीत आता पूर्वीसारखी ऊर्जा उरलेली नाही. जंगलात काही लहान गट अजूनही असू शकतात; परंतु संचारसुविधा मर्यादित असल्याने अनेकांना परिस्थितीतील बदलांची पूर्ण कल्पनाही नसावी. अशा परिस्थितीत पुढील काळात तेही आत्मसमर्पण करतील किंवा शांतपणे मुख्य प्रवाहात परत येतील, अशी शक्यता आहे. पंजाबमधील खलिस्तानी चळवळीच्या उतरत्या काळात अनेकांनी नद्या, विहिरी किंवा जमिनीत शस्त्रे लपवून सामान्य जीवन स्वीकारले होते. अशा लोकांनी जर कसलाही उपद्रव केला नाही तर पोलिसही त्यांना पकडत नाहीत. तसेच काहीसे चित्र नक्षलवादाबाबतही दिसू शकते.

नक्षलवादविरोधी धोरणाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास. गेल्या काही वर्षांमध्ये जंगलातील दुर्गम भागांतही रस्ते बांधण्यात आले, मोबाईल टॉवर उभारले गेले. त्यामुळे सुरक्षा दलांमधील संचार व्यवस्था मजबूत झाली आणि कारवाया अधिक अचूकपणे पार पाडता येऊ लागल्या. सशस्त्र दलाच्या जवानांना आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यात आले. नाईट व्हिजन उपकरणांबरोबरच ड्रोनचा वापर सुरू झाला. ड्रोनमुळे डोंगराळ भागांतील हालचालींवर दूरवरून लक्ष ठेवणे शक्य झाले. याशिवाय त्यांना अत्याधुनिक शस्त्रेही उपलब्ध करून देण्यात आली.

या सर्व प्रक्रियेत छत्तीसगड पोलिसांमध्ये झालेल्या परिवर्तनालाही मोठे महत्त्व आहे. या राज्याची निर्मिती झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात पोलिसांकडे मनुष्यबळ, प्रशिक्षण आणि साधनसामग्री यांची कमतरता होती. कित्येकदा रात्री अनेक ठाणी बंद ठेवावी लागत असत, अशी परिस्थिती होती. परंतु पुढील काळात पोलिस दलाची संख्या आणि क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात आली. आज तेथे सुमारे ७० ते ८० हजार पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. स्थानिक भाषा, भौगोलिक परिस्थिती आणि समाजरचना यांचे ज्ञान असल्यामुळे राज्य पोलिसांचे गुप्त माहिती जाळेही अधिक परिणामकारक ठरले. उदाहरणार्थ, नक्षलवादी गोंडीसारख्या स्थानिक भाषांचा वापर करतात, ज्यांचे आकलन केंद्रीय दलांना सोपे नसते; परंतु राज्य पोलिसांना त्यात प्रावीण्य असते. त्यामुळे प्रत्यक्ष कारवाईत त्यांची भूमिका निर्णायक ठरली.

आता पुढील टप्प्यात कोणती रणनीती असावी, हा प्रश्न उभा राहतो. अजूनही काही दुर्गम जंगल भागांमध्ये रात्री मुक्तपणे फिरणे आव्हानात्मक ठरू शकते; परंतु दिवसाच्या वेळेत पर्यटनाला प्रोत्साहन देण्याचा विचार करता येईल. दंडकारण्याचा प्रदेश धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही महत्त्वाचा आहे. रामायणपरंपरेनुसार श्रीरामांच्या वनवासाशी या प्रदेशाचा संबंध जोडला जातो. त्यामुळे या भागाचा पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची संधी उपलब्ध आहे. त्याचबरोबर उरलेल्या नक्षलवादी घटकांवर सतत लक्ष ठेवणेही आवश्यक आहे. राज्य पोलिसांनी आपला दबाव कमी करू नये. मात्र केंद्रीय सशस्त्र दलांची उपस्थिती हळूहळू कमी करण्याचा विचार केला जाऊ शकतो.

सध्या येथे सुमारे २०० सीआरपीएफ कंपन्या, ४० च्या आसपास बीएसएफ कंपन्या आणि २० ते २५ आयटीबीपी कंपन्या तैनात असल्याचे सांगितले जाते. टप्प्याटप्प्याने त्यांची माघार घेणे शक्य आहे. मात्र या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर खनिजसंपत्ती असल्याने लोखंड धातू आणि इस्पात क्षेत्रातील अनेक कंपन्या येथे कार्यरत आहेत. त्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही ढिलाई परवडणारी नाही. कारण अशा प्रकल्पांवर झालेला एखादा हल्ला नक्षलवाद्यांना पुन्हा चर्चेत आणू शकतो. त्याचप्रमाणे तुरुंग आणि पोलीस ठाण्यांची सुरक्षा मजबूत ठेवणेही गरजेचे आहे, कारण तेथून शस्त्रे लुटण्याचे प्रयत्न होऊ शकतात.

एकूणच पाहता, नक्षलवादमुक्त भारताचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरत असल्याचे चित्र दिसते. जर या चळवळीत पूर्वीसारखी ताकद उरली असती, तर प्रचारपत्रके किंवा इतर साहित्याद्वारे त्यांनी स्वतःची उपस्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला असता. गेल्या एक-दोन वर्षांत तसे काही विशेष दिसत नाही. विचारधारा पूर्णपणे नष्ट होत नाही, हे मान्य करावे लागते; परंतु दोन-तीन जिल्ह्यांत उरलेल्या काही मोजक्या नक्षलवाद्यांचे अस्तित्व आजच्या भारतासाठी मोठे आव्हान राहिलेले नाही.

●●●

# आरबीआयची कसोटी

**भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मागील काही काळ हा अत्यंत आशादायक आणि सुखावह ठरला होता. उच्च विकासदर आणि नीचांकी महागाई यांचे एक विलक्षण समीकरण देशात पाहायला मिळत होते. या स्थितीला अर्थशास्त्राच्या भाषेत 'गोल्डिलॉक्स पिरियड' असे संबोधले जाते. या काळात अर्थव्यवस्था अतीव भरारीतही नसते आणि मंदीतही नसते. अपेक्षित, योग्य वेगाने प्रगत होत असते. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी डिसेंबर महिन्यात या स्थितीचे वर्णन करताना ८ टक्के विकासदर आणि २.२ टक्के महागाई ही एक दुर्मीळ आणि आनंदाची बाब असल्याचे म्हटले होते. मात्र, जागतिक स्तरावर वेगाने बदलणाऱ्या भू-राजकीय परिस्थितीमुळे हा सुवर्णकाळ आता संपुष्टात येताना दिसत असून भारतीय अर्थव्यवस्थेची खरी कसोटी सुरू झाली आहे.**






♦ सीए संतोष घारे
अर्थतज्ज्ञ

विशेषतः, आखातामध्ये गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या युद्धसंघर्षाचा थेट परिणाम आता भारताच्या मॅक्रो-इकॉनॉमिक स्थिरतेवर होऊ लागला आहे. खास करून जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यातील अडथळे ही भारतासाठी चिंतेची बाब ठरत आहे. मागील आठवड्यात ट्रम्प यांनी युद्ध गुंडाळण्याचे संकेत दिल्यानंतर क्रूड ऑईलच्या भावात घसरण झाली होती; परंतु आता हे युद्ध दीर्घकाळ चालण्याचे संकेत मिळाल्यामुळे पुन्हा कच्च्या तेलाच्या भावांनी शंभरी ओलांडली आहे. तेलाचे वाढलेले दर पर्यायाने मालवाहतुकीचा खर्च वाढवतात. कच्चा माल महागल्यामुळे वस्तूंची भाववाढ अटळ होते. यामुळे भारतीय बाजारपेठेत महागाईचा भडका उडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत रिझर्व्ह बँकेने काही काळासाठी यशस्वीपणाने टाळलेला क्लिष्ट पेच पुन्हा एकदा उभा ठाकला आहे. हा पेच म्हणजे आर्थिक विकासाला गती द्यायची की वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर पावले उचलायची.

वस्तुतः, काही महिन्यांपूर्वीपर्यंत भारताचे आर्थिक चित्र अतिशय सुस्पष्ट आणि सकारात्मक होते. देशांतर्गत मागणी जोरात होती, सार्वजनिक गुंतवणुकीचा ओघ सुरू होता आणि बँकिंग क्षेत्रातील तरलता देखील समाधानकारक होती. मात्र, आता हे संतुलन बिघडताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या किमतींनी मानसिक पातळी ओलांडल्यामुळे आयात होणाऱ्या महागाईचा धोका वाढला आहे. भारत आपल्या गरजेच्या मोठ्या प्रमाणावर खनिज तेल आयात करतो, त्यामुळे जागतिक बाजारातील दरवाढीचा थेट परिणाम देशांतर्गत वाहतूक खर्च आणि उत्पादन खर्चावर होतो. जेव्हा कच्चा माल महाग होतो, तेव्हा त्याचा अंतिम बोजा ग्राहकांच्या खिशावर पडतो. हे दुष्टचक्र आता सुरू झाले असून त्याचे पडसाद घाऊक आणि किरकोळ महागाईच्या आकडेवारीत उमटू लागले आहेत.

महागाईचा हा प्रश्न केवळ तेलापुरता मर्यादित नाही. जागतिक व्यापार मार्गांमध्ये निर्माण झालेले अडथळे आणि दीर्घ सागरी प्रवासामुळे मध्यवर्ती वस्तूंच्या किमतीतही वाढ झाली आहे. ही दरवाढ हळूहळू किरकोळ बाजारपेठेपर्यंत पोहोचते, ज्याला अर्थशास्त्रात 'पास-थ्रू इफेक्ट' म्हटले जाते. रिझर्व्ह बँकेसाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक आहे कारण चलनविषयक धोरणाचे परिणाम दिसून येण्यासाठी काही काळ जावा लागतो. सध्याच्या अनिश्चित वातावरणात महागाईचा नेमका अंदाज वर्तवणे आणि त्यानुसार व्याजदरात बदल करणे हे एक जोखमीचे काम बनले आहे. केवळ उच्च महागाईच नाही, तर महागाईतील चढ-उतार (व्होलॅटिलिटी) हे अर्थव्यवस्थेसाठी अधिक घातक ठरू शकतात.

दुसरीकडे, आर्थिक विकासाच्या आघाडीवरही चिंतेचे ढग जमा होऊ लागले आहेत. जरी २०२६ च्या सुरुवातीला भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग कायम होता, तरीही आता काही क्षेत्रांमध्ये मंदावल्याची चिन्हे दिसत आहेत. कंपन्यांच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे त्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होत आहे. जागतिक अनिश्चिततेमुळे नवीन गुंतवणुकीबाबत उद्योजकांमध्ये सावधगिरीचे वातावरण आहे. जागतिक अर्थव्यवस्था ऊर्जा दरवाढीच्या ओझ्याखाली दबली गेली, तर भारताच्या निर्यातीवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. अशा वेळी जर रिझर्व्ह बँकेने महागाई रोखण्यासाठी व्याजदरात वाढ केली, तर त्यामुळे आधीच मंदावलेला विकासदर अधिकच खाली जाण्याची भीती आहे. याउलट, जर विकासाला प्राधान्य देऊन व्याजदर कमी केले तर महागाई हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

येत्या ८ एप्रिल रोजी होणारी रिझर्व्ह बँकेची पतधोरण समितीची बैठक ही या अर्थाने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. ही बैठक म्हणजे अनिश्चिततेच्या काळात रिझर्व्ह बँकेच्या निर्णयक्षमतेची मोठी चाचणी असेल. रिझर्व्ह बँकेला आता हे ठरवावे लागेल की, सध्याची महागाई ही केवळ तात्पुरती आणि पुरवठा साखळीतील त्रुटींमुळे आहे की ती दीर्घकालीन संकटाची नांदी आहे. जर हा केवळ तात्पुरता धक्का असेल, तर व्याजदरात बदल न करता परिस्थितीवर लक्ष ठेवणे योग्य ठरेल. मात्र, जर महागाईची मुळे खोलवर रुजली असतील, तर कठोर पावले उचलणे अपरिहार्य ठरेल. चुकीच्या वेळी घेतलेला चुकीचा निर्णय बाजारात भीतीचे वातावरण निर्माण करू शकतो.

पारंपरिक चलनविषयक धोरणांच्या मर्यादाही आता स्पष्ट होऊ लागल्या आहेत. केवळ व्याजदर वाढवून रिझर्व्ह बँक जगात तेलाचे उत्पादन वाढवू शकत नाही किंवा विस्कळीत झालेली पुरवठा साखळी पूर्ववत करू शकत नाही. ही साधने केवळ मागणीवर नियंत्रण मिळवण्यासाठी उपयुक्त ठरतात. अशा वेळी सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्यातील समन्वय महत्त्वाचा ठरतो. इंधनावरील कर कमी करून सरकार तात्पुरता दिलासा देऊ शकते, परंतु याचे राजकोषीय तुटीवर होणारे परिणाम दुर्लक्षित करून चालणार नाही. सरकारी तिजोरीवर पडणारा हा ताण दीर्घकाळ सहन करणे कठीण असते. अशा कठीण प्रसंगी रिझर्व्ह बँकेचा संवाद आणि त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. गुंतवणूकदार आणि सामान्य जनता यांच्यामध्ये विश्वास निर्माण करणे हे मध्यवर्ती बँकेचे प्रमुख कार्य आहे. कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा निर्णयातील विलंब बाजारात अस्थिरता निर्माण करू शकतो. लवचिकता राखून आणि वस्तुनिष्ठ डेटावर आधारित निर्णय घेऊनच या संकटातून मार्ग काढता येईल.निर्णय घेताना बदलत्या जागतिक परिस्थितीचा वेध घेणे आणि वेगाने पावले उचलणे ही काळाची गरज आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची लवचिकता आणि धोरणकर्त्यांचे चातुर्य यांचा हा खऱ्या अर्थाने कस पाहणारा काळ आहे.

●●●

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# आनंदावर विरजण घालणारा वाहन अपघात

**नाशिक** जवळच्या दिंडोरी येथे झालेला काहीसा विचित्र अपघात अत्यंत हृदयद्रावक आहे. खाजगी क्लासेसने आयोजित केलेले स्नेहसंमेलन आटोपून एकाच कुटुंबातले काही सदस्य आणि विद्यार्थी असे कारने निघाले असताना जिथे कार्यक्रम आयोजित केला होता त्या लॉनच्या लगत पाण्याने भरलेली विहीर होती. परंतु ती लक्षात आली नाही आणि गाडी थेट विहिरीत कोसळली. ज्यामध्ये जवळपास सात विद्यार्थ्यांचा आणि तीन अन्य लोकांचा मृत्यू व्हावा ही घटना इतकी अचंबित करणारी आणि धक्का देणारी ठरते. रात्री दहाच्या सुमारास हा अपघात घडल्याने कोणतीही मदत वेळेवर उपलब्ध होऊ शकली नाही. विहीर पूर्ण भरली असल्याने कोसळलेली कार थेट तळाला गेली आणि या बंद कारमधून आतल्या लोकांना बाहेर पडणेदेखील अशक्य झालेले दिसते. या अपघाताची एकूणच परिस्थिती अंगावर काटा आणणारी ठरते. कोणता प्रसंग कसा आणि किती अनाकलनीय पद्धतीने घडेल हे काही सांगता येत नाही. आपण नेहमीच अशा घटना घडल्यानंतर नियतीला दोष देतो. अर्थातच घडलेला अपघात ज्या परिस्थितीत होता आणि जेव्हा त्यात विद्यार्थी, महिला, यांच्यासारख्यांचे बळी जातात त्यावेळेला नियतीनेच केलेला तो दुर्दैवी आघात ठरतो. नुकताच अवकाळी पाऊस होऊन गेला असल्याने शेतातल्या या विहिरीत भरपूर पाणी होते. यातला आश्चर्याचा आणि धोकादायक भाग असाच आहे की विहिरीला कठडा नसल्याने ही बाब चालकाच्या लक्षात आली नाही. परंतु कार्यक्रमाला जाताना ज्या मार्गाने हे वाहन गेले असेल त्यावेळी त्या विहिरीची थोडीफारही कल्पना आली नसावी का की परतताना गाडी चालकाने वेगळ्या मार्गाने जायचा निर्णय घेतला आणि त्यातून हा प्रकार घडला. शिवाय इतक्या शेतालगत किंवा उघड्या विहिरीलगत असा मोठा कार्यक्रम होत असताना कोणतीच दक्षता का बाळगली गेली नाही. यासारखे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

### स्नेह संमेलनाचे दुर्दैवी निमित्त

खाजगी क्लासच्या स्नेहसंमेलनाचे निमित्त अशा प्रकारे जीवघेणे ठरावे. ही अत्यंत दुर्दैवी घटना ठरते. रस्ते किंवा वाहन अपघात हे अलिकडच्या काळात इतके नित्याचे झाले आहेत की दरवर्षी देशभरात लाखो लोकांचे बळी जातात. काहीसा असाच प्रकार कोल्हापूरजवळच्या नातेपुते खेड्याजवळ घडला आणि एक एसयूव्ही कार निरा नदीच्या कॅनॉलमध्ये कोसळली. त्यातही गाडीत बसलेले कुटुंब ठार झाले तर त्यांची मुलगी बेपत्ता असल्याचे समोर आलेले आहे. वाहनांची वाढणारी संख्या आणि एकूणच वाहन चालवताना घ्यावयाची दक्षता हा विषय अधिकाधिक गंभीर होत चालला आहे. अनेक प्रकारचे सुरक्षा विषयक नियम असूनही ते पाळले जात नाहीत. गाडी चालवण्यासाठी परवाना आवश्यक असतोच. परंतु आजकाल अनेक ठिकाणी कुटुंबातील लोक अठरा वर्षाच्या खालील मुलांनादेखील परवाना नसताना गाड्या चालवायला देतात.महानगरांमध्ये तरूण विद्यार्थ्यांबाबत हा प्रकार सर्रासपणे होतो. उत्साहाच्या भरात आणि वेगाने गाडी चालवण्याचा जोश त्यातूनही गाडी चालवण्याचा पूर्ण अनुभव नसताना केले जाणारे हे प्रकार अपघातांना आमंत्रण देणारे ठरले आहेत. दिंडोरीत किंवा निरा नदीतला अपघात या दोन्ही घटना वाहन सुरक्षितता आणि चालकाची सावधानता या दोन्ही गोष्टी अधोरेखित करणाऱ्या ठरतात. रस्त्यावर रोज हजारो वाहनं धावत असतात. अनेकवेळेला वेळ वाचवण्याच्या उद्देशाने वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवले जात नाही. वाहनांची संख्यादेखील भरपूर असल्याने कोणत्यावेळी कोणत्या वाहन चालकाचा वाहनावरचा ताबा सुटेल हेदेखील सांगता येत नाही. एकूणच सातत्याने वाढत असलेले वाहन अपघातांचे प्रकार चिंताजनक आहेतच. मात्र यासाठी सावधानता आणि सुरक्षितता हे दोनच खात्रीचे उपाय ठरू शकतात. कोणत्याही प्रकारचे अनाठायी धाडस किंवा जोखीम त्रासदायक ठरू शकते. किंबहुना अतीआत्मविश्वासाने चालवलेले वाहनही अपघाताला आमंत्रण देणारे ठरू शकते. गेल्या अनेक वर्षापासून रस्त्यांची दूर्दशा हे वाहन अपघातांचे कारण होते. परंतु आता रस्ते, मोठ्या प्रमाणावर चांगले केले जात आहेत आणि अधिक सुसज्ज असलेले हे रस्ते चित्रविचित्र अपघातांमुळेदेखील दूर्घटनांचे कारण ठरत आहेत.

### योग्यवेळी योग्य धडा घेणे गरजेचे

बदलती जीवनशैली आणि पूर्वीपेक्षा हातामध्ये खेळणारा अधिकचा पैसा यातून वाहनांसारखी सुखसोय प्रत्येकाला आकर्षित करते आहे. स्वतःचे चारचाकी वाहन असणे हा संबंधित व्यक्ती किंवा कुटुंबाच्या श्रीमंतीचा प्रतिष्ठेचा किंवा आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी असल्याचे निदर्शक ठरते. स्वतःचे वाहन असणे म्हणजे अनेक प्रकारे सोयीनुसार प्रवास करता येतो. मुळात म्हणजे वेळेची बचत होत असल्याने कुटुंबांसकट प्रवास करणे अनेकांसाठी आनंददायक ठरते. परंतु जर योग्य पद्धतीची काळजी किंवा सुरक्षितता बाळगली नाही तर हेच वाहन अपघाताचे कारण ठरते आणि आनंदावर विरजण घालणारेही म्हणावे लागते. दिंडोरी आणि कोल्हापूरजवळचा अपघात असाच आनंदावर विरजण घालणारा किंबहुना आनंदाला ग्रहण लावणारे अत्यंत दुर्दैवी अपघात ठरतात. दिंडोरी प्रकरणामध्ये सहा-सात विद्यार्थ्यांचा झालेला दुर्दैवी मृत्यू हा मनाला चटका लावणारा ठरतो. आज संबंधित कुटुंबावर किती भयंकर आघात कोसळला असेल याची आपण कल्पनाही करू शकत नाही. असे अनेकवेळेला म्हटले आहे की अपघाताला कोणतेही कारण पुरते. मग वाहनांच्या समोरासमोर होणाऱ्या टकरी पाहून झाडावर, रोड डिव्हायडरवर वाहन आदळण्यापर्यंत किंवा अनेकवेळेला वळणावळणाच्या रस्त्यावर घाटामध्ये वाहन दरीत कोसळण्यापर्यंतचे प्रकार पाहायला मिळतात. आता तर इलेक्ट्रीकवर चालणारी वाहने मोठ्या संख्येने येत आहेत. त्यातून चालत्या वाहनांना आगी लागण्याचे प्रकार घडू लागले आहेत. सामाजिकदृष्टया या गोष्टींचा विचार करताना अशा प्रकारातून वेळीच योग्य तो धडा घेणे अत्यंत गरजेचे ठरते.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

चिमूटभर संकटाला घाबरून
आभाळाइतकी स्वप्न मातीमोल करायची नसतात.

## पंचांग





रवी उदय- ०६-३१,
रवी अस्त- १८-५२

रविवार ५ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर
* चैत्र कृष्ण तृतीया
नक्षत्र - विशाखा

जन्मराशी :-
००-०१ ते १७-२७ तूळ
१७-२८ ते २४-०० वृश्चिक

संकट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ९.४७; इस्टर डे;
दुर्गादेवी रथयात्रा-आंजर्ले

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### कुरकुरीत उडीद वडा



★**साहित्य :**
एक वाटी उडीद डाळ, थोडीशी मूग डाळ, एक कांदा, दोन मिरच्या,थोडे जिरे, एक डहाळी कढीपत्ता

★**कृती :** रात्री उडीद व मूग डाळ एकत्र भिजत घालणे, सकाळी कमी पाण्यात वाटून घेणे, वाटुन झाल्यावर चमच्याने चांगले फेटून घेणे, म्हणजे वाटलेली डाळ हलकी होते, चवीपुरतं मीठ, जिरे, कढीपत्ता चिरुन, मिरच्या बारीक चिरून व एक कांदा बारीक चिरून घालणे, कढईत तेल चांगले तापले की, आच मध्यम करणे, हाताने किंवा चमच्याने गोल वडे टाकणे. दोन्हीकडून खरपुस तळले गेले की बाहेर काढणे पुढचा घाणा टाकणे.

पुढचा घाणा होईपर्यंत खाली काढलेले वडे गार होतात. मग ते हाताने हलकेच दाबून चपटे करावे व परत तळायला टाकावे आता हे वडे पूर्वीच तळले असल्याने लगेचच तळून होतात असेच पुढच्या घाण्यावेळी ही करावे हे वडे अतिशय कुरकुरीत होतात यासोबत नारळ आणि पुदिना याची चटणी रुचकर लागते.

## क्रीडा

# दिल्लीचा ६ गडी राखून सलग दुसरा विजय

## रिझवीच्या धडाकेबाज खेळीपुढे मुंबई नतमस्तक

**समीर रिझवीच्या ५१ चेंडूत ९० धावांच्या धडाकेबाज खेळीच्या जोरावर आज दिल्ली कॅपिटल्सने मुंबई इंडियन्सवर ६ गडी आणि ११ चेंडू शिल्लक राखून सलग दुसरा विजय मिळवला. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या आठव्या सामन्यात आजारी असलेल्या हार्दिक पंड्याच्या अनुपस्थितीत मुंबई इंडियन्सने निर्धारित ६ बाद १६२ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्सने १८.१ षटकांत ४ बाद १६३ धावा ठोकल्याने मुंबईला या हंगामातील पहिला पराभव पत्करावा लागला. रिझवीला सामनावीर म्हणून घोषित केले.**



■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य ठरवत दिल्लीच्या गोलंदाजांनी सुरुवातच प्रभावी मारा करून मुंबईच्या फलंदाजांना मोठे फटके मारू दिलेच नाही. मुंबईची धावसंख्या २.२ षटकांत १८ झाली असताना रायन रिकेल्टन ९ धावा करून झेलबाद झाला. त्याला मुकेश कुमारने माघारी धाडले. मग याच षटकाच्या पाचव्या चेंडूवर तिलक वर्मा ० धाव करून तंबूत परतल्यामुळे मुंबईचा डाव संकटात सापडला. परिणामी रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांना सावध फलंदाजी करावी लागली. या अनुभवी जोडीने मुंबईची धावसंख्या ९.२ षटकांत २ बाद ७१ वर पोहोचवताच पुढच्या चेंडूवर रोहित २६ चेंडूंत ३५ धावा करून अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. शेर्फेन रदरफोर्डला ५ धावांवर विप्रज निगमने बाद केले. मग नमन धीर आणि सूर्यकुमार यांनी ३७ धावांची भागिदारी केली. लुंगीच्या १६ षटकांच्या तिसऱ्या चेंडूवर सूर्यकुमार पायचित झाला. त्याने ३६ चेंडूंत २ षटकार आणि ३ चौकारांसह ५१ धावा केल्या. दिल्लीच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करुन फलंदाजांना अंकुश ठेवले. परिणामी नमन धीरने २८ धावा करुन बाद झाल्यानंतर मिचेल सँटनरने नाबाद १८ आणि कॉर्बिन बॉश नाबाद ११ धावा केल्यामुळे मुंबईला निर्धारित षटकांत ६ बाद १६२ धावांपर्यंत मजल मारता आली.

या धावसंख्येचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीचा सलामीवीर के.एल. राहुल पुन्हा फेल झाला आणि दीपक चहरच्या पहिल्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर राहूल ३ चेंडूंत १ धावा करुन माघारी परतला. नितीश राणाला साधा भोपाळही फोडता आला नाही. तो धावचित झाल्याने दिल्लीची अवस्था १.४ षटकांत २ बाद ७ धावा अशी झाली. या नाजूक परिस्थितीत सलामीवीर पाथुम निस्संका आणि समीर रिझवी या जोडीने मुंबईच्या गोलंदाजांवर आक्रमण करून चौकार आणि षटकार ठोकले. त्यांनी तिसऱ्या विकेटसाठी ६६ धावांची महत्वाची भागिदारी केली. मग सँटनरने निस्संकाला ४४ धावांवर झेलबाद केले. डेव्हिड मिलरची साथ घेऊन रिझवीने धावगती कायम ठेवली. मात्र त्याने ५१ चेंडूंत ७ षटकार आणि ७ चौकारांसह ९० धावा केल्यानंतर कॉर्बिन बॉशने त्याला तंबूत धाडले. मात्र तोपर्यंत मुंबईच्या हातून हा सामना निसटला होता.अखेर डेव्हिड मिलर नाबाद २१ आणि ट्रिस्टन स्टब्स नाबाद ३ धावा करून संघाला १८.१ षटकांत विजय मिळवून दिला.

# हैदराबादला आज लखनौ टक्कर देणार

## बंगळुरूविरुद्ध चेन्नई तिसरा पराभव टाळणार



■ हैदराबाद

**लखनौचा** संघ विजयाचे खाते उघडण्याचा प्रयत्न करणार आहे. मात्र सनरायझर्स हैदराबादला नमवणे लखनौसाठी सोपे नसणार आहे. सनरायझर्स हैदराबादचा हा तिसरा सामना असणार आहे. पहिल्या सामन्यात पराभव झाल्यानंतर दुसऱ्या सामन्यात विजय मिळवला. आयपीएलमध्ये आतापर्यंत हैदराबाद आणि लखनौमध्ये ६ सामने झाले आहेत. त्यातील ४ सामने लखनौने जिंकले आहेत, तर हैदराबादने २ विजय मिळवले.

हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्मा, ट्रॅव्हिस हेड, ईशान किशन, हेनरिक क्लासेन, अनिकेत वर्मा यांना चांगली कामगिरी करणे गरजेचे आहे. नाहीतर दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागेल. लखनौमध्ये ऑस्ट्रेलियाचा टी२० कर्णधार मिचेल मार्श, दक्षिण आफ्रिकेचा एडन मार्कराम, कर्णधार ऋषभ पंत आणि स्फोटक फलंदाज निकोलस पूरन यासारखे मजबूत फलंदाज आहेत. त्यांच्यासमोर हैदराबादच्या गोलंदाजांना गोलंदाजी करून सोपे नसणार आहे. पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत कर्णधारपद भूषवणाऱ्या इशान किशननेही चांगली कामगिरी केली, तर हेनरिक क्लासेनच्या अनुभवामुळे मधली फळी मजबूत झाली आहे.

भारतीय अष्टपैलू खेळाडू नितीश कुमार रेड्डीने आपल्या अष्टपैलू कामगिरीने प्रभावित केले. चेन्नईविरुद्ध बंगळुरूचा हा दुसरा सामना असून पहिल्या सामन्यात बंगळूरूने हैदराबादला हरवले होते.

## अफझल आणि सुशांतची आगेकूच

**मुंबई** - विलेपार्लेच्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात रोटरी क्लब ऑफ मुंबई पार्लेश्वरच्या वतीने सुरू असलेल्या ६ व्या राज्य कॅरम स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या तिसऱ्या फेरीत अफझल खानने ओमकार नेटकेवर २०-१९, १८-१५ आणि २१-१४ असा चुरशीचा विजय मिळवून चौथी फेरी गाठली. तर सुशांत वैराटने अस्लम चिकतेला ३ सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत १५-१६, १८-८ व २५-१२ असे हरवून आगेकूच केली. पुरुष एकेरी तिसऱ्या फेरीत सिद्धांत वाडवलकरने रुपेश मोहोळवर २५-०, २५-७, सुरज कुंभारने श्रीशान पालवनकरवर २५-१३, २५-२, रहीम खानने सूर्यकांत मोरेवर २५-०असा विजय मिळवला.

# राजस्थानचा गुजरातवर ६ धावांनी सणसणाटी विजय

■ अहमदाबाद

**अहमदाबादच्या** नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्ध आज झालेला ९ वा सामना राजस्थान रॉयल्सने ६ धावांनी जिंकला. गुजरातचा हा सलग दुसरा पराभव आहे. प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानने दिलेल्या २११ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातने ८ बाद २०४ धावा केल्या. त्यामुळे राजस्थानने या स्पर्धेत सलग दुसरा विजय मिळवला.

राजस्थानकडून ध्रुव जुरेलने सर्वाधिक ४२ चेंडूंत ७५ धावा केल्या. तर यशस्वी जयस्वालने ३६ चेंडूंत ५५ आणि वैभव सूर्यवंशीने १८ चेंडूत ३१ धावा ठोकल्या. गुजरातचा कागिसो रबाडाने दोन गडी बाद केले. गुजरातकडून फलंदाजीत साई सुदर्शनने ४४चेंडूंत ३ षटकार आणि ९ चौकारांसह ७३ धावा केल्या. त्यानंतर जोस बटलरने १४ चेंडूंत २६ धावा केल्या. रशीद खान आणि कागिसो रबाडा यांनी चांगली फटकेबाजी करून सामना शेवटपर्यंत नेला आणि या जोडीसमोर विजयासाठी शेवटच्या १२ चेंडूत १५ धावांची गरज होती. जोफ्रा आर्चरने १९ व्या षटकात फक्त ४ धावा दिल्या. मग विजयासाठी शेवटच्या ६ चेंडूंत ११ धावांची आवश्यकता होती. तुषार देशपांडेने भेदक मारून २० व्या षटकात ४ धावा दिल्याने राजस्थान रॉयल्सने सामना ६ धावांनी जिंकला.

# विश्वविजेती शीतल देवीला पराभूत करून पायल नागने सुवर्णपदक पटकाविले

■ बँकॉक

**बँकॉक** येथे झालेल्या पॅरा तिरंदाजी मालिकेच्या महिलांच्या कंपाऊंड अंतिम सामन्यात भारताच्या पायल नागने भारताची



विश्वविजेती शीतल देवीचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. अंतिम सामन्यात १८ वर्षीय पायलने १३९-१३६ अशा फरकाने हा सामना जिंकला. वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्तरावरील पायलचे हे पहिले सुवर्णपदक आहे.

बँकॉकमधील भारतीय वर्चस्व केवळ महिलांच्या कंपाऊंड अंतिम फेरीपुरते मर्यादित नव्हते. पुरुषांच्या कंपाऊंड वैयक्तिक गटात श्याम सुंदर स्वामीने शूट-ऑफमध्ये स्वदेशीय राकेश कुमारचा पराभव करून कांस्यपदक जिंकले. दोन्ही तिरंदाजांनी समान १४३ गुण मिळवले, परंतु टाय-ब्रेकरमध्ये स्वामीने १० गुण मिळवले, तर राकेशला केवळ ९ गुण मिळवता आले. शीतल देवी उत्कृष्ट फॉर्ममध्ये होती आणि २०२५ च्या शानदार हंगामानंतर तिला 'वर्ल्ड आर्चरी'ची 'पॅरा आर्चर ऑफ द इयर' म्हणूनही गौरविण्यात आले होते.

## स्लो ओव्हर रेटमुळे श्रेयसला २४ लाखांचा दंड

**चेन्नई** - आयपीएलच्या ७ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध विजय मिळवलेल्या पंजाब किंग्ज संघावर बीसीसीआयने कारवाई केली. स्लो ओव्हर रेटमुळे कर्णधार श्रेयस अय्यरला २४ लाखांचा दंड ठोठावला. या हंगामातील पंजाब किंग्जचा हा दुसरा ओव्हर-रेट गुन्हा आहे. त्यामुळे केवळ कर्णधारालाच नाही, तर संपूर्ण प्लेइंग इलेव्हन आणि इम्पॅक्ट प्लेयरलाही दंड ठोठावला. इतर सर्व खेळाडूंवर ६ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या २५ टक्के, यापैकी जी रक्कम कमी असेल, तेवढा दंड ठोठावण्यात आला.

## टागोर नगर मंडळाची कबड्डी स्पर्धा

# स्नेहविकास मंडळ अंतिम फेरीत दाखल

■ मुंबई

**टागोर** नगर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेच्या महिला गटात स्नेहविकास मंडळाने अंतिम फेरीत धडक दिली. पुरुष गटात ५-५ चढायाच्या डावात ओवळी मंडळाने उपांत्य फेरी गाठली. विक्रोळी पूर्व येथील साईबाबा मंदिर शेजारील मैदानातील मॅटवर झालेल्या महिलांच्या उपांत्य फेरीत भांडुपच्या स्नेहविकास मंडळाने कांजूरच्या स्वराज्य मंडळाचा प्रतिकार २३-१४ असा मोडून काढत अंतिम फेरीत धडक दिली. स्नेहविकासची अंतिम लढत एसआयईएस संघाशी होईल.



आक्रमक सुरुवात करणाऱ्या स्नेहविकासने पहिला लोण देऊन विश्रांतीला १६-०५ अशी भक्कम आघाडी घेतली. त्यानंतर सावध खेळ करत आपला विजय निश्चित केला.

पुरुषांच्या उपांत्यपूर्व सामन्यात घाटकोपरच्या ओवळी मंडळाने कुर्ल्याच्या अंबिका मंडळाचा तगडा विरोध ५-५ चढायांच्या डावात ३०-२७(७-४) असा मोडून काढला. पूर्वार्धात १५-०८ अशी आघाडी घेणाऱ्या ओवळी मंडळाला अंबिकाने पूर्ण डावात २३-२३ असे बरोबरीत रोखले. पण ५-५ चढायात पुन्हा ओवळी मंडळाने ७-४ अशी बाजी मारली. कीर्तिक कासुर्डे, प्रभू यादव यांचा खेळ ५-५ चढायात कमी पडल्याने अंबिकाला पराभवाचा सामना करावा लागला. या अगोदर झालेल्या सामन्यात ओवळी मंडळाने जय भवानी मंडळावर २७-२३ अशी मात करीत आगेकूच केली होती.

देश विदेश

# मध्य प्रदेशात काँग्रेसच्या आमदाराचे मध्यरात्री अधिसूचना काढून निलंबन



■ भोपाळ

**मध्य** प्रदेशमधील काँग्रेसचे आमदार राजेंद्र भारती यांना बँकेची फसवणूक केल्या प्रकरणी दिल्ली न्यायालयाने तीन वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावल्यानंतर त्याच दिवशी मध्यरात्री विशेष बाब म्हणून सचिवालयाचे कामकाज काही वेळासाठी सुरू करण्यात आले आणि तातडीने अधिसूचना काढून भारती यांचे तीन वर्षांसाठी निलंबन करण्यात आले.या घडामोडीवर सरकारची ही कारवाई म्हणजे लोकशाही प्रक्रियेची हत्या आहे, अशी जळजळीत टीका काँग्रेसने केली.

मध्य प्रदेशमध्ये भाजपाची सत्ता आहे.तत्कालीन गृहमंत्री आणि भाजपाचे दिग्गज नेते नरोत्तम मिश्रा यांचा २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत राजेंद्र भारती यांनी दारुण पराभव केला होता.

या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपाने भारती यांच्यावर सूड भावनेने निलंबनाची कारवाई केली, असा काँग्रेसचा आरोप आहे.कायदे तज्ज्ञांनीदेखील सचिवालयाने केलेली कारवाई बेकायदेशीर आहे,असे मत व्यक्त केले आहे. कारण न्यायालयाने भारती यांना दोषी ठरवून शिक्षा सुनावली असली तरी त्यांना या निकालाविरोधात वरच्या न्यायालयात अपिल करण्यासाठी ६० दिवसांची मुदत दिली असून तोपर्यंत शिक्षेला स्थगिती दिली आहे.

दुसरीकडे सचिवालयाचे प्रधान सचिव अरविंद शर्मा यांनी कारवाईचे समर्थन केले. घटनेच्या कलम १९१(१)(सी) अन्वये ही कारवाई योग्य आहे, असा दावा शर्मा यांनी केला आहे.

# पाकिस्तानात शेण कर प्रस्ताव सरकार- विरोधक आमनेसामने

■ पंजाब

**पाकिस्तानच्या** पंजाब प्रांतात गाई आणि म्हशी पाळणाऱ्यांवर शेण कर लावण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मरियम नवाज यांच्या सरकारकडून प्रत्येक जनावरामागे दररोज सुमारे ३० पाकिस्तानी रुपये शुल्क आकारण्याची योजना तयार केली जात आहे.

सरकारकडून या योजनेला हरित ऊर्जा उपक्रम म्हणून सादर करण्यात येत असून ती सुथरा पंजाब बायोगॅस कार्यक्रमाचा भाग असल्याचे सांगितले जात आहे. डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झालेल्या या योजनेचा उद्देश कचरा व्यवस्थापन करणे आणि त्यापासून बायोगॅस निर्मितीद्वारे ऊर्जा तयार करणे हा आहे. विरोधकांनी या प्रस्तावावर जोरदार टीका करत त्याला शेण कर असे नाव दिले आहे. सरकार आर्थिक दबावाखाली असून विविध मार्गांनी महसूल गोळा करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. आधीच महागाई



आणि चाऱ्याच्या वाढत्या किमतींमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर हा अतिरिक्त भार टाकला जात आहे. या योजनेअंतर्गत पंजाबमधील सुमारे १६८ पशु वसाहती (कॅटल कॉलनी) निश्चित करण्यात आल्या असून जवळपास ५० लाख गाई-म्हशींवर हा कर लागू होऊ शकतो.

# दोन अब्ज डॉलर १७ एप्रिलपर्यंत परत द्या

■ दुबई

**पाकिस्तानला** दिलेले २ अब्ज डॉलरचे कर्ज १७ एप्रिलपर्यंत परत करण्याचा तगादा संयुक्त अरब अमिरातीने (युएई) लावला. पाकिस्तानसाठी हा केवळ आर्थिक फटका नसून एक मोठे राजकीय संकट आहे.

२०१८ मध्ये पाकिस्तानला यूएईने मदतीचा हात पुढे करत २ अब्ज डॉलरचे कर्ज दिले होते. सुरुवातीला पाकिस्तान यावर वार्षिक १३० दशलक्ष डॉलर व्याज देत होता. मात्र, नंतर यूएईने हे व्याजदर

**युएईचा पाककडे तगादा**

३ टक्क्यांवरून थेट ६.५ टक्क्यांपर्यंत वाढवले. आता जेव्हा इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यात युद्ध सुरू आहे, तेव्हा यूएईने या कर्जाची 'तात्काळ' वसुली सुरू केली आहे. पाकिस्तानला सध्या ही रक्कम भरण्यास सांगितले आहे. मात्र पाकिस्तानच्या तिजोरीत खडखडाट आहे, ज्यामुळे पाकिस्तानवर दिवाळखोरीची टांगती तलवार आहे. पाकिस्तान सध्या एका विचित्र कोंडीत अडकला. एकीकडे इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष थांबवण्यासाठी पाकिस्तान मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, दुसरीकडे यूएई आणि डोनाल्ड ट्रम्प प्रशासन इराणवर कडक कारवाईच्या बाजूने आहेत. पाकिस्तानचे शांततेचे हे प्रयत्न यूएईला रुचलेले नाहीत. आपल्या धोरणात्मक हितांच्या आड येणाऱ्या पाकिस्तानला आर्थिकदृष्ट्या जेरीस आणण्यासाठी यूएईने लोन कार्ड वापरले आहे.

# पाकिस्तानातून पळून आलेल्या सीमाने मुलाचे नाव ठेवले 'भारत'

■ नोएडा

**पाकिस्तानातून** भारतात पळून आलेली सीमा हैदर पुन्हा एकदा आई झाली आहे.तिने आपल्या सहाव्या मुलाचे नाव 'भारत' असे ठेवले आहे.नोएडातील रबपूरा येथील घरी बारशाचा कार्यक्रम झाला. यावेळी सीमा हैदर म्हणाली की, नामकरण सोहळ्यापूर्वी घरी गोंधळ-जागरण कार्यक्रम आयोजित केला.हिंदू धर्मात जेव्हा मुलाचा जन्म होतो, तेव्हा त्याचे नामकरण करण्यात येते. घरात जागरण घालण्यात येते. माझ्या घरात परंपरेनुसार या सर्व गोष्टी घडल्याने चांगले वाटत आहे.मुलाचा नामकरणाचा सोहळा धुमधडाक्यात पार पडला. आम्ही भटजीकडून बाळाचे नाव काढले. तेव्हा अद्याक्षर 'भ' आले.



अशावेळी भारत या नावापेक्षा दुसरे सुंदर नाव असूच शकत नाही. त्यामुळे आम्ही 'भारत' हे नाव ठेवले. सीमा हैदरने यावर्षी १८ फेब्रुवारी रोजी नोएडातील एका रुग्णालयात मुलाला जन्म दिला. यापूर्वी तिने एका मुलीला जन्म दिला.

# नॅशनल हेराल्ड प्रकरणी हुडा, व्होरा निर्दोषमुक्त

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

**पंचकुला** - नॅशनल हेराल्ड प्रकरणाशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या मालमत्ता प्रकरणात पंचकुला येथील ईडी न्यायालयाने हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भुपेंद्र सिंह हुडा आणि मोतीलाल व्होरा यांना निर्दोषमुक्त केले आहे. याआधी सीबीआय कोर्टानेही त्यांना याच प्रकरणात मुक्त केले होते. त्यामुळे आता हा खटला पूर्णपणे बंद झाला आहे. पंचकुला येथील विशेष ईडी न्यायालयाने भूपेंद्र सिंग हुडा आणि मोतीलाल व्होरा यांच्याविरोधात सबळ पुरावे नसल्याने त्यांना एजेए प्रकरणातून आरोपमुक्त केले आहे. हे प्रकरण अनेक वर्षे सीबीआय आणि ईडी न्यायालयात सुरू होते. हुडा यांना यापूर्वीच सीबीआय कोर्टाने या प्रकरणाशी संबंधित कटाच्या आरोपातून मुक्त केले होते, आणि आता ईडी प्रकरणातूनही त्यांना दिलासा मिळाला आहे.

# म्यानमारमध्ये बंडखोर मिन आंग राष्ट्राध्यक्ष बनला



**नेपिडॉ** - १ फेब्रुवारी २०२१ रोजी आंग सान सू की यांच्या निवडून आलेल्या सरकारविरुद्ध बंड करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्यानंतर अवघ्या ७ दिवसांनी जनरल मिन आंग ह्लाइंग यांनी एका वर्षाच्या आत निवडणुका घेऊन नागरी राजवट परत आणण्याचे आश्वासन दिले. बंडानंतर पहिल्यांदाच संसदेचे अधिवेशन भरले आहे. संसदेने त्यांची पुढील राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड केली. राष्ट्राध्यक्षपद स्वीकारण्यापूर्वी घटनेनुसार मिन आँग ह्लाइंग यांनी सशस्त्र दलांच्या कमांडरपदाचा आधीच राजीनामा दिला. त्यांनी नवीन सल्लागार परिषदही स्थापन केली आहे, जी नागरी आणि लष्करी बाबींवर सर्वोच्च अधिकार वापरणार आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यावर देशात लष्करी अधिकाऱ्यांचेच वर्चस्व असण्याची शक्यता आहे. मिन आँग ह्लाइंग यांनी हे सुनिश्चित केले आहे की, त्यांचे कट्टर सहकारी जनरल ये विन ऊ हे सशस्त्र दलांच्या प्रमुखपदावर विराजमान होती.

# कणकवलीच्या नांदगावमध्ये गॅस सिलिंडरची कृत्रिम टंचाई

**स्थानिक नागरिकांचा आरोप**

■ सिंधुदुर्ग

**जिल्ह्यातील** कणकवली तालुक्यातील नांदगाव परिसरात घरगुती गॅस सिलिंडरची कृत्रिम टंचाई सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.

या भागातील नागरिकांना कंपनीच्या उप विक्रेत्यांकडून सिलिंडरचा पुरवठा होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर नांदगावचे सरपंच रविराज मोरजकर यांनी घरगुती गॅस पुरवठा सुरळीत करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी कणकवली तहसीलदारांकडे केली.

या शिष्टमंडळाने नायब तहसीलदार विजय वरक यांना घरगुती गॅस तांत्रिक टंचाईबाबत निवेदन दिले. या निवेदनावर शेकडो ग्रामस्थांच्या सह्या आहेत.निवेदनात म्हटले आहे की, नांदगाव पंचक्रोशीत गॅस सिलिंडर पुरविणारे मुख्य वितरक ग्राहकांना समाधानकारक सेवा देत नाहीत. सध्या इंधन तसेच गॅस मुबलक प्रमाणात उपलब्ध असूनसुद्धा वितरकांच्या मनमानीमुळे कृत्रिम तुटवडा होत आहे. संबंधित वितरकांची योग्य ती चौकशी करुन कारवाई करावी तसेच नांदगाव, असलदे, आयनल, कोळोशी, तोंडवली - बावशी यासह परिसरातील घरगुती गॅस ग्राहकांना सिलिंडरचा सुरळीत पुरवठा करुन मिळावा, अशी मागणी शिष्टमंडळाच्यावतीने करण्यात आली.

# रायगडात पेट्रोल-डिझेलच्या खुल्या विक्रीवर पूर्णपणे बंदी

■ रायगड

**जिल्ह्यामध्ये** पेट्रोल-डिझेलचा तुटवडा भासत असल्याच्या अफवा सोशल मीडियावर पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर आता जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपावर पेट्रोल आणि डिझेलच्या खुल्या विक्रीकर बंदी घालण्यात आली आहे. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी ही बंदी घातली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पेट्रोलियम नियम अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपचालक व मालकांना हे स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्यानुसार पेट्रोल व डिझेलची विक्री केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच करावी लागणार असून, कोणत्याही परिस्थितीत कॅन,बाटली किंवा इतर अनधिकृत कंटेनरमध्ये इंधन भरण्यास व विक्रीस सक्त मनाई करण्यात आली आहे.

# चंद्रशेखर बावनकुळे कुटुंबाबाबत खोटी माहिती फेसबुक पोस्ट करणाऱ्यावर गुन्हा दाखल

■ नागपूर

**महसूल** मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि त्यांच्या कुटुंबियांच्या नावावर हजारो एकर जमीन असल्याचा फेसबुक पोस्टमधून खोटा दावा केल्याप्रकरणी नागपूरच्या कोराडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रामेश्वर दरेकर नावाच्या व्यक्तीने फेसबुक पोस्ट आणि व्हिडिओच्या माध्यमातून बावनकुळे कुटुंबियांच्या नावावर तब्बल ११४७ एकर जमीन असल्याचा दावा केला होता. हा व्हिडिओ ३१ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला, ज्यामुळे राज्यभरात खळबळ उडाली.

या प्रकरणी रामेश्वर दरेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, या दाव्यामुळे बावनकुळे कुटुंबाची बदनामी झाली. कामठी कार्यालयाने जारी केलेल्या अधिकृत प्रमाणपत्रानुसार बावनकुळे आणि त्यांच्या कुटुंबियांच्या नावावर केवळ २८.४४ एकर जमीन नोंद आहे. त्यामुळे ११४७ एकर जमीन असल्याचा दावा पूर्णपणे चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**मिझोरम राज्य लॉटरीची गोल्डन 200 गोल्ड मंथली लॉटरी**

**शुद्धिपत्रक**

सर्वांना कळविण्यात येते की, दि. **15/04/2026** रोजी होणाऱ्या गोल्डन 200 गोल्ड मंथली लॉटरीच्या 43 व्या सोडतीच्या तिकिटांवर, पहिल्या बक्षिसाखाली पुढील बाजूस रु. (15 लाख x 6 बक्षिसे) ऐवजी चुकून रु. (15 लाख x 5 बक्षिसे) असे छापण्यात आले आहे, तर तिकिटाच्या मागील बाजूस रु. (15 लाख x 6 बक्षिसे) हे योग्य बक्षीस छापलेले आहे. कृपया वरील लॉटरीच्या मुखपृष्ठावर छापलेली बक्षिसाची रक्कम रु. (15 लाख x 5 बक्षिसे) दुरुस्त करून **रु. (15 लाख x 6 बक्षिसे)** माना आणि बाकी सर्व अपरिवर्तित राहील. लॉटरी योजनेबद्दल अधिक तपशीलवार माहितीसाठी, आपण आमच्या **http://ifsl.mizoram.gov.in** या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

Issued by: Director
Institutional finance & State Lotteries,
Govt. of Mizoram

## कोल्हापुरात बैलगाडा शर्यतीत अपघात! ३ जण जखमी

■ कोल्हापूर

**कोल्हापूर** जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील औरनाळ येथे आयोजित बैलगाडा शर्यतीत अचानक मोटारसायकल आडवी आल्याने मोठा अपघात झाला. या दुर्घटनेत तिघेजण जखमी झाले. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. शर्यत सुरू असताना बैलांचा वेग प्रचंड होता. याच वेळी अचानक एक मोटारसायकल त्यांच्या मार्गात आली. वेगात धावत असलेल्या बैलांना अचानक थांबवणे शक्य नसल्याने त्यांनी उडी घेतली.

# भागीदारी व्यवसायात फसवणूक बिल्डरला ७.३९ कोटींचा दंड

**हायकोर्टाचा आदेश**

■ मुंबई

**भागीदारीच्या** व्यवसायात भागीदार महिलेची फसवणूक करणाऱ्या बिल्डरला उच्च न्यायालयाने चांगलाच दणका दिला. कागदपत्रांमध्ये फेरफार करणे आणि बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करणे बिल्डरला महागात पडले. कथित फसवणूकप्रकरणी बिल्डर शमशुल खान याने महिला भागीदार अलका चांदेवार यांना ७.३९ कोटी रुपये १० टक्के व्याजासह देण्याचे आदेश न्यायालयाने न्या. सोमशेखर सुंदरेशन यांच्या एकलपीठाने दिले.

अलका चांदेवार आणि शमशुल खान हे 'मेसर्स सारस डेव्हलपर्स' या गृहनिर्माण संस्थेत भागीदार होते. त्यात अलका यांचा ८० टक्के वाटा होता. मात्र, खान यांनी बनावट कागदपत्रे तयार करून अलका यांनी संस्थेतून काढता पाय घेतल्याचे भासवले आणि त्यांना नफ्यातील वाटा नाकारला. याविरोधात अलका यांनी लवाद प्रक्रिया सुरू केली होती. तेथे बिल्डरने अलका यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून त्याआधारे त्यांची फसवणूक केल्याचे सिद्ध झाले. त्या अनुषंगाने लवादाने बिल्डरला ७.३९ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. त्यावर उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. बिल्डर शमशुल खानने व्यवसायाचे ऑडिट केलेले हिशेब आणि बँक खात्यांची माहिती लपवून ठेवली होती.

# राज्यात साखरेचे उत्पादन १० लाख टनांनी घटणार

■ पुणे

**राज्यातील** ऊस गाळप हंगाम आता ८ ते १० दिवसांत पूर्णपणे बंद होणार आहे. परंतु यंदा उसाची कमी उपलब्धता आणि साखर उताऱ्यातील घट यामुळे राज्यातील साखरेचे उत्पादन यंदा १० लाख टनांनी घटणार आहे. हे उत्पादन पूर्वीच्या ११० लाख टनांच्या अंदाजाऐवजी १०० लाख टनांवर स्थिरावणार आहे. साखर आयुक्तालयाच्या अहवालात ही माहिती दिली आहे. साखर आयुक्तालयाच्या १ एप्रिलच्या प्रसिद्ध अहवालानुसार, राज्यात यंदा एकूण २१० साखर कारखान्यांनी गाळप हंगामात सहभाग घेतला होता. त्यामध्ये १०३ सहकारी आणि १०७ खासगी कारखान्यांचा समावेश आहे. आतापर्यंत राज्यातील १८७ कारखान्यांची धुरांडी बंद झाली आहेत. केवळ २३ कारखाने सध्या सुरू आहेत.

## धारण तलावात प्रदूषणाने हजारो मासे मृत्युमुखी

**नवी मुंबई**- वाशी सेक्टर १० ए मधील मिनी सी-शोअर धारण तलावात हजारो मृत मासे पाण्यावर तरंगताना आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. मृत माशांमुळे परिसरात दुर्गंधी पसरली. या तलावात तेलकट थर व रसायने असल्याचा संशय असून त्यामुळे पाणी प्रदूषित होऊन हे मासे मृत्युमुखी पडल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. वाशीतील या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून प्रदूषण नियंत्रण मंडळ व पालिका प्रशासनाने पाण्यातील रसायनांची तपासणी करावी अशी मागणी होत आहे.

# युद्धामुळे मुंबई महापालिकेचे कचराविषयक अभ्यास दौरे रद्द

■ मुंबई

**कांजूरमार्ग** येथील डंपिंग ग्राऊंडवरील कचर्याच्या दुर्गंधीबाबत तोडगा काढण्यासाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीचा चीन, दुबई आणि जपानचा अभ्यास दौरे अखेर रद्द झाले आहे. इराण - इस्त्रायल, अमेरिका युद्धामुळे हा दौरा रद्द करण्यात आला आहे. आता उच्चस्तरीय समितीने परदेशी अभ्यास दौरा न करता आपला अहवाल तयार केला असून लवकरच तो उच्च न्यायालयात सादर केला जाणार आहे.अभ्यास दौऱ्यांमुळे केवळ वेळकाढूपण सुरू असल्याचा आरोप याचिकाकत्यांनी केला होता. अखेर युद्धामुळे हा दौराच रद्द झाला आहे.मुंबईत दररोज ६ हजारांहून अधिक मेट्रिक टन कचरा जमा होतो. याठिकाणी जमा होणाऱ्या कचऱ्यावर कांजूरमार्ग व देवनार डंपिंग ग्राऊंडवर विल्हेवाट लावली जाते. कांजूरमार्ग डंपिंग ग्राऊंडवर ५५०० मेट्रिक टन कचरा टाकला जात आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ५ नवीन पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव

**ठाण्यांची संख्या २८ वर जाणार**

■ पुणे

**पिंपरी-चिंचवड** शहरात वाढत्या गुन्हेगारीमुळे पोलीस प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत नव्याने पाच पोलीस ठाण्यांचा समावेश करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे.

शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता गुन्हेगारी नियंत्रणात ठेवणे हे मोठे आव्हान बनले आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पिरंगुट, जांबे, पिंपळे सौदागर, मोशी आणि देहूरोड येथे नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडे पाठवला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाण्यांची संख्या २३ वरून २८ वर जाणार आहे.

नवीन पोलीस ठाण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचीही निर्मिती होणार आहे. परिमंडळ ४ साठी ११ पदे, पिरंगुट पोलीस ठाण्यासाठी १९०, जांबे १८९, पिंपळे सौदागर १८३, मोशी १९४ आणि देहूरोड १९४ अशा एकूण ९६१ नव्या पदांची निर्मिती केली जाणार आहेत.

# मुंबईत अनधिकृत मेंढ्यांची झुंज

**तिघांवर गुन्हा दाखल**

**मुंबई** - मेंढ्यांच्या झुंजीना बंदी असताना अनधिकृतरित्या जोगेश्वरी पश्चिम येथील रावजी मैदानात मेंढ्यांच्या झुंजीचे आयोजन केले होते. या झुंजीदरम्यान एका मेंढ्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. प्राण्यांवर क्रूरता केल्याचा आरोप करत पेटा इंडिया संस्थेने पोलिसांकडे तक्रार नोंदवली होती. रावजी मैदानात बेकायदेशीरपणे मेंढ्यांच्या झुंजीचे आयोजन करण्यात आले होते.

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, आमच्या अशिलांच्या सूचनेअंतर्गत, आम्ही याखालील अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या, प्लॉट क्र. ६० आणि ७६, जवाहर नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० १०४ येथील रस्ता क्र. १ आणि ६च्या कोपऱ्यावर स्थित **"हेमकुंज"** या इमारतीमधील **सदनिका क्र. १२०२ ("सदर सदनिका")** आणि संस्थेचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग (**"सदर समभाग"**), यापश्चात एकत्रितरित्या **"सदर मालमत्ता"** असे उल्लेखित,च्या मालक **सौ. क्रिष्णा ए. लाड** यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.

मालकांनी असे सांगितले आहे की, दिनांक २९ डिसेंबर, २०१२ रोजीच्या कायमस्वरूपी पर्यायी निवासस्थानाकरिता करारपत्राद्वारे, सौ. क्रिष्णा अरूण लाड यांना जुन्या इमारतीमधील त्यांच्या भाडेपट्टी हक्क स्वाधीन करण्याच्या बदल्यात विकासक, मे. धर्मनाथ कन्स्ट्रक्शन्स यांच्याद्वारे सदर सदनिका वितरित करण्यात आली होती.

सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, अभिहस्तांकन, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, करार, वारसा, दावा, भोगवटा, ताबा, भाडेपट्टी, भाडेकरू, पोट-भाडेकरू, देखभाल, उप-भाडेपट्टी, परवाना, धारणाधिकार, मृत्युपत्र, बोजा, कोणत्याही करारपत्रद्वारे कोणत्याही इतर पद्धतीने, लिखिते, अभिहस्तांतरण, करारनामा, रचना, मृत्युपत्र, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, खटला, कायद्याच्या कोणत्याही न्यायालयाचा हुकूम किंवा न्यायालयीन आदेश, कंत्राट/करारपत्र किंवा कोणताही बोजा किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, इस्टेट, आक्षेप आणि/किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींना विनंती आहे की, त्यांनी त्याबाबत कागदोपत्री पुराव्याच्या नोटरीकृत प्रमाणित सत्य प्रतींसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना निम्न उल्लेखित पत्त्यावर सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे. जर कोणताही दावा करण्यात न आल्यास, सदर मालमत्तेमधील अशा कोणत्याही कथित दावा किंवा हितसंबंधाच्या संदर्भ किंवा दर्जाशिवाय व्यवहार सुरु करण्यात येईल, व तो दावा किंवा हितसंबंध सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिल्याचे समजण्यात येईल आणि आमच्या अशिलावर बंधनकारक नसेल.

**वरील उल्लेखित अनुसूचीः**

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या गाव पहाडी - गोरेगाव पश्चिम, तालुका - बोरीवलीचा सी.टी.एस. क्र. ७२१, ७२१/१ ते ३, ७२४ आणि ७२४/१ ते ५ धारण केलेल्या जमिनीच्या भूखंडावर बांधलेल्या, प्लॉट क्र. ६० आणि ७६, जवाहर नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० १०४ येथील रस्ता क्र. १ आणि ६च्या कोपऱ्यावर स्थित **हेमकुंज को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या "हेमकुंज"** या इमारतीमधील **१२ व्या मजल्यावरील सदनिका क्र. १२०२**, मोजमाप **९१५ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ** व त्यासह इमारतीमधील पार्किंग जागा क्र. ५ आणि ६ धारण केलेल्या **दोन कार पार्किंग जागा आणि हेमकुंज को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडचे भाग प्रमाणपत्र क्र. ३४** दिनांक **३१ मार्च, २०१८** अंतर्गत पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. **३३१ ते ३४०** (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे **१० पूर्णतः भरणा केलेले समभाग.**

दिनांक ०५ एप्रिल, २०२६.

**विपुल जे. शाह,**
**ॲडव्होकेट - उच्च न्यायालय**
६०८, टोपिवाला सेंटर, ६वा मजला,
ऑफ एस. व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम),
मुंबई - ४०० १०४.

**जाहीर सूचना**

मी मे.शारदा कन्स्ट्रक्शन्स या नोंदणीकृत भागीदारी संस्थेच्या शिर्षकाची चौकशी करीत आहे, संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय फ्लॅट क्र. १/२, प्राईड होम, म्हसोबा मंदिरामागे, नाशिक-पुणे रोड, नाशिक - ४२२१०१ येथे असून, यात (१) श्री.ब्रिजेश रमेशकुमार नंदवानी, (२) श्री.लालचंद हरपालदास नंदवानी, (३) श्री.प्रदीप रमेशकुमार नंदवानी आणि (४) श्री. रमेशकुमार हरपालदास नंदवानी हे सदर संस्थेचे चार भागीदार आहेत, जे साई आर्केड, इमारत ए, साई आर्केड को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., नोंदणी क्र. टीएनए/केएलएन/एचएसजी/(टीसी)/३०९१२/२०१८-१९, कुबा रेस्टॉरंटजवळ, शिवाजी चौक, कल्याण (पश्चिम) येथे असलेल्या तळमजल्यावरील सुमारे १५०० चौ.फूट क्षेत्रफळाच्या व्यावसायिक गाळ्याची तसेच त्यासोबत ७५० चौ. फूट मेझानाईन कार्पेट क्षेत्रफळाची आणि १ खुली कार पार्किंग जागेची मालक आहे, सदर इमारत जुन्या सीटीएस क्र.३३४२ (भाग), ३३४५ (भाग), ३३४७ (भाग), ३३४३ व ३३४४ (नवीन ३३४२ बी), मौजे-कल्याण, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथील जमिनीवर उभी असलेली येथील सर्व भाग व खंड, सदर जागा सध्या बँक ऑफ महाराष्ट्र यांना दि.३ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या नोंदणीकृत भाडेकरारान्वये, हमी उपनिबंधक, कल्याण-२ यांच्या कार्यालयात अनुक्रमांक केएलएन/२/७६३३/२०१५ अंतर्गत, दिनांक १ नोव्हेंबर, २०१५ पासून १५ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात आलेली आहे.

कोणा व्यक्तिस सदर प्रिमायसेसबाबत कोणत्याही प्रकारचा दावा असलेली कोणतीही व्यक्ती जसे की भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, परवाना, विक्री, अदलाबदल, व्यवस्था, गहाणखत, समन्यायी तारण, दुय्यम तारण, देणगी, न्यास, वारसा, वसीयत, ताबा, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुखसोयी, संयुक्त उपक्रम, भागीदारी इत्यादी कोणत्याही प्रकारे असल्यास त्यांनी संबंधित कागदपत्रांसह त्यांचा दावा लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यास या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा, असे कोणतेही दावे किंवा आक्षेप असल्यास, ते त्याग केलेले किंवा सोडून दिलेले समजले जातील.

आज दिनांकित ०५ एप्रिल २०२६ रोजी
**मौलिक किर्ती तन्ना, वकील**
तळमजला, एजीएफए इमारत, डॉ. आर.पी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई -४०००८०

# लिफ्ट कोसळून महिला जखमी विकासक, लिफ्ट कंपनीविरोधात गुन्हा

■ नायगाव

**नायगावमधील** सनटेक येथील इमारतीची लिफ्ट कोसळून एक रहिवासी महिला जखमी झाली आहे. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात विकासक आणि लिफ्ट कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नायगाव पूर्वेच्या जुचंद्र येथे सनटेक नावाचे गृहनिर्माण संकुल आहे.

फिर्यादी श्रुती बत्रा (४४) या सनटेक्स मॅक्सवेल या इमारतीत राहतात. गुरुवारी दुपारी त्या २३ व्या मजल्यावरून लिफ्टने खाली उतरत होत्या. मात्र १४ व्या माळ्यानंतर लिफ्ट वेगाने खाली आली आणि त्यांच्या मानेला जोराचा झटका बसला. त्यांनी मदतीसाठी आईला फोन करण्याचा प्रयत्न केला. मात्र मोबाईलचे नेटवर्क नव्हते. नंतर इमारतीच्या सुरक्षा रक्षकाने त्यांना लिफ्टमधून बाहेर काढले. मानेला झटका बसल्याने त्यांना उलट्या झाल्या. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले. याबाबत त्यांनी नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. रुग्णालयातून या संदर्भात अहवाल आल्यानंतर सनटेक बिल्डर आणि ओटीस या लिफ्ट कंपनीविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १२५ ए, १२५ बी, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मेट्रो ९ स्थानकाच्या नावावरून वाद स्थानिकांचा आंदोलनाचा इशारा

■ मुंबई

**दहिसर**-मिरा-भाईंदर मेट्रो मार्गिका ९ सुरू होण्यापूर्वीच नामकरणाच्या वादात सापडली आहे. या मार्गिकेतील पांडुरंग वाडी मेट्रो स्थानकाचे नाव बदलून पेणकर पाडा करण्याची मागणी करत स्थानिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. ६ एप्रिल रोजी दहिसर ते काशिगाव दरम्यान मेट्रो सेवा सुरू होणार आहे. या मार्गिकेचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांचीही उपस्थिती अपेक्षित आहे. यासाठी एमएमआरडीए प्रशासनाकडून जोरदार तयारी सुरू आहे. या मेट्रो मार्गिकेचे उद्घाटन यापूर्वी ३ एप्रिल रोजी होणार होते. काही प्रशासकीय कारणांमुळे ते पुढे ढकलण्यात आले होते. त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

नवाकाळ



# सवंग प्रसिद्धीचा रीलरिलाट

**आज-काल सर्वत्र रीलांचा रिलरिलाट चालू आहे. पूर्वीच्या काळी सिनेमाचे पोस्टर असायचे. त्यावर नट-नट्यांची चित्रे आणि सिनेमाचे नाव असायचे. गावोगावी, शहरोशहरी, मोक्याच्या ठिकाणी मोठमोठी पोस्टर लावून सिनेमाच्या जाहिराती केल्या जायच्या. मग लोक आकर्षक जाहिराती असलेल्या सिनेमाला रांगा लावायचे. ब्लॅकने तिकिटे विकत घेऊन सिनेमा पाहायचे. आता सिनेमाचे टिझर्स आणि प्रोमोज येतात. त्यात आकर्षक सीन दाखवले जातात. पूर्वी फक्त नट्याच मेकअप करायच्या. ग्रामीण भागात तोंडाला रंगरंगोटी करून फिरणाऱ्या महिलांना नायकिणी म्हटले जायचे. या नायकिणी वेगवेगळ्या सण-समारंभात पैसे घेऊन नाचायला जायच्या. तो त्यांचा व्यवसाय होता.**

**- अमृता खंडेराव**

सिनेमाबरोबरच ग्रामीण भागात लोकनाट्य आणि तमाशांचे भरपूर कार्यक्रम व्हायचे. जत्रा-यात्रांच्या निमित्ताने गावोगावी तमाशे लागायचे. ग्रामीण भागात थिएटर्स नसल्यामुळे तमाशांना तुफान गर्दी व्हायची. लोककलावंत एका-एका गावात, सहा-सहा, सात-सात दिवस मुक्काम टाकायचे.

आमची आई खेडेगावात शिक्षिका होती. त्याकाळी जिल्हा परिषदेच्या शाळा विद्यार्थ्यांनी भरून वाहायच्या. एकेका वर्गाच्या चार-चार तुकड्या असायच्या. आमच्या गावात चैत्र महिन्यात देवीची यात्रा लागायची. त्यात लोकनाट्याचे कार्यक्रम ठेवले जायचे. मनोरंजन आणि प्रबोधन एकत्र असे या नाटकाचे स्वरूप असायचे.

सगळा गाव नाटक पाहायला लोटायचा. महिला पुरुष लहान मुले सगळे एकत्र बसून या लोकनाटकाचा आनंद लुटायचे. माझी आई या नाटकाला जाऊ देत नसे. एका वर्षी मी खूप हट्ट केला तेव्हा तिने परवानगी दिली. माझ्या मैत्रिणी आपापल्या आयांबरोबर जाणार होत्या. मग मी पण त्यांच्याबरोबर गेले.

महाराष्ट्राच्या लोक नाट्यपरंपरेत सोंगाड्या हे प्रमुख पात्र असते. तो विनोदी बतावणी करून लोकांचे प्रबोधन करत असतो. समाजातील कुप्रथांवर हलकेफुलके टोले मारत समाजमनाला चिमटे काढत असतो. बऱ्यावाईटाची जाणीव करून देत असतो. तरीही लोकनाट्यात लावणी आणि शृंगाररसाला प्राधान्य असते. तिथे पायात घुंगरू बांधून नाचणाऱ्या महिला मी पहिल्यांदा प्रत्यक्ष पाहिल्या. चमत्कार वाटला.



दुसऱ्या दिवशी शाळा सुटल्यानंतर आम्ही पोरी सावलीला खेळत बसलो होतो. आम्ही सगळ्या सात ते नऊ वयोगटातल्या मुली. आमच्यातली वनिता अचानक उठली आणि टडडांग टडडांग टडडांग टडडांग करत दोन्ही हाताचे कोपर मागे घेऊन छाती आडवी हलवून नाचू लागली. लावणी करणाऱ्या महिला कंबरेत वाकून दोन्ही स्तन आडवे हलवतात हे काल रात्रीच आम्ही पाहिले होते.

आमच्या मास्तरीण आईने आमचे लोकनृत्य पाहिले. मी घरात गेल्यानंतर ती मला म्हणाली,

आपण तसे नाचायचे नसते.

का गं आई?

त्या बायका पोटासाठी नाचत असतात. त्यांची नक्कल करू नये आपण..

का पण..

हे बघ तसं नाचणं ती त्यांची गरज आहे. आपली नाही. आपण सुशिक्षित लोक आहोत. आपण पोट भरायसाठी वेगवेगळी कामं करू शकतो. त्या बायका शिकलेल्या नाहीत. त्यांच्याकडे दुसरे काम नाही म्हणून त्या नाचतात. मी नाचते का छाती हलवून?

या प्रश्नाचं मला हसू आलं. आपली दोन्ही खांद्यावरून पदर घेणारी शिक्षिका आई अशी नाचूच शकत नाही हे माझ्या मेंदूला पक्क कळत होतं.

नाही, तू नाही नाचत तशी..

का नाही नाचत सांग बरं..

तुला येतच नसंल तसं नाचायला...

येतं मला, पण मी तसं करणार नाही. कारण मला नोकरी आहे. दर महिन्याला नोकरीचा पैसा मिळतो. माझ्या हातात चांगलं काम आहे. त्या बायकांकडे काम नाही. त्यांना महिन्याला पैसा मिळत नाही. म्हणून त्या कार्यक्रमात नाचतात. आपण त्यांची नक्कल करू नये. आपण अभ्यास करावा चांगलं शिकावं म्हणजे तसं नाचायची गरज पडत नाही.

वय वाढेल तसतसा हळूहळू डोक्यात प्रकाश पडत गेला. आईने कुठेही लोककलावंत महिलांचा अपमान केला नव्हता. त्यांच्या कामाला कमी लेखलं नव्हतं. फक्त त्यांची आणि आपली कामं वेगळी आहेत हे मात्र अगदी सहज समजावून सांगितलं होतं.

माझे वडीलसुद्धा लोककलावंतांचा खूप आदर करायचे. दारी आलेल्या पोतराजाला, बहुरूप्याला, चित्रकथ्यांना धान्य आणि पैसे द्यायचे. चहापाणी विचारायचे. ज्यांच्याकडे शिक्षण आणि संधी नाहीत त्यांनासुद्धा सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि आपण त्यांच्या कामाचा आदर केला पाहिजे हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार माझ्या आई-वडिलांनी त्यांच्या कृतीतून माझ्यावर केला.

आज-काल घराघरातल्या मुली बायका तरुणी स्तनच काय सर्व शरीर हलवून नाचतात आणि रील बनवतात. सर्वांनाच अंगप्रत्यंग दाखवण्याची तुफान घाई झाली आहे. किती दाखवू आणि किती नको असा पिसाळा सुटला आहे. सवंग लोकप्रियतेची लाट आली आहे. रील बनविण्याच्या नादात विवेक किंवा तारतम्य हरवले आहे. स्वस्त मनोरंजनामुळे समाजाची अभिरूची बिघडत चालली आहे.

कुटुंबवत्सल महिला पुरुषांनादेखील असले रील बनवून आपण आपल्या मुलांवर काय संस्कार करत आहोत याचे भान उरलेले नाही. एक सुसंस्कृत पिढी घडविण्यात पालकांचा आणि शिक्षकांचा मोठा वाटा असतो. निसर्गाने प्रत्येक स्त्रीला दोन स्तन दिले आहेत. ते हलवून पैसे मिळवणे ही नेमकी कुणाची गरज आहे हे कळले पाहिजे. ज्यांच्याकडे दुसरे कुठलेच कौशल्य, व्यवसाय प्रशिक्षण किंवा कामाची संधी नाही त्यांच्यासाठी ते राखीव क्षेत्र ठेवले पाहिजे. सगळ्यांनी उठून कमरेत वाकून स्तन हलवायची गरज नाही.

खरे तर त्यांनासुद्धा कौशल्य विकासाची आणि व्यवसायाची संधी मिळाली पाहिजे. पण ती सर्वांना मिळत नाही हेही तेवढेच खरे आहे.

आजकाल शालेय स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांबरोबर आलेल्या त्यांच्या मातासुद्धा तोंडाला हजार रुपयाचा मेकअप आणि पार्लरवालीकडे जाऊन हेअर स्टाईल करून येतात. विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन बघण्याऐवजी आलेल्या पालकांचे या मातांकडेच जास्त लक्ष जाते.

बोधी अकराव्या वर्गात असताना पालकसभेला आलेल्या एका महिलेने स्किन कलरची लेगिन घातली होती. त्या आत आल्या तेव्हा वरच्या झिरझिरीत टॉपमधून त्यांच्या देहाचा संपूर्ण आकार स्पष्ट दिसत होता. लेगीन स्किन कलरची असल्यामुळे आतून काही घातले की नाही तेही कळत नव्हते. सर्व विद्यार्थी त्या बाईकडे टकमक बघत होते आणि हे सगळ्यांच्या लक्षातही आले होते. आता शाळेच्या व्यवस्थापनाने पालकांनी शाळेत येताना काय कपडे घालावेत याची नियमावली तयार करायची वेळ आली आहे.

स्तन नैसर्गिक असतात. पण जगण्याची कौशल्ये अर्जित करावी लागतात. सर्वांनाच कौशल्य विकासाचे प्रशिक्षण मिळत नाही. अनेक लोक संधींपासून वंचित राहतात. अशावेळी त्यांच्या जगण्याचे साधन म्हणून काही गोष्टी आपण सोडून दिल्या पाहिजेत. मी व्यवसाय करेन, नोकरी करेन आणि कंबरेत वाकूनही नाचेन असा अनाचार करता कामा नये.

अनेक महिला उठता बसता नाचाचे रील बनवतात. आंबटशौकीन लोक बघायलाच बसले आहेत. लोककलावंत निदान नाचायची बिदागी तरी घेतात. या महिला फुकट देह प्रदर्शन करण्यासाठी तयार आहेत. निसर्गाने दिलेले चार गोळे हे काही पोट भरण्याचे अंतिम भांडवल नव्हे. चांगल्या शिक्षणाच्या संधी मिळत असतील तर त्यातूनच आपला रोजगार निर्माण केला पाहिजे. उगीचच शरीर प्रदर्शन करून लोकांना चाळवण्याची काय गरज आहे?

लोककलावंत महिलासुद्धा संपूर्ण शरीर झाकून अदबीने नाचतात पण रीलवाल्या महिलांना तेवढीसुद्धा लोकलज्जा उरलेली दिसत नाही. त्या अगदी कमीज काढून तमीज सोडायलासुद्धा तयार झालेल्या दिसतात. आपल्याकडे नृत्यकौशल्य असेल तर त्याची जोपासना केली पाहिजे पण याचा अर्थ असा नाही की सोशल मीडिया हातात आहे म्हणून येता-जाता लोकांना काहीही दाखवावे.

मुळात असंख्य महिला नसलेले नृत्यकौशल्य दाखवण्यासाठीच धडपडताना दिसतात. त्यांना नाचण्यापेक्षा अंग दाखवण्याची हौस आहे असे स्पष्ट दिसते. या महिला कुठलीही वस्त्रे शरीराचे अवयव उठून दिसतील अशा पद्धतीने परिधान करतात. चेहऱ्याला चमकदार रंगरंगोटी करतात आणि भडक शृंगारिक रील बनवून स्वस्त प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करताना आढळतात.

ग्रामीण/शहरी भागातील गरीब आणि गरजू लोककलावंतांच्या रोजगाराच्या संधी हिसकावून घेणे सुसंस्कृत आणि सुशिक्षित समाजातील महिलांना शोभत नाही.

आपण लोककलावंतांना काही मदत करू शकत असलो तर जरूर करावी परंतु त्यांची भ्रष्ट नक्कल करून त्यांच्या पोटावर पाय देऊ नये. निदान ते क्षेत्र तरी आपण त्यांच्यासाठी राखीव ठेवूया का?

आपापल्या क्षेत्रात कुणी काय करायचंय आणि काय करायचं नाही याच्या सीमारेषा निश्चित असल्या पाहिजेत. त्या लोकांना समजावून सांगण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे. ती त्याने टाळू नये.

---

## करूळ घाटात ट्रक कोसळला पिता-पुत्राचा जागीच मृत्यू



■ वैभववाडी

**भरधाव** वेगाने जाणारा सिमेंटने भरलेला ट्रक ३०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना करूळ घाटात घडली. या भीषण अपघातात पिता-पुत्राचा जागीच मृत्यू झाला.या अपघातातील मृत पिता-पुत्राची नावे राजू राजपूत आणि राहुल राजपूत (२०) अशी आहेत.

हे पिता-पुत्र विजापूर जिल्ह्यातील कोचलगी तांडा येथील रहिवासी आहेत. राजू राजपूत हे आपल्या मुलासह गुलबर्गा येथून सिमेंट भरून वैभववाडीच्या दिशेने येत होते. काल पहाटे पावणे पाचच्या सुमारास त्यांनी गगनबावडा येथे ट्रक थांबवला. दोघांनी एकत्र चहा घेतला, थोड्या गप्पा झाल्या आणि ५ च्या सुमारास ते घाटाच्या दिशेने निघाले. करूळ घाट उतरत असताना दिंडवणे गावाजवळ राजू यांचा ट्रकवरील ताबा सुटला.

भरधाव ट्रक लोखंडी बॅरिकेडस् तोडून थेट ३०० फूट खोल दरीत कोसळला. ट्रकचा वेग इतका होता की खाली कोसळताच गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. पाठीमागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रक चालकाने हा थरार पाहिला आणि तातडीने पोलिसांना माहिती दिली. वैभववाडी पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले.दरी अत्यंत खोल आणि अवघड असल्याने मृतदेह बाहेर काढताना पथकाची मोठी ओढाताण झाली. मात्र, ग्रामस्थ आणि जीवरक्षकांनी जीव धोक्यात घालून दरीत उतरून दोन्ही मृतदेह बाहेर काढले.

---

## पुणे आयएसआयएस मॉड्यूल प्रकरण नाचनची तुरुंग बदली याचिका फेटाळली

■ पुणे

**पुणे** आयएसआयएस मॉड्यूल प्रकरणातील आरोपी शामिल साकिब नाचन याने भायखळा कारागृहातून अन्य उच्च-सुरक्षा तुरुंगात बदली करण्यासाठी दाखल केलेली याचिका राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष न्यायालयाने (एनआयए) फेटाळली. आरोपीच्या जीवाला तत्काळ धोका असल्याचे कोणतेही ठोस पुरावे सादर करण्यात अपयश आल्याचे नमूद करत न्यायालयाने ही याचिका नामंजूर केली.

नाचनने आपल्या याचिकेत, तळोजा मध्यवर्ती कारागृहात जुलै २०२५ मध्ये आपल्यावर हल्ला झाल्याचा दावा करत भायखळा कारागृहातही जीवाला धोका असल्याची भीती व्यक्त केली होती. यासंदर्भात न्यायालयाने या दाव्याची दखल घेत विशेष न्या. चकोर एस. बाविस्कर यांनी याबाबत निर्णय देताना स्पष्ट केले की,भायखळा कारागृहात त्याच्यासोबत कोणतीही अनुचित घटना झालेली नाही. तसेच सध्या त्याला इतर आरोपींपासून वेगळ्या कोठडीत ठेवले आहे.नाचन हा या प्रकरणातील भायखळा कारागृहात ठेवलेला एकमेव आरोपी आहे. त्यामुळे त्याची इतर सह-आरोपींसोबत प्रत्यक्ष भेट होण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. अशा परिस्थितीत त्याच्या सुरक्षेबाबत तातडीचा धोका असल्याचे कारण नाही. दरम्यान, भायखळा कारागृह प्रशासनाने कैद्यांची गर्दी लक्षात घेता नाचनला अन्य कारागृहात हलवण्यास हरकत नसल्याचे म्हटले होते. मात्र, गर्दी ही सर्वसाधारण समस्या असून केवळ त्याच्या आधारे बदलीचा निर्णय घेता येत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. नाचन हा २०२३ च्या पुणे आयएसआयएस मॉड्यूल प्रकरणातील ११ आरोपींपैकी एक आहे.या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास संस्था करत असून बेकायदेशीर कृत्ये, शस्त्र कायदा आणि स्फोटक पदार्थ कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

---

## सांगलीत संभाजी महाराजांचा अनधिकृत पुतळा हटवला

■ सांगली

**सांगली** शहरातील राम मंदिर चौकात आज पहाटे अनधिकृतपणे उभारण्यात आलेला छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा पोलिसांनी हटवला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

आज पहाटे सुमारे साडेचार वाजण्याच्या सुमारास ६० ते ७० कार्यकर्त्यांनी एकत्र येत राम मंदिर चौकात चौथऱ्यावर छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पुतळा तेथून हलवला.

महानगरपालिकेतर्फे छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा त्रिकोणी बागेत उभारण्याचे नियोजन करण्यात आले होते. आयुक्त सत्यम गांधी यांच्या हस्ते रविवारी या ठिकाणी भूमिपूजन होणार होते. पण त्यापूर्वीच काही कार्यकर्त्यांनी वेगळ्या ठिकाणी पुतळा उभारल्याने वाद निर्माण झाला. पुतळा उभारणाऱ्या कार्यकर्त्यांनी सांगितले की, यासाठी त्यांनी १६ ते १७ वेळा आंदोलने केली होती तसेच अनेकदा निवेदने दिली होती. प्रारंभी मनपाने प्रतापसिंह उद्यानात पुतळा उभारण्यास मान्यता दिली होती. नंतर अचानक त्रिकोणी बागेची निवड करण्यात आली. या निर्णयाला आमचा विरोध आहे.



सदर ठिकाण हे सिव्हिल हॉस्पिटल व बस स्थानकाकडे जाणारा प्रमुख मार्ग असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. त्यामुळे सण-उत्सव योग्य पद्धतीने साजरे करता येणार नाहीत, अशी खंत कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा भव्य स्वरूपात उभारण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

---

## चेंबूर कॅम्पमध्ये हिंदू स्वराज्य सेनेचा हनुमान जन्मोत्सव साजरा

■ मुंबई

**चेंबूर** कॅम्प येथील पंचमुखी हनुमान मंदिरासमोर हिंदू स्वराज्य सेनेतर्फे अध्यक्ष जयप्रकाश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.

या हनुमान जन्मोत्सव कार्यक्रमात विविध धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आले.या कार्यक्रमासाठी परिसरातील सर्वपक्षीय नेते,लोकप्रतिनिधी आणि हनुमान भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ठ असे की यावेळी 'तारक मेहता का उलटा चष्मा ' या लोकप्रिय हिंदी मालिकेतील सर्व कलाकार आवर्जून उपस्थित होते. त्यामुळे त्यांचे चाहते आणि हनुमान भक्तगणांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. हिंदू स्वराज्य सेना या सामाजिक संघटनेने अल्पावधीतच आपल्या सामाजिक उपक्रम राबविण्याच्या कल्पकतेने समाजामध्ये आपली चांगली प्रतिमा निर्माण केली आहे.

---

## मलबार हिल जलाशय तीन मजली प्रस्तावाचा वाद आता ऐरणीवर

**आज हँगिंग गार्डनमध्ये विशेष बैठक**

■ मुंबई

**मलबार** हिल जलाशयाच्या पुनर्बांधणीचा वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सध्या पालिकेने तीन मजली पर्यायी जलाशयाच्या प्रस्ताव आणल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात उद्या हँगिंग गार्डन येथे विशेष बैठक होणार आहे.

जुन्या जलाशयाच्या दुरुस्तीऐवजी नवीन ५२ दशलक्ष लिटर क्षमतेचा भूमिगत टँक, ५२ एमएलडी क्षमतेचा दुसरा टँक आणि वरच्या पातळीवर तिसरा टँक अशा ३ स्तरीय रचनेचा प्रस्ताव आहे. याआधी १३६ वर्षे जुने जलाशय तोडून पुनर्बांधणी करण्याच्या योजनेत ३८९ झाडे तोडली जाणार होती. त्याला स्थानिक रहिवाशांनी केलेल्या विरोधामुळे या निर्णयाला



स्थगिती मिळाली होती. परंतु आता तीन मजली पर्यायी जलाशय प्रस्ताव समोर आला आहे. या प्रकल्पामुळे शांतीवन आणि हँगिंग गार्डन दरम्यानचा हरित पट्टा होईल,अशी भीती स्थानिकांना वाटत आहे. यावर चर्चा करण्यासाठी उद्या रविवार ५ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता हँगिंग गार्डन येथे एका बैठकीचे आयोजन केले आहे. दरम्यान, प्रस्तावित योजनेतील तीन मजली संरचनेमुळे मरीन ड्राईव्ह आणि बॅकबे येथील दृश्य (फनेल ऑफ व्हिजन) बाधित होईल का, याची तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले आहेत. प्रियदर्शनी पार्क ते नेपियन्सी रोड आणि राजभवन ते वाळकेश्वर सर्कल हे भाग यासाठी संवेदनशील मानले जातात. प्राथमिक तपासणीत कोणताही अडथळा दिसून आलेला नसला तरी याबाबतचा सविस्तर आढावा सध्या घेतला जात असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

---

## नागपुरात बेपत्ता व्यावसायिकाचा निर्वस्त्र मृतदेह झुडपात आढळला

■ नागपूर

**नागपूरमध्ये** वाडी परिसरातील एका नामांकित व्यावसायिकाचा निर्वस्त्र अवस्थेतील मृतदेह झुडपात आढळल्याने खळबळ उडाली आहे. सुचित भोजापुरे (४४) असे मृतकाचे नाव असून, त्यांच्या डोक्यावर वार करून निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुचित भोजापुरे हे काल रात्रीपासून बेपत्ता होते. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेऊनही ते न सापडल्याने वाडी पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. दरम्यान, खडगाव मार्गावरील लावा परिसरातील निर्जन झुडपांमध्ये आज सकाळी एका व्यक्तीचा मृतदेह स्थानिकांना आढळला. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह पूर्णपणे निर्वस्त्र अवस्थेत होता. घटनास्थळी कोणतेही वाहन किंवा ओळख पटवणारी वस्तू न मिळाल्याने सुरुवातीला मृताची ओळख पटवणे कठीण झाले होते. मात्र बेपत्ता तक्रारीच्या आधारे पोलिसांनी कुटुंबियांना छायाचित्र दाखवले असता, तो मृतदेह सुचित भोजापुरे यांचाच असल्याचे स्पष्ट झाले.

---

## दूषित पाणी तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यास अधिकाऱ्यांवर कारवाई

**मुंबई अतिरिक्त पालिका आयुक्तांनी दिला इशारा**

■ मुंबई

**मुंबई** शहरातील वाढत्या दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत अतिरिक्त पालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी जल अभियंता विभागाला तातडीने उपाययोजना करण्याचे आणि दोषींवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच यापुढे दूषित पाणीपुरवठ्याची तक्रार आल्यास तातडीने स्त्रोत शोधून दुरुस्ती करावी, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पालिकेच्या जल अभियंता खात्याची एक विशेष आढावा बैठक अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी अतिरिक्त आयुक्त बांगर म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून अपुरा पाणीपुरवठा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी मुंबईतल्या काही ठिकाणांहून येत आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांनी विनाविलंब घटनास्थळी भेट देऊन पाहणी करावी.या पाहणीवेळी तक्रारीत तथ्य असल्यास विनाविलंब योग्य त्या उपाययोजना तातडीने कराव्यात. तसेच झोनिंग पद्धतीने पाणीपुरवठ्यात सुधारणा करणे, गळती विनाविलंब दुरुस्त करणे तर काही ठिकाणी बदल करणे, आवश्यकतेनुसार अतिरिक्त 'बुस्टिंग' विनाविलंब करणे, यासारख्या बाबींचा उपायामध्ये समावेश करावा. पाणीपुरवठा प्रकल्प हे विहित वेळेत पूर्ण होण्यास अडचणी येत असतील, तर अभियंत्यांना आवश्यकतेनुसार सहकार्य व मदत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दिली जावी, तसेच या अनुषंगाने कुणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असेल तर याबाबत जबाबदारी निश्चित करण्यासह संबंधितांवर कारवाई करण्यात येईल,असा इशारा बांगर यांनी यावेळी दिला.

---

## नांदेडमध्ये मध्यरात्री टोळीयुद्ध हाणामारीत तिघांचा मृत्यू

■ नांदेड

**नांदेड** शहरातील कॅनाल रोड परिसरात, डी-मार्टजवळ काल मध्यरात्री झालेल्या हाणामारीत तिघांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, हा प्रकार टोळीयुद्धातून घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

ही घटना मध्यरात्री १ ते १.३० वाजण्याच्या सुमारास घडली. कॅनाल रोडवरील डी-मार्ट परिसरात काही तरुणांमध्ये अचानक वाद झाला. या वादाचे रूपांतर काही क्षणांतच तुंबळ हाणामारीत झाले. हाणामारी इतकी भीषण होती की त्यात तिघांना जीव गमवावा लागला. या घटनेत दोन जणांचा मृत्यू घटनास्थळीच झाला, तर गंभीर जखमी झालेल्या एका व्यक्तीचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

---

## मालेगावात संतप्त महिलांचे आंदोलन अधिकाऱ्यांना दिला 'साडी-चोळी' आहेर

■ मालेगाव

**तालुक्यातील** गुगुळवाड येथील संतप्त महिलांनी पाणी व वीज समस्येवरून जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांना साडी-चोळी आणि बांगड्यांचा आहेर देत निषेध नोंदवला. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पाणीटंचाईमुळे त्रस्त ग्रामस्थांनी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आणि धरणे आंदोलन सुरू केले होते.मात्र अप्पर जिल्हाधिकारी देवदत्त केकान यांनी १५ दिवसांत पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

दहिवाळसह २६ गाव पाणीपुरवठा योजनेतून गुगुळवाडला गिरणा धरणातून


**पाणी द्या, नाहीतर बांगड्या भरा**

पाणीपुरवठा केला जातो.मात्र, जानेवारीपासून २० ते २५ दिवसांतून एकदाच पाणी मिळत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती.

त्याची दखल घेतली नसल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन सुरू केले होते. यावेळी उपोषणस्थळी आलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना संतप्त महिलांनी साडी-चोळी आहेर आणि बांगड्या दिल्या.

यावेळी पाणी द्या, नाहीतर ह्या बांगड्या भरा, असे या महिलांनी त्यांना सुनावले. परंतु काही वेळानंतर उपजिल्हाधिकारी देवदत्त केकान यांनी उपोषणस्थळी येऊन याबाबत तातडीने बैठक बोलावण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# नवाकाळ शब्दकोडे–१५६६



## आडवे शब्द –

१. कौशल्याचे काम ४. रिकामा, अनलंकृत गळा अथवा ओसाड भाग ७. स्वामी, धनी ९. निर्मळ ११. निर्मूलन १२. तोंड भरून घेतलेला घास १३. पक्ष्यांचा मंजुळ स्वर १५. नव्वद अंशांपेक्षा लहान कोन १६. बर्फाचा चौकोनी तुकडा १८. दसऱ्याआधीचा उत्सव २१. बारीक दगड २३. खतरनाक २५. अपात्र २६. सलगी २७. विचित्र, नवलाचे २८. मद, उन्मत्तपणा २९. आलेला माल ३१. साळुंकी ३२. शाहिराकडील छोटे चर्मवाद्य ३४. मृदुता ३५. थोडासा अंश ३७. ओशाळलेला ३९. खोटे, भ्रामक ४०. छोटा ४२. कुबड ४३. लाडके मूल ४५. घोट ४७. बळ, क्षमता ४८. गंध ५०. हात ५१. राजाच्या डोक्यावर धरल्या जाणाऱ्या छत्राच्या आकाराचा कानातील अलंकार ५२. रखवालदार ५४. नरमाईचे धोरण स्वीकारणे - ××× घेणे ५५. यशस्वी ५६. निरपेक्ष देऊन टाकणे ५७. बांध ५९. काळजातील उलघाल, अस्वस्थता ६०. स्त्री ६२. आईची बहीण ६४. खोगीर ६५. प्रारब्ध ६६. व्रताचे फलित, परिणाम ६८. भीती ७०. शेतात पिकणारे ७२. शीघ्र ७३. पाव- केक- बिस्किटे इत्यादी तयार करण्याची भट्टी ७५. ठीकठाक, अनेक ७६. नाविक ७८. निमूटपणे ७९. शैली, ढब ८०. तराजूचे पारडे ८२. पराभव, पाडाव ८३. अग्र ८५. हस्तलिखित ८७. कारण नसताना, उगाच ८९. हेकट, हट्टी, दुराग्रही ९१. मुंबईतील सर्वात मुख्य रेल्वेस्थानकाचे जुने नाव ९४. लांब अंतरावर ९५. आरडाओरडा ९६. खूप आणि सतत खाणारा ९७. दमदाटी ९८. सावध, सजग ९९. विवाहितेचे घर १००. अंमलबजावणीचा अधिकार असलेला सरकारी अधिकारी


## उभे शब्द –

१. परिपक्व नसलेला, अननुभवी २. टूम, लहर ३. दुमड घातलेली करंजी ४. खडबडीत ५. तुरुंग, एकटा ६. चुलती ७. मनुष्य ८. बायको, भार्या ९. कडाक्याचा वाद १०. चित्त, अंतःकरण ११. उनाड, बेबंद १४. पिता, जन्मदाता १७. श्रीकृष्णासाठी पोहे घेऊन जाणारा बालमित्र १९. कमळ २०. खारीची मोठी जात २२.किरकोळ दुरुस्ती २४. कार्यप्रमुख २७. करंगळीशेजारचे बोट २९. आवेश ३०. इंग्रजांच्या काळात काही काळ हे शहर भारताची राजधानी होते ३३. सूचनेची पाटी ३६. मराठी वर्ष ३७. वाईट गोष्टीला उत्तेजन देणे ३८. छोटा ४१. मोठा धक्का ४४. अरसिक, कोरडा ४६. शेंगेचे कवच ४७. कह्यात असलेला, गुलाम ४८. संक्रांतीला दिलेल्या भेटवस्तू ४९. महादेव ५३. व्यय ५४. दुर्दशा ५५. तह, बोली ५८. कानउघाडणी करणारा उपदेश ६०. नौका ६१. यशस्वी ६२. मृत्तिका ६३. मथळा ६५. गरीबी ६७. ऐकलेले ६९. घट्ट बासुंदी ७०. मदतीसाठी केलेला पुकारा ७१. पाणी ७३. उडाणटप्पू ७४. रिक्त, रिकामा ७६. पराभूत ७७. दगड ७८. प्रमाद ७८अ. तळहाताचा हलका प्रहार ८१. संत चोखा मेळा यांचा प्रसिद्ध अभंग 'विठ्ठल, विठ्ठल ×××, अवघी दुमदुमली पंढरी' ८३. अणकुचीदार ८४. नशा ८६. डिंक ८८. फणा काढणारा सर्प ८९. हळकुंडाची पूड ९०. वायू ९२. खोटे बोलणे, थाप ९३. अर्धा 'र' ९४. दुग्ध ९६. विशेष •

### नवाकाळ कोडे क्रमांक १५६५ चे उत्तर

**आडवे शब्द** : २. पराग ४. अक्कलशून्य ८. आजार १०. विवरण ११. हवन १२. सर्प १३. अवघड १५. मार १६. जीवन १८. वक्त १९. सागर २०. पार २२. खार २३. निखारा २५. मरण २६. तणतण २८. तयारी ३०. जीभ ३२. विळखा ३३. घबाड ३६. गतप्रभ ४०. सरबराई ४२. लाघव ४४. शिर ४५. जवस ४७. वरपांगी ४९. चर्या ५०. सारवण ५१. परभारे ५३. गुंड ५४. डरपोक ५६. चाक ५७. डाग ५९. राघव ६१. तिकडे विहीर ६४. कटाक्ष ६६. जनावर ६८. नकार ७०. आंबट ७१. कोंदट ७३. सन ७५. वयस्कर ७६. बटीक ७८. अंबर ८०. मुबलक ८१. जपमाळ ८३. आग्रहाने ८५. दीपक ८८. फाजील ९०. गदा ९२. घन ९३. पारंगत ९६. गरम ९८. बरगड्या १००. हातभार लावणे १०१. दिनकर १०३. वाळवंट १०४. शर्करा १०५. तमाम

**उभे शब्द** : १. आवर २. पणजी ३. गहन ४. अनवरत ५. लस ६. शूर्पणखा ७. अवगत ८. आड ९. रणरण १०. विमानतळ १३. असा १४. घर १७. वक्र २०. पारखा २१. भूतल २३. निरी २४. राजी २५. मळभ २७. जबाब २९. यादी ३१. भग ३२. विप्र ३३. घरटी ३४. डरावडराव ३५. वाघ ३७. तमा ३८. वरण ३९. आवर ४१. ईर ४२. लागीर ४३. वचक ४४. शिवशाही ४५. जपणूक ४६. सभा ४८. पांडव ५०. साकडे ५२. रेडा ५५. पोरका ५६. चाकरी ५८. गजबज ६०. घरकोंबडा ६२. विनायक ६३. रडारड ६५. टापटीप ६७. नाट ६८. नट ६९. रस ७२. दर ७४. नमुनेदार ७५. वलय ७६. बजरंगबली ७७. कमाल ७९. अग्रणी ८२. टोप ८४. कांजी ८५. दीन ८६. कपात ८७. संगर ८८. फारकत ८९. लड ९१. दार ९२. घड्याळ ९४. रंभा ९५. तलाव ९६. गणेश ९७. मदिरा ९९. गवा १००. हाट १०२. रमा




# राशिभविष्य

**रविवार ०५/०४/२०२६ ते शनिवार ११/०४/२०२६**

## ● मेष

**आठवड्याची** सुरुवात व अखेर चांगली जाईल. अडचणी, अडथळे असले तरी भाग्याची साथ आहे. तुम्ही केलेल्या कामाचे श्रेय सध्या मिळाले नाही तरी निराश होऊ नये. त्याचे फलित पुढे मिळणार आहे. योग्य ठिकाणी धडाडी, धाडस दाखवा.

कामाची गती कमी असेल. वेळप्रसंगी व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून माघार घ्यावी लागेल. आर्थिक आवक साधारण असेल. खर्चावर नियंत्रण न ठेवल्यास बचत होणार नाही. आर्थिक गुंतवणूक करायची असल्यास योग्य काळ नाही.

गृहसजावट, सण साजरे करणे याकडे कल राहील परंतु विनाकारण खर्च वाढवू नका. आई-वडिलांकडे लक्ष द्यावे. मतभेद टाळा. जोडीदाराची मदत मिळेल. संतती काम अथवा शिक्षणानिमित्त दूर जाऊ शकेल. मित्रपरिवाराचा, भावंडांचा सल्ला पारखून घ्यावा. गैरसमज होणार नाहीत याची काळजी घ्यावी. कार्यक्षेत्रामध्ये नवीन संधी स्वीकारताना कागदपत्रे तपासून घ्यावीत. नियम व अटी कायद्याच्या कसोटीवर तपासून पहा. छुपे स्पर्धक कार्यरत होणार आहेत. ते जाणून घेऊन त्याप्रमाणे धोरण आखावे. भागीदारीमुळे फायदा होईल परंतु मतभेद, वादविवाद टाळावेत. चर्चेने प्रश्न सुटू शकतो.

**शुभ दिनांक** : १०, ११.

## ● वृषभ

**महत्त्वाची** कामे तसेच नवीन योजना प्रत्यक्षात आणणे यासाठी आठवड्याचा पूर्वार्ध चांगला राहील. उत्तरार्धात अडथळ्यांचा सामना करावा लागेल. प्रत्येक ठिकाणी नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. झटपट लाभाच्या आमिषाला बळी पडू नका. लाभाचे प्रमाण चांगले राहील. बचत वाढवायचे असल्यास योग्य गुंतवणूक व खर्चावर नियंत्रण ठेवा. कार्यपूर्तीसाठी फक्त महत्त्वाच्या कार्यावर लक्ष केंद्रित करा.

कुटुंबामध्ये गैरसमज टाळावे. कुटुंबाचा एकत्र व्यवसाय असल्यास विशेष काळजी घ्या. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधित वाद असल्यास चर्चेने व घरातील ज्येष्ठांच्या मदतीने सुटेल. बोलताना मात्र योग्य शब्द वापरावेत. संततीच्या प्रगतीसंबंधी काळजी वाटेल.

कार्यक्षेत्रामध्ये अनपेक्षित आर्थिक उलाढाल होईल. तुमच्या कल्पनांना यश आल्यामुळे तुमचे कौतुक होईल. नोकरदारांनी नियमाप्रमाणे काम करावे. प्रवासाचे योग आहेत व त्यामुळे फायदाही होईल. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना थोड्या अडचणी जाणवल्या तरीही काम अडकून पडणार नाही.

**शुभ दिनांक** : ६, ७, ८.

## ● मिथुन

**कर्मस्थानी** अनेक ग्रहांची उपस्थिती आहे. विविध जबाबदाऱ्या वाढल्यामुळे धावपळ होईल. आत्ता कामाचा ताण जाणवणार आहे. नवीन संधी तुमची वाट पाहत आहे. मनाची द्विधा व संभ्रमित अवस्था नियंत्रणात ठेवा म्हणजे योग्य निर्णय घेता येतील. आठवड्याच्या मध्यावर्ती महत्त्वाची कामे होतील. हितशत्रू व स्पर्धकांवर मात करता येईल. भाग्याची साथ मिळणार आहे.

घरातील वातावरण संमिश्र असणार आहे. गैरसमज झाल्यामुळे वादविवाद होऊ शकतात. व्यावसायिक तणावाचा परिणाम घरात होऊ देऊ नका. जोडीदार व संततीबरोबर चांगले नाते राहील. मित्र परिवाराबरोबर आनंदात वेळ घालवाल.

कार्यक्षेत्रामध्ये योग्य वेळेत योग्य निर्णय घेणे आवश्यक आहे. नेतृत्व व कौशल्य उपयोगी पडेल. वाढलेल्या जबाबदारीमुळे सहकाऱ्यांची मदत घ्यावी लागेल. आर्थिक कोंडी होऊ नये म्हणून आर्थिक नियोजन तज्ज्ञाच्या सल्ल्याने करावे. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी जरूर तपासा. नोकरदारांना वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.

**शुभ दिनांक** : ६, ८, ९, १०.

## ● कर्क

**आठवड्याचा** उत्तरार्ध महत्त्वाचा ठरेल. वादाचे मुद्दे टाळून कामावर लक्ष केंद्रित करावे. कामाची गती कमी राहिल्यामुळे तणाव जाणवेल. व्यवहार व भावना यामध्ये समन्वय रहावा. मनाची अस्थिरता निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करेल. परंतु तात्पुरती परिस्थिती असल्यामुळे आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. आर्थिक स्थिती साधारण चांगली राहिली. कर्जप्रकरणे निकालात काढू शकता.

कौटुंबिक जीवनातील मतभेदाचे, ताणतणावाचे प्रसंग चतुराईने हाताळावे. स्वतःच्या व संततीच्या तब्येतीकडे लक्ष द्यावे. कौटुंबिक जबाबदारी टाळता येणार नाही. जोडीदाराचा अनुभव, सल्ला महत्त्वाचा ठरेल. कौटुंबिक व्यवसाय यश देणारा ठरेल.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेतल्यास उपयोगी पडेल. विनाकारण तुमच्यावर आरोप प्रत्यारोप झाले तरी तुम्ही त्यातून बाहेर पडाल. मन शांत ठेवा व कामाकडे दुर्लक्ष करू नका. आधीचे अडकलेले पैसे मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू करावे. नवीन धाडस सध्या टाळणे योग्य ठरेल.

**शुभ दिनांक** : ९, १०, ११.

## ● सिंह

**आठवड्याची** सुरुवात उत्साहात होईल. मधल्या काळात विनाकारण चिंता, अस्वस्थता जाणवेल. परंतु मन एकाग्र करून जिद्दीने कामे पूर्ण करा. आठवड्याच्या शेवटी तुम्ही सफलता मिळवलेली असेल. सध्याचे ग्रहमान बघता थोडी कामाची गती कमी राहणार आहे. अभ्यासपूर्ण नियोजन महत्त्वाचे ठरेल. बचतीचा मार्ग विसरू नका. अनपेक्षित लाभाबरोबरच खर्चही उभे राहतील. तारतम्याने खर्च करावा.

घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याचे प्रश्न पुन्हा जाणवतील. तुमच्या स्वतःच्या तब्येतीकडेही दुर्लक्ष करू नये. मुलांचे हट्ट पुरवले जातील. भावंडे, मित्रपरिवार यांच्याशी मतभेद टाळावे. वडिलोपार्जित संपत्तीचा प्रश्न असल्यास गैरसमज टाळणे अति आवश्यक ठरेल. बोलताना काळजी घ्यावी.

कार्यक्षेत्रामध्ये धाडस सध्या टाळावे. तुमच्यातील नेतृत्वगुणांचा वापर उपयोगी ठरेल. अहंकार व राग त्रासदायक ठरेल. कोर्टकचेरी सध्या टाळलेली बरी. नोकरदारांनी नोकरीत बदल करायचा असल्यास प्रयत्न सुरू करावे. नवीन संधी येथील परंतु त्या पारखून घ्याव्यात. भागीदारीतील समस्या चतुराईने हाताळाव्या लागतील.

**शुभ दिनांक** : १०, ११.

## ● कन्या

**या आठवड्यात** तुम्हाला समोर येणाऱ्या परिस्थितीप्रमाणे स्वतःचे धोरण, कृती याबाबत लवचिकता ठेवावी लागेल. नियोजित कामाला न्याय देण्यासाठी मनाची स्थिरता ठेवा. आर्थिक नियोजन महत्त्वाचे आहे. वेळप्रसंगी अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्यावा. कुठल्याही आकर्षक, सोप्या वाटणाऱ्या गोष्टी फसव्या असू शकतात हे विसरू नका.

घरापासून काही काळ कामानिमित्त लांब जावे लागेल. नवीन वास्तु घ्यायचा विचार असल्यास सफलता मिळेल. जोडीदाराच्या व्यावसायिक यशामुळे समाधान मिळेल. मुलांकडे मात्र लक्ष द्या. भावंडे व मित्रपरिवार यांच्याशी पारदर्शक व्यवहार ठेवावे. कौटुंबिक हितसंबंध जपावेत.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधक छुप्या कारवाया करतील. सावधगिरी बाळगावी. तुमच्या नव्या योजना उघड करू नका. सध्या तुमच्या कामाचे श्रेय लगेच मिळणार नाही. निराश न होता संयम ठेवून कामामध्ये सातत्य ठेवावे. भागीदारी टिकवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. अचानक येणाऱ्या समस्यांना सामोरे जावे लागले तरीही तुम्ही त्यातून मार्ग काढण्यात नक्की यशस्वी होणार आहात.

**शुभ दिनांक** : ६, ८.

## ● तूळ

**संमिश्र** ग्रहमानाचे दिवस आहेत. या आठवड्यात चढ उतार जाणवतील. सुरुवात चांगली होईल. तुमची ताकद, ऊर्जा वाया जाणार नाही यासाठी प्रयत्नशील रहा. अहंकार, मी पणा येऊ देऊ नका. गुरुचे पाठबळ असल्यामुळे समस्येतून तुम्ही बाहेर पडाल. योग्य वेळी योग्य निर्णय घेणे कृती करणे आवश्यक आहे. आर्थिक नियोजन काटेकोरपणे करा. काही कठोर निर्णय यावे लागतील. मुलांसाठी अनपेक्षित खर्च करावा लागेल. त्यातून त्यांची प्रगतीच होणार आहे. जोडीदाराबरोबर होणारे मतभेद टाळण्यासाठी योग्य व सौम्य शब्द वापरावे. कुटुंबाच्या प्रगतीसाठी अनुभवी व्यक्तींचा सल्ला घ्यावा परंतु अंतिम निर्णय तुम्ही घेणे योग्य ठरेल. नवीन नाती निर्माण होतील परंतु त्याबाबत सावध राहावे. प्रेमाचे रूपांतर विवाहात होईल.

कार्यक्षेत्रामध्ये वेळप्रसंगी दोन पावले माघार घ्यावी. योग्य नियोजन व सखोल अभ्यास, स्वतःच्या क्षमतेचा विचार करूनच निर्णय घ्यावा. कुणावरही अवलंबून राहू नका. अडचणींवर मात करत तुम्ही रखडलेली कामे पूर्ण करू शकाल. अर्थार्जनाचे नवीन मार्ग दृष्टीपथात येतील.

**शुभ दिनांक** : ९, १०.

## ● वृश्चिक

**आठवड्याची** सुरुवात थोडी निराशाजनक वाटली तरी नंतर परिस्थितीत सुधारणा होईल. मनाचा उत्साह मात्र टिकवून ठेवावा लागेल. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. रवी शनीची प्रतिकूलता असल्यामुळे अपेक्षित यश मिळण्यास उशीर, त्रास होऊ शकतो. आर्थिक स्थिती सर्वसाधारण राहतील. मोठी गुंतवणूक थोडी पुढे ढकलावी. सरकारी तसेच कायद्यासंबंधित कामे योग्य तज्ज्ञाच्या सल्ल्यानेच, सावधगिरीने करावीत.

घरामध्ये तुम्हाला पुढाकार घेऊन प्रश्न मार्गी लावावे लागतील. सगळीकडे लक्ष देताना तारांबळ उडेल. ज्येष्ठांची साथ मिळेल. जोडीदाराशी जमवून घ्या. मुलांच्या अडचणींकडे विशेष लक्ष द्यावे. तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी, घटना तुम्हाला घडवून आणण्यासाठी अधिक कष्ट घ्यावे लागतील.

कार्यक्षेत्रामध्ये कुठलेही तडकाफडकी निर्णय घेणे शक्यतो टाळा. भावनेच्या भरात केलेली कृती भविष्यात त्रासदायक ठरू शकते. नोकरदारांना नियमांच्या चौकटीत राहूनच काम करावे लागेल. तुमच्या मेहनतीचे चीज होईल.

भावनिक आंदोलने नियंत्रणात ठेवावी.

**शुभ दिनांक** : ६, ८, ११.

## ● धनु

**आठवड्याच्या** सुरुवातीलाच चांगली बातमी मिळू शकते. जुनी येणी वसूल करण्यासाठी प्रयत्न चालू करा. कुटुंब व पैशासंबंधी आठवड्याच्या शेवटी काळजी वाटेल. नक्की प्रश्न समजून घेणे आवश्यक आहे. एखादी गोष्ट सुरुवातीला यशस्वी न होता प्रयत्न केल्यानंतर सफल होण्याचे योग आहे. चिकाटी व संयम ठेवा. नैराश्य टाळा. निर्णयक्षमता व आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका.

मनस्वास्थ्य टिकवून ठेवण्याला प्राधान्य द्यावे. चंद्राचे भ्रमण संमिश्र फळे देणार आहे. घरामध्ये तणावाचे वातावरण राहिले तरीही ज्येष्ठांच्या सल्ल्याने मार्ग निघतील. मात्र ज्येष्ठांच्या व स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी. जोडीदाराशी गैरसमज टाळा. मुलांचे हट्ट पुरवावे लागतील. मित्रपरिवाराचे सहकार्य राहील.

कार्यक्षेत्रामध्ये अचानक घडणाऱ्या घडामोडींसाठी तयार रहावे. उद्दिष्टपूर्तीसाठी चुकीचे मार्ग टाळावेत. नोकरीत बदल करण्यासाठी मुलाखती देताना योग्य शब्दांची निवड करावी. कागदपत्रे तपासून पहा. व्यावसायिकांनी आर्थिक नुकसान टाळण्यासाठी सावध राहावे. घाईत निर्णय घेणे टाळा. भागीदारीमुळे फायदा होताना दिसत असला तरीही व्यवहारात पारदर्शकता ठेवावी.

**शुभ दिनांक.** : ९, १०.

## ● मकर

**संघर्षातून** कार्यसिद्धी होणारा हा आठवडा आहे. नियोजित कामे पूर्ण करताना धावपळ होईल. जबाबदारी वाढल्यामुळे तणावही वाढेल. कामाचे पूर्ण नियोजन करा. अनपेक्षित परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवावी. आर्थिक कोंडी होऊ शकते. बचत करणे महत्त्वाचे आहे. रागावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवा. मानसिक तणावामुळे निर्णय चुकू शकतात. कार्यशक्ती कमी झाल्यासारखे वाटेल.

घरामध्ये वाढलेल्या जबाबदाऱ्या तुम्ही पूर्ण करू शकाल. काही वेळा चतुराईने परिस्थिती हाताळावी लागेल. घरामध्ये छोटासा समारंभ साजरा होईल. गृहसजावटीची इच्छा वाढेल. जोडीदार व मुलांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करताना तारांबळ उडेल.

उद्योगव्यवसायात छुपे शत्रु ओळखून तुमचे धोरण ठेवा. कार्यशैलीमध्ये परिस्थितीनुसार बदल करावे लागतील. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. नवीन संधी स्वीकारताना भविष्यातील फायद्याचाही विचार करा. तुम्हाला आत्ता मदतीची गरज भासणार आहे हे विसरू नका. फार मोठे धाडसी निर्णय घेऊ नका. आवश्यक तिथे अनुभवी व विश्वासू व्यक्तीचा सल्ला घ्या.

**शुभ दिनांक** : ६, ८, ११.

## ● कुंभ

**आठवड्याचा** मध्य तुमच्यासाठी चांगला राहील. मानसिक व शारीरिक स्वास्थ राखण्यातला प्राधान्य द्यावे. मनामध्ये साशंकता व आक्रमक वृत्ती वाढेल त्यावर नियंत्रण ठेवा. स्वतःची क्षमता व आधीचा अनुभव याप्रमाणे तुमचे धोरण ठरवा. कुटुंब व कार्यक्षेत्र दोन्हीकडे संघर्षातून यश आहे. आर्थिक स्थिती चांगली राहण्यासाठी योग्य नियोजन करावे लागेल. आर्थिक लाभ चांगले होतील योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे महत्वाचे ठरेल. भाग्याची साथ तुमच्या कष्टाला आहे.

कुटुंबामध्ये विनाकारण गैरसमज, मानअपमान यामुळे वादविवाद होऊ शकतात. हे टाळण्यासाठी योग्य ती काळजी घ्या. थोडेसे अलिप्त धोरण ठेवून काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. मुलांसंबंधी चिंता राहील परंतु त्यातून मार्ग नक्की निघेल. प्रेमाचे रूपांतर विवाहात होण्याच्या दृष्टीने बोलणी यशस्वी होतील.

कार्यक्षेत्रामध्ये सावधगिरीने नवीन व्यवहार करा. नोकरदारांनी विशेष काळजी घ्यावी. वरिष्ठ तसेच सहकारी वर्गावर अवलंबून राहू नका. व्यावसायिकांना भांडवल उभे करता येईल. जुनी येणी वसूल करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे. पूर्ण माहिती घेऊन योग्य ठिकाणी धाडस दाखवा.

**शुभ दिनांक:** ६, ८, ९, १०.

## ● मीन

**साडेसाती** असली तरीही यशाचे मार्ग बंद झालेले नाहीत. संघर्ष वाढणार आहे.त्याची सकारात्मक बाजू बघायला विसरू नका. सुरुवातीला अडथळ्यांचा सामना करावा लागला तरी आठवड्याचा उत्तरार्ध चांगला आहे. आर्थिक आवक चांगली असेल परंतु आर्थिक बचत प्रयत्नपूर्वक करावी लागेल. अचानक व अनपेक्षित खर्च निघतील. प्रवासाचे योग आहेत. कागदपत्रे मात्र सांभाळा.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. भावनेच्या भरात निर्णय घेणे नुकसानदायी ठरेल. जोडीदाराशी सामंजस्य ठेवणे आवश्यक आहे. जोडीदाराच्या आरोग्याची चिंता राहील. संततीकडेही दुर्लक्ष करू नका. भावंडांना मदत कराल. घरामध्ये धार्मिक कार्य होईल. उद्योगव्यवसायात कार्यपूर्तीसाठी आव्हानांचा सामना करावा लागेल. येणाऱ्या समस्यांचा नीट अभ्यास करून त्यावर उपाययोजना करा. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेतला तरी अंतिम निर्णय तुमचाच राहू द्या. नोकरदारांनी वादविवादाचे प्रसंग टाळणे योग्य ठरेल. वरिष्ठांची मदत मिळेल. व्यावसायिकांनी मोठे आर्थिक व्यवहार, उधारी देणे घेणे टाळावे. अगदीच आवश्यकता असेल तर कायदेशीर बाबींची पूर्तता करून मग व्यवहार करावे.

**शुभ दिनांक** : ९, १०, ११.

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे**

# परकीय चलन गंगाजळीत १०.२९ अब्ज डॉलरची घट



**मुंबई -** २७ मार्च रोजी संपलेल्या आठवडयात देशाच्या परकीय चलन गंगाजळीत १०.२९ अब्ज डॉलरची घट नोंदवली गेली. त्याआधीच्या आठवड्यात ११.४१ अब्ज डॉलरची घट नोंदवण्यात आली होती. फेब्रुवारी महिन्यात देशाची परकीय चलन गंगाजळी तोपर्यंतच्या सर्वाधिक उंचीवर पोहोचली होती. मात्र मध्यपूर्वेतील युद्धामुळे रुपयाची वेगाने घसरण सुरू झाली होती.ही घसरण थांबवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने परकीय चलन बाजारात (फॉरेक्स मार्केट) हस्तक्षेप करत काही कठोर उपाययोजना केल्या. परकीय चलन साठ्यातील डॉलरची विक्री करून रुपया स्थिर करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला. त्याचा परिणाम म्हणून परकीय चलन गंगाजळीत ही घट झाली आहे.

## ओमानजवळ तेलवाहू जहाजावरील ड्रोन हल्ल्यात मृत्यू
## खलाशाचे पार्थिव न मिळाल्याने कुटुंबीय हायकोर्टात

■ मुंबई

**ओमानच्या** किनाऱ्याजवळ तेलवाहू जहाजावर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या खलाशाचा पार्थिव अद्याप ताब्यात न मिळाल्याने कुटुंबियांनी हायकोर्टात धाव घेतली आहे.अंत्यसंस्कार करण्यासाठी पार्थिव ताब्यात मिळावे यासाठी केंद्र सरकारला न्यायालयाने आदेश द्यावेत अशी मागणी याचिकेत करण्यात आली असून सोमवारी ६ एप्रिल रोजी या याचिकेवर हायकोर्टात मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षादरम्यान, ४ मार्च रोजी स्फोटकांनी भरलेला ड्रोन ओमान येथील एमटी एमकेडी व्योम या तेलवाहू जहाजावर पडला या हल्ल्यात बोटीवर खलाशी असलेले २५ वर्षीय दीक्षित सोलंकी ठार झाले. महिना उलटूनही पार्थिव ताब्यात न मिळाल्याने दीक्षितचे वडील अमृतलाल आणि बहीण मिताली यांनी ज्येष्ठ वकील सतीश तळेकर व ॲड. माधवी अय्यपन यांच्या मार्फत याचिका दाखल केली आहे.





मृत झालेल्या कुटुंबातील सदस्यावर सन्मानाने अंत्यसंस्कार करणे हा मूलभूत अधिकार आहे. मात्र प्रशासकीय दिरंगाईमुळे या प्रक्रियेत विलंब होत असल्याने मृतदेह अद्याप ताब्यात मिळालेला नाही त्यामुळे न्यायालयाने तातडीने हस्तक्षेप करावा अशी विनंती कुटुंबीयांनी केली आहे.

## अंजनगाव शिवपुतळ्याचे स्थलांतर वाद मिटला

■ सोलापूर

**जिल्ह्यातील** माढा तालुक्यातील अंजनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून निर्माण झालेला तणाव अखेर दोन दिवसांनी मिटला. प्रशासन, स्थानिक नेते आणि दोन्ही समाजाच्या प्रतिनिधींच्या बैठकीत एकमताने पुतळा हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी एक कोटी रुपयांचा निधीही जाहीर करण्यात आल्याचे माजी आमदार राजन पाटील यांनी सांगितले.

## ईडीच्या चौकशीतील अभियंता बुलेट प्रकल्पात आस्थापना विभागाने पाठवला

■ वसई

**वसई**-विरार पालिकेतील बांधकाम घोटाळ्यातील कोट्यवधी रुपयांचे व्यवहार करणारा ठेका अभियंता अंकित मिश्रा यांची बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी नियुक्ती करण्यात आल्याने वाद निर्माण झाला आहे. स्वराज्य अभियान पक्षाने मिश्रा याच्या हकालपट्टीची मागणी केली आहे . पालिकेच्या नगररचना अधिकारी श्वेता माने यांना याबाबत विचारले असता त्या म्हणाल्या की आम्हाला अभियंत्याची गरज नव्हती. मात्र आस्थापना विभागाने ही बदली केली असे सांगितले.

वसई-विरार शहरात बांधकाम व्यावसायिकांकडून इमारतींना परवानगी देण्यासाठी प्रति चौरस फुटामागे पैसे घेतले जात होते. त्यात आयुक्त, नगररचना उपसंचालक, कनिष्ठ अभियंते, सनदी लेखापाल, वास्तुविषारद, एजंट यांची टोळी तयार झाली होती. मागील वर्षी सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) हा बांधकाम घोटाळा उघडकीस आणला होता. या प्रकरणी तत्कालीन आयुक्त अनिलकुमार पवार आणि तत्कालीन नगररचनाकार वाय. एस. रेड्डी यांना अटक करण्यात आली होती. रेड्डी अद्याप तुरूंगात आहेत. या प्रकरणी ईडीने नगररचना विभागातील ठेका अभियंता अंकित मिश्रा याची चौकशी केली होती. मिश्रा याने आर्किटेक्ट आणि बिल्डरांकडून लाच स्वीकारून तत्कालीन आयुक्त आणि नगररचना उपसंचालकाला पोहोचविल्याची कबुली ईडीला जबाबात दिली होती.

## ताडोबा सफारीत नियमभंग
## भाजपा आमदार देवतळे वादात

■ चंद्रपूर

**ताडोबा-अंधारी** व्याघ्र प्रकल्पातील सफारीदरम्यान नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा मतदारसंघाचे भाजपा आमदार करण देवतळे यांच्यावर होत आहे. सफारीदरम्यान मोबाईल वापरण्यास बंदी असतानाही त्यांनी रील तयार करून समाज माध्यमांवर पोस्ट केली.

ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर आणि बफर क्षेत्रात सफारीदरम्यान मोबाईल फोन बाळगणे व वापरणे नियमबाह्य आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास ५ हजार रुपयांच्या दंडाची तरतूद आहे. पण आमदार देवतळे यांनी तयार केलेल्या व्हिडिओमध्ये जीपच्या आरशात मोबाईलचे प्रतिबिंब दिसून येत असल्याने त्यांनी सफारीदरम्यान मोबाईल वापरल्याचे स्पष्ट होत आहे. देवतळे यांनी ताडोबा बफर क्षेत्रातील निमढेला गेटवरून सपत्नीक सफारी केली होती. या दरम्यानच हा व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात आला. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी आणि पर्यटनाचा दर्जा टिकवण्यासाठी सफारीदरम्यान मोबाईल वापरण्यावर सक्त मनाई केली आहे. असे असतानाही नियमभंग झाल्याचा आरोप होत असल्याने या प्रकरणाची चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## लॉटरी किंग मार्टिनच्या कुटुंबातील तीन सदस्य निवडणुकीच्या रिंगणात

■ चेन्नई

**तामिळनाडू** आणि शेजारचा केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुका होऊ घातल्या आहेत. विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत. यामध्ये निवडणूक रोखे प्रकरणात देशभरात चर्चेत आलेला लॉटरी किंग सांतियागो मार्टिन याच्या कुटुंबातील तीन सदस्यांचा समावेश आहे. वेगवेगळ्या पक्षांमधून हे सदस्य निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

सांतियागोची पत्नी लिमा रोझ हिने काही दिवसांपूर्वी एआयएडीएमके पक्षात



प्रवेश केला होता. त्या तिरुचिरापल्लीतील लालगुडी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. तर त्यांचे पुत्र जोस चार्ल्स मार्टिन यांनी काही दिवसांपूर्वी आपल्या स्वतंत्र लच्छिया जननायक कच्छी (एलजेके) पक्ष स्थापन केला आहे. ते पुद्दुचेरीतील कामराजनगरमधून रिंगणात उतरले आहे. त्यांचा पक्ष एनडीएचा घटक आहे. मार्टीन कुटुंबातील तिसरा सदस्य जोस मार्टिनचा जावई आहे. जावई आढाव अर्जुना हे टीव्हीके पक्षाच्या तिकिटावर चेन्नईतील विल्लिवक्कम विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.

## व्हीएसआरचा मालक रोहित सिंगला अटक का केली नाही? जय पवार यांचा सवाल

■ पुणे

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघात प्रकरणात व्हीएसआर विमान कंपनीचे मालक रोहित सिंग यांना अद्याप अटक का करण्यात आलेली नाही? असा सवाल अजित पवारांचे पुत्र जय पवार यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची पाहणी करताना पत्रकारांशी बोलताना जय पवार यांनी हा प्रश्न उपस्थित केला. एखादी इमारत पडली तर तिच्या मालकाला अटक होते, रेस्टॉरंटला आग लागली तर मालकावर कारवाई होते. मग एवढा मोठा विमान अपघात झाला असताना संबंधितांवर कारवाई का होत नाही? असा सवाल त्यांनी केला. जय पवार यांनी या अपघाताबाबत स्वतंत्र पत्रकार परिषद घेणार असल्याचे यापूर्वी सांगितले होते. याबाबत विचारले असता जय पवार म्हणाले की, मला मांडायचे असलेले अनेक मुद्दे आमदार रोहित पवार यांनी आधीच मांडले आहेत. त्यामुळे अंतिम अहवाल येईपर्यंत अनावश्यक संभ्रम निर्माण होऊ नये, यासाठी मी सध्या अधिक भाष्य करणार नाही.

## दत्ता मेघे यांच्या श्रद्धांजली सभेत
## देशमुख-परमबीर सिंह आमनेसामने

■ नागपूर

**विदर्भातील** ज्येष्ठ नेते दिवंगत दत्ता मेघे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी जामठा येथे आयोजित सर्वपक्षीय सभेत माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह हे एकाच व्यासपीठावर उपस्थित होते. पण दोघांनी एकमेकांकडे साधे पाहिलेही नाही. या सभेला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, ज्येष्ठ नेते विलास मुत्तेमवार यांसह विविध पक्षांचे अनेक मान्यवर उपस्थित होते.

परमबीर सिंह हे मेघे कुटुंबाचे

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

जवळचे नातेवाईक (सागर मेघे यांचे व्याही) असल्याने ते या कार्यक्रमाला उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला परमबीर सिंह व्यासपीठावर आले. त्यानंतर काही वेळाने अनिल देशमुखही व्यासपीठावर दाखल झाले. देशमुख यांनी उपस्थित नेत्यांना अभिवादन केले. पण समोर बसलेल्या परमबीर सिंह यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, दोघांनीही एकमेकांशी संवाद साधला नाही.

मार्च २०२१ मध्ये परमबीर सिंह यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून अनिल देशमुख यांच्यावर शंभर कोटी रुपये वसूल करून देण्याचे आदेश दिले होते, असा आरोप होता.

## वानवडीत 'टिपू सुलतान'च्या घोषणा
## मेधा कुलकर्णी पोलिसांवर संतापल्या

■ पुणे

**पुण्यातील** वानवडी परिसरात म्हशींच्या खरेदी-विक्रीशी संबंधित कारवाईदरम्यान 'टिपू सुलतान'च्या घोषणा दिल्याचा आरोप भाजपा खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला. त्यांनी पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत टीका केल्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

चार दिवसापूर्वी वानवडी परिसरात म्हशींचा बेकायदेशीर वाहतुकीचा प्रकार उघडकीस आला होता. यामध्ये ७ म्हशी टेम्पोमध्ये कोंबून घेऊन जात असल्याचे पशू अधिकाऱ्यांना समजले. याप्रकरणी टेम्पो चालकांविरुद्ध गुन्हा नोंद झाला. मात्र पोलिसांनी तो टेम्पो कसायांच्या ताब्यात दिला. यानंतर गोरक्ष सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन केले. मेधा कुलकर्णी म्हणाल्या की, कालसुद्धा इथे टिपू सुलतानच्या घोषणा दिल्या. म्हशींची खरेदी आणि विक्री कुठेतरी दुसऱ्या गोठ्यात चालली असेल तर टिपू सुलतानचा काय संबंध?

## सोलापुरात पुलावरून कार कालव्यात कोसळली! मुलीसह आई-वडिलांचा अंत

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील नातेपुते परिसरात पुलावरून कार कालव्यात कोसळल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत मुलीसह आई-वडिलांचा अंत झाला. यामध्ये प्रीती टिळेकर (३०), मंजुळा जठार (५०) आणि हनुमंत जठार (५५) यांचा मृत्यू झाला.तर चालक असलेले जावई सुनील टिळेकर थोडक्यात बचावले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मुंबईहून फोंडशिरसकडे जाणारी कार जुन्या पालखी मार्गावरील पुलावरून जात असताना कार थेट नीरा उजवा



कालव्यात कोसळली. अपघात इतका भीषण होता की, कार पाण्यात बुडाल्याने आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. मंजुळा व हनुमंत जठार हे माण तालुक्यातील मोगराळे येथील मूळ रहिवासी असून सध्या मुंबईत वास्तव्यास होते. प्रीती त्यांची विवाहित मुलगी खारघर येथे राहत होती. रामनवमी निमित्त टिळेकर कुटुंब फोंडशिरस येथे आले होते. परतीच्या प्रवासात त्यांनी आपल्या मुलाला नातेवाईकांकडे ठेवले होते आणि त्याला परत आणण्यासाठी जात असताना हा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली.

## हार्बर आणि ट्रान्स-हार्बर मार्गावर आज मेगाब्लॉक

**मुंबई - विविध** अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी पनवेल आणि वाशी स्थानकांदरम्यान उद्या सकाळी ११.०५ ते सायंकाळी ४.०५ या वेळेत अप व डाऊन हार्बर आणि ट्रान्स-हार्बर मार्गावर मेगाब्लॉक जाहीर केला आहे. या ब्लॉकच्या काळात काही विशेष उपनगरीय गाड्या चालवल्या जातील, तर बेलापूर/नेरुळ आणि उरण स्थानकांदरम्यान पोर्ट मार्गावरील सेवा सुरू राहतील. पनवेलहून ठाण्याच्या दिशेने जाणारी अप ट्रान्स-हार्बर मार्ग सेवा सकाळी ११.०२ ते दुपारी ३.५३ आणि ठाण्याहून पनवेलच्या दिशेने जाणारी डाऊन ट्रान्स-हार्बर मार्ग सेवा सकाळी १०.०१ ते दुपारी ३.२० या वेळेत रद्द राहतील. याशिवाय, पनवेलहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणारी अप हार्बर मार्ग सेवा सकाळी १०.३३ ते दुपारी ३.४९ व टर्मिनसहून पनवेल/बेलापूरच्या दिशेने जाणारी डाऊन हार्बर मार्ग सेवा सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ रद्द राहतील. रेल्वे प्रवाशांनी या काळात पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

## सातारा सभापती निवडीत दंडेलशाही
## भाजपाचे सर्व उमेदवार बिनविरोध



■ सातारा

**सातारा** जिल्हा परिषदेत अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीनंतर निर्माण झालेला वाद अजून शांत झाला नसतानाच आज सभापती निवडीतही मोठा राजकीय संघर्ष पाहायला मिळाला. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदे गटाने निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेत मतदानावर बहिष्कार टाकला. त्यामुळे भाजपाचे चारही सभापती बिनविरोध निवडून आले.

सभापती निवडीच्या प्रक्रियेदरम्यान राष्ट्रवादी आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी सभात्याग करत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. जिल्हा परिषद इमारतीबाहेरही सदस्यांनी आंदोलन करत निवडणूक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने होत नसल्याचा आरोप केला. विरोधी सदस्यांनी आरोप केला की, अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीप्रमाणेच सभापती निवडीतही दंडेलशाही झाली. पोलिसांनी सभागृहात वेळेत पोहोचू दिले नाही, गेटवर अडवले, तसेच अर्ज भरण्यास अडथळे निर्माण केले, असे गंभीर आरोप विरोधी सदस्यांनी केले. २० मार्च रोजी झालेल्या अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीतही मोठा वाद झाला होता. त्यावेळी भाजपाने राष्ट्रवादी आणि शिंदे गटातील काही सदस्य फोडून सत्ता काबीज केली होती. त्या पार्श्वभूमीवर आजच्या निवडीत विरोधकांनी काळ्या फिती बांधून निषेध नोंदवला. दरम्यान, सभापतीपदासाठी भाजपाकडून आलेले चारच अर्ज वैध ठरल्याने ऋतुजा शिंदे, ऋषीकेश धायगुडे-पाटील, लता कर्णे आणि तेजस्विनी विक्रमशील कदम यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. विशेष म्हणजे, यापैकी काही सदस्य हे राष्ट्रवादीतून भाजपामध्ये आलेले असल्याने राजकीय समीकरणांवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## एलआयसी आणि देना बँकेच्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला चालना

■ मुंबई

**केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आश्वासन**

**दक्षिण** मुंबईतील एलआयसी आणि देना बँकेच्या मालकीच्या ९० वर्षे जुन्या, मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यासंदर्भात सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिल्याने, रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळून शेकडो भाडेकरूंना यामुळे दिलासा मिळणार आहे.

एलआयसी आणि देना बँक (आता बँक ऑफ बडोदा) च्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्रयत्न सुरू आहेत.त्यासंदर्भात राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी 'एलआयसी टेनंट्स अँड ऑक्युपंट्स असोसिएशन'च्या मागणीचे पत्र घेऊन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली होती. लोढा यांच्या प्रयत्नांना यश आले असून याबाबत पुढील तीन महिन्यांत सकारात्मक मार्ग काढण्याचे आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले आहे.

एलआयसीकडून 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' नियुक्तीसाठी उशीर होत असल्याची तक्रार रहिवाशांनी केली होती.मात्र आता प्रक्रिया वेगवान होण्याची चिन्हे केंद्र सरकारच्या हस्तक्षेपामुळे निर्माण झाली आहेत.

## राज्यातील प्रमुख मार्गावर
## इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी

■ मुंबई

**पेट्रोल-डिझेलच्या** वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी काही प्रमुख महामार्गांवर टोलमाफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये राज्य मार्गांवर मात्र टोलमध्ये ५० टक्के सवलत असणार आहे.

राज्य सरकारच्या या नव्या धोरणानुसार मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू यासारख्या प्रमुख मार्गांवर ई-कार आणि ई-बसला १०० टक्के टोलमाफी देण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इतर रस्त्यांवर ५० टक्क्यांपर्यंत टोल सवलतीची तरतूद करण्यात आली आहे. राज्य सरकारने ईव्ही धोरणांतर्गत सुमारे ४६ कोटी रुपयांच्या सवलतींची घोषणा केली आहे. ई-वाहन खरेदीसाठी प्रोत्साहन म्हणून कारवर दीड लाख रुपयांपर्यंत आणि दुचाकीसाठी सुमारे १० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे.याशिवाय, राज्यात नोंदणी होणाऱ्या ई-वाहनांना रस्ते कर आणि नोंदणी शुल्कात १०० टक्के सूट देण्यात आली आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्यांना ई-वाहन खरेदी अधिक परवडणारी होणार आहे.

**धाराशिव जिल्ह्यात विद्यार्थ्यांचा वाढता 'स्क्रीन टाईम' कमी करून अभ्यासाला चालना देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील यांनी दररोज रात्री ७ ते ९ या वेळेत टीव्ही आणि मोबाईल बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे.**

## धाराशिवमध्ये दररोज २ तास मोबाईल व टीव्ही बंद राहणार

■ धाराशिव

**धाराशिव** जिल्ह्यातील प्रत्येक गावात रात्री ७ वाजता मंदिरांवरील किंवा ग्रामपंचायतीवरील भोंगे वाजवले




जातील. भोंगा वाजताच घरातील टीव्ही बंद करून विद्यार्थ्यांनी अभ्यासाला सुरुवात करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण निरीक्षक आणि ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांचे विशेष पथक गस्त घालणार आहे. घरोघरी जाऊन विद्यार्थी अभ्यास करत आहेत का, याची पाहणी केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पोषक वातावरण मिळावे यासाठी मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये अभ्यासिका सुरू करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. तसेच शाळेनंतर मार्गदर्शनासाठी शिक्षक उपलब्ध करून दिले जाणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असून, या निर्णयाचे शैक्षणिक वर्तुळातून स्वागत होत आहे.

## महिलांच्या स्वच्छतागृहातच कॅफे
## टीकेनंतर महापालिकेची कारवाई

■ मुंबई

**मुंबईत** महिलांसाठी उभारलेल्या फिरत्या स्वच्छतागृहाच्या बसमध्येच कॅफे सुरू करण्यात आल्याचा प्रकार फॅशन स्ट्रीट परिसरात उघडकीस आला असून, तीव्र टीकेनंतर मुंबई महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कारवाई करत कॅफे बंद केला आहे.

महिलांच्या सुविधेसाठी रूपांतरित केलेल्या या बसमध्ये एका बाजूला स्वच्छतागृह, तर त्याच बसमध्येच दुसऱ्या बाजूला कॅफे सुरू करण्यात आला होता. कॅफेमध्ये खाद्यपदार्थांची विक्री सुरू असल्याने स्वच्छता आणि आरोग्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले. या कॅफेची जाहिरातही थेट स्वच्छतागृह असलेल्या बसवरच लावण्यात आली होती. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर सोशल मीडियावर आणि स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. टीकेनंतर बीएमसीच्या ए वॉर्ड' प्रशासनाने तातडीने कारवाई करत संबंधित कॅफे बंद केला आहे. महापालिकेकडून शहरातील विविध भागांत महिलांसाठी अशा फिरत्या स्वच्छतागृहांची सुविधा उभारण्यात आली असली, तरी या घटनेमुळे संपूर्ण उपक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.